
साप्ताहिक

# माणूस

२० एप्रिल ७४

एक रुपया


व्यायामशाळा (जनता मान्य)







'बैठक (T)'




'रस्सीखेच'

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २० एप्रिल | अंक : सत्तेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


## बैठक, सी. आय्. डी., वरूडची सभा

बैठकीची वेळ रात्री नऊची! मुख्यमंत्री आले पावणेदहाला! त्याच्या आधी पासून आमदार गटागटाने येत होते. त्यांच्या येण्याच्या पद्धतीवरून आज गरमागरम चर्चा होणार असल्याचे जाणवत होते! पत्रकारांची अनुपस्थिती! अपवाद म्हणून काही होते. असलेल्या पत्रकारांना आमदार सांगत, 'काही होणार नाही!' पण त्यांच्या सांगण्यात सरळपणा नव्हता. नऊ वाजेपर्यंत सर्व गट हॉलमध्ये जागा अडवून बसले होते. दादा, शंकरराव, पी. के., त्यांचे अनुयायी कोपऱ्या कोपऱ्यात बसलेले. एखाद्या लग्नघरात ग्रुप बसावेत तसे. 'मुख्यमंत्री वेळेवर येणारच नाहीत याची आम्हाला खात्री आहे' असे एकजात आमदार बोलत होते. 'बाराच्या पुढे बैठक चालवायची नाही असं आधीच ठरलंय. दोन ताससुद्धा चर्चा होऊ देणार नाही. त्यासाठी 'म्हातारा' लौकर येणार नाही.'—मुख्यमंत्र्यांविषयीचे हे उद्‌गार धक्कादायक वाटतात. आतापर्यंत असे कोणी संबोधित नव्हते. सी. एम., सी. एम. साहेब असे आदराचे शब्द वापरले जात होते. म्हातारा, पाईपवाला हे शब्द प्रथमच कानावर पडले!

आमदारांच्या हिशोबाप्रमाण दोन तासच चर्चा झाली. गुप्तता रहावी म्हणून कोण काळजी! दुसऱ्या मजल्यावर बैठक. लिफ्टपासून शेकड्याच्या हिशोबातील फूट अंतरावर हॉल; पण लिफ्टजवळ कोणी दिसले की, त्याला घालवले जात होते. पेपरवाल्यांना कळायला नको याची खबरदारी घेतली जात होती. लघवीला जाण्यास आमदारांना 'सवलत' नव्हती! काय सांगावे! निमित्त लघवीचे करून खाली असलेल्या पत्रकारांना कोणीतरी रिपोर्ट द्यायचा! पण आमदारांचा पारा वाढलेला, संताप पराकोटीला पोचलेला! त्यामुळे त्यांचा आवाज खालपर्यंत यायचा! पत्रकारही हुशार. रात्री खूप उशिरा बैठक चालणार; मग थोडासा वृत्तांत कशाला द्या, उद्या सविस्तर माहिती घेऊ आणि सकाळीच मजकूर देऊ, म्हणजे जागाही भरपूर मिळेल. वार्ताहरांचा हा हिशोब तर 'महाराष्ट्र टाईम्स' वा त्याच्याच जोडीला आणखी एखादा अपवाद वगळला तर बाकीच्या दैनिकांचे संपादक, वृत्तसंस्था कमरेत वाकलेल्या! काय घडले हे जनतेला सांगायला जायच्या आधी सी. एम. काय म्हणतील या विचाराने पछाडलेले, वृत्तपत्र स्वातंत्र्य विरोधकांवर टीका करण्यापुरत्या मर्यादेत बसवलेले हे पत्रकार! सरकारच्या मदतीवर चाललेल्या वृत्तसंस्थांना महिन्याच्या वर्गणीचाच विचार अधिक! पी. टी. आय. ही प्रमुख वृत्तसंस्था. तिला आपल्या नियंत्रणाखाली ठेवले की काम झाले. त्यामुळेच साकेतमध्ये रिपोर्टर्सना जागा मिळते. तेच राजकीय रिपोर्टिंग करतात ना!
□

असंतोष कमी करण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून मंत्रिमंडळ वाढीचा प्रयोग केला गेला तर पवारांकडे गृहखाते राहणार नाही असे ऐकू येते. पवारांनाही त्याची जाणीव असावी. हल्लीच दोन गटात गृहखाते विभागले गेले आहे. त्यामुळे पोलिसांची कोण पंचाईत झाली आहे! हॉटेलात गेलो तर येणारा वेटर खराच वेटर आहे का, अशी शंका पवार व त्यांच्या अगदी जवळच्या मित्रांनाही येते म्हणे! विधानसभेच्या वाचनालयात पवार व त्यांचे काही मित्र बऱ्याच वेळा आपापसात चर्चा करतात; त्याचा परिणाम असा झाला की, वाचनालयात सी. आय. डी. उगाचच डोळ्यापुढे पेपर धरून बसत आहेत. विधानसभेच्या आवारात सी. आय. डी. चा आजपर्यंत कधी नव्हे इतका सुळसुळाट झालाय. एक पत्रकार सांगत होता की, पवारांच्याकडे जाताना सी. आय. डी. चे दोन-तीन लोक हॅलो करतात. आम्ही तुम्हाला पाहिले आहे हे दाखवण्याकरता. येथे सी. आय. डी. आहेत म्हणून पवारांकडे जाणे नको असे वाटते; याकरता हा 'हॅलो' असतो असे पत्रकारांचे म्हणणे. एक वरिष्ठ मंत्री म्हणतो, आमच्या लोकांवर दडपणे आणली जातात. त्यांचा ससेमिरा चालला आहे. वरिष्ठ अधिकारी म्हणतात, 'आमची तारेवरची कसरत चालू आहे!' प्रश्न पडतो, हे खरेच का घडत असेल? असेल तर मग पवारांकडून गृहखाते काढून घेणार हेही खरेच म्हणावे लागेल!
□

'सध्याच्या हालचालींमुळे नाईकसाहेब डिस्टर्ब वाटतात!' नाईकांच्या जवळच्या माणसाला, विधान परिषदेच्या एका सदस्याला विचारले, त्यांनी जे सांगितले ते आणखीनच धक्कादायक:

'त्या सभेपासून......'

'पंतप्रधानांच्या नागपूरच्या?' मी.

'त्या सभेचं सोडा; पण वरूडच्या सभेचं काय?'

वरूडची नाईकांची सभा उधळली एवढंच सामान्यांना माहिती होते! पण हे आमदार सांगत होते, 'वरूडच्या सभेत नाइकांना 'मॅनहँडल' केले! आणि करणारे लोक काही विरोधी पक्षांचे नव्हते! त्याचे दुःख त्यांना वाटणार नाही तर काय होईल? तेव्हापासूनच डिस्टर्ब आहेत' तो सांगत होता.

साहेब डिस्टर्ब, अनुयायी असंतुष्ट! साहेबांच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांत साहेबांनी 'जावे' यावर एकमत. यामुळे राज्यात काय बदल होणार याविषयी अनेकांचे अनेक तर्क—असे महाराष्ट्राचे राजकारण चालू आहे. कोणीही कशाचा ताम्रपट घेऊन आलेला नाही हे खरेच. पण नाईकांनी दहा वर्षांची कारकीर्द झाल्याच्या निमित्ताने धुरा सोडली असती तर दुष्काळाच्या वेळी त्यांची कर्तबगारी उजळली होती त्यात आणखी भर पडली असती; पण सत्तेचा मोह कसा व किती प्रबळ असतो हे सत्तेवर नसणारांना कसे समजून येणार? माझ्याजवळच नाईकांनी १९६९ व १९७१ च्या मध्यास 'राजकारण फालतू आहे, कोण करतो ते! आपण आपली शेती करणार'. असे उद्‌गार काढले होते. तरीही सत्तास्पर्धेत ते अजून आहेत त्या अर्थी सत्तेत तसेच काही तरी प्रभावी, मादक द्रव्य असलेच पाहिजे! शेतीपेक्षा मोठी आवड निर्माण करण्याजोगे! □

—माहितगार

# इंदिराजींची पुणे भेट

# पेच टळला पण यशस्वीही नाही !

प्रतिनिधी

खूप गाजत राहिलेली इंदिराजींची पुणे भेट परवा संपली. ती यशस्वी झाल्याचा दावा खुद्द श्रीमती इंदिरा गांधींनीच हैदराबादेत पोचताच केला. 'तुरळक काळे झेंडे, काही विरोधी घोषणा ह्यांचा अपवाद वगळता, पुणेकरांनी मला उत्स्फूर्त साथ दिली,' असे त्यांनीच हैदराबादेत वार्ताहरांना सांगितले. महाराष्ट्र काँग्रेसने तर इंदिराजींची भेट यशस्वी करण्याचा विडाच उचलला होता. त्यांची नेतेमंडळी एरवी कधीही हिंडत नाहीत इतक्या जोमाने खेड्यापाड्या-तून हिंडली. सारा पश्चिम महाराष्ट्र त्यांनी ह्या भेटीच्या संदर्भात ढवळून काढला. साखर कारखानदारीत अनेक बऱ्या-वाईट गोष्टी घडत असतात. त्यातून सामान्य जनतेला मिळणारी साखर रोजच्या रोज कडू होत चालली आहे. त्यातल्या गुन्हेगारांविरुद्ध लाठ्या काठ्या घेऊन चला असे कधीही वसंतरावदादा पाटील ह्यांनी म्हटल्याचे स्मरत नाही. पण इंदिराजींच्या भेटी संदर्भात मात्र त्यांनी तसे म्हटले. पुण्याचे महापौर श्री. शांताराम दिवेकर ह्यांच्या कृति समितीने भ्रष्टाचार, काळाबाजार, महागाई, टंचाई वगैरे सामान्य जनतेच्या जीवनाशी खेळणाऱ्या प्रश्नांकडे पंतप्रधानांचे लक्ष वेधण्या-साठी प्रखर निदर्शनांचा बेत आखला. प्रसंगी 'इंदिराजींना पुणे बंद'चा प्रयोगही ही कृति समिती राबविणार होती. ह्या साऱ्या विरोधी निदर्शनांचा प्रतिकार करण्यासाठी 'लाठ्या-काठ्या घेऊन पुण्याकडे चला' असा आदेश वसंतरावदादांनी दिला होता! शिवाजीनगर चौकाजवळ, एस. एस. सी. बोर्डाच्या ऑफीससमोर, इंदिराजींच्या स्वागतासाठी जमलेल्यांकडील झेंड्यांचे जे वर्णन मला तिथल्याच काही लोकांनी नंतर ऐकवलं, किंवा संध्याकाळी रेसकोर्स-कडे गेलेल्या अनेक मोर्चातल्या लोकांच्या हातातले जे झेंडे मी बघितले, त्यावरून लोकांनीही वसंतरावदादांचा आदेश पाळला असे मला वाटते. अडीच तीन फूट भल्या भक्कम दंडुक्यावर छोटासा कागदी झेंडा असे ह्या झेंड्यांचे स्वरूप निदान मला तरी पाह्यला मिळाले. 'त्यातल्या झेंड्याकडे साफ दुर्लक्ष करून दंडुक्यांचा फर्मास उपयोग काँग्रेसवाल्यांनी इंदिराजी लोहगाव विमानतळावरून पुण्यात येण्यापूर्वी, वर उल्लेखिलेल्या चौकात केला; त्यातूनच दंगल उसळली व श्रीमती गांधींचा मार्ग उधळला गेला....' असे मला जवळच्याच एका पेट्रोल पंपवाल्याने सांगितले.

ह्या ठिकाणी सहज आठवण झाली म्हणून जाता जाता एका गोष्टीचा उल्लेख करायला हरकत नाही. महागाई विरोधात व सरकारच्या कामगारविषयक धोरणाच्या विरोधात, सुमारे दोन-तीन महिन्यापूर्वी मुंबईला निघालेला एक मोर्चा मला आठवतो. डाव्या कम्युनिस्ट मंडळींनी हा मोर्चा आयोजित केलेला होता, व सुरुवात भांडुपपासून होणार होती. मोर्चाला सुरुवात होत असतानाच, पोलिसांनी हा मोर्चा अडवला. सरकारी फतवा दाखवून, मोर्चात घेतलेल्या झेंड्यांच्या दांड्यांची व निशाणांच्या दांड्यांची लांबी मर्यादे-पेक्षा जास्त असल्याचे सांगून, हे झेंडे, निशाणे त्यांनी मोर्चेकरांना काढून टाकायला भाग पाडले. दोन-तीन महिन्यात ह्या नियमांमध्ये बदल झाला असेल हे संभवत नाही. मग पुण्यात पोलिसांनी ह्या दंडुक्यांना आक्षेप आधीच का घेतला नाही? काँग्रेसचे दंडुके आणि विरोधकांचे दंडुके यात काही फरक वरील फतव्यात केलेला तर नाही ना हे प्रथम तपासले पाहिजे! दुसरे म्हणजे वसंतरावदादा पाटील, शरद पवार, धारिया आदी मंत्र्यांनीच काँग्रेसजनांना दंड थोपटायला सांगितले असल्यामुळे, 'आता त्याला आमचा तरी काय इलाज?' अशी भूमिका बहुधा: पोलिसांनी स्वीकारलेली असावी.... काही का असेना, काँग्रेस जनांच्या हातातले भलेमोठे दंडुके कुणालाच खटकले नाहीत एवढे मात्र खरे!

वसंतराव दादांचे आवाहन, इतर नेत्यांची धावपळ यातून इंदिराजी खूश झाल्याची पावती मिळाल्यामुळे काँग्रेसजन साहाजिकच खूश आहेत. विरोधी पक्षांच्या नाकावर टिच्चून आम्ही इंदिराजींना पुण्यात आणलं, त्यांची जंगी सभा पार पाडली. त्यांच्याकडूनच वाहवा मिळवली, असेच ही मंडळी साहाजिकच म्हणत आहेत. आणि एका अर्थी ते खरेही आहे. पुणे विद्यापीठ आणि रेसकोर्स दोन्ही ठिकाणचे प्रमुख जाहीर कार्यक्रम लौकिकदृष्ट्या यशस्वीच झाले. गर्दी दोन्ही ठिकाणी भरपूर होती. दोन्ही ठिकाणी कसलीच गडबडही झाली नाही व ह्या दोन कार्यक्रमांसाठीच प्रामुख्याने ही भेट असल्याने, ही भेटही पर्यायाने यशस्वीच झाली असे म्हणता येईल. पुण्या-मुंबईच्या सर्व प्रमुख वृत्तपत्रांचा सूर पाहिला तर तो याहून वेगळा नाही....

तिकडे विरोधी गटही 'जितं मया' अवस्थेत आहे. 'इंदिराजींचा मार्ग आयत्यावेळी बदलला गेला, हीच विरोधी गटाच्या निदर्शनांच्या यशस्वीतेची पावती आहे.' असा सूर त्या दिवशीच्या संध्याकाळच्या विरोधकांच्या शनिवारवाड्यावरील सभेत, साधारणत: धरला गेला होता. शिवाजीनगर चौकाजवळ, इंदिराजी येण्यापूर्वी जो गोंधळ उडाला त्याचे वर्णन तिथे प्रत्यक्ष हजर असणाऱ्या एका व्यक्तीने पुढीलप्रमाणे केले, '...विरोधक एका बाजूला; दुसरीकडे काँग्रेस-वाले. रस्त्यावर नियंत्रण करायला शिरस्त्राणधारी एस आर पी वाले. विरोधी गोटातली एक म्हातारी बाई, चुकून रस्त्यावर उभारलेल्या

निदर्शन रेषेच्या पुढे आली. एका एस आर पी वाल्याने हातातली काठी त्या म्हाताऱ्या आजीबाईंवर उगारली. लोकांचे पित्त खवळले. एकाने धावत पुढे जाऊन त्या शिपायाच्या हातातली काठी रोखून धरली. शिपायालाच दोन रट्टे लगावले. त्याबरोबर, हातातले झेंडे उलटे करून, काँग्रेसवाले विरोधकांवर तुटून पडले. मग विरोधकही चिडले. मिळेल त्या साधनाचा उपयोग करून त्यांनी काँग्रेसवाल्यांना पिटायला सुरुवात केली. त्याचवेळी दलित पँथर्सच्या खांद्यावर स्वार होऊन महापौर दिवेकर तिथे आले. विरोधकांना आणखीनच चेव आला. काँग्रेसचे गुंड किती झाले तरी भाडोत्रीच. ते पळू लागले, तेव्हा एस आर पी वाल्यांनी विरोधकांवर अश्रूधुर, लाठीमार ह्यांचा तुफानी हल्ला चढवला. ह्याऐवजी एका पेट्रोलिंग मोटर सायकलला तो रस्ता पार करण्यासाठी अर्धा तास लागला. अर्थातच इंदिरा गांधींचा मार्ग बदलणे म्हणूनच त्यावेळी आवश्यक ठरले...'

## दहा हजार पोलिस होते म्हणे

ह्या छोट्याशा दंगली पाठोपाठ शनिवारवाडा, कसबा वगैरे भागात तुरळक दंगली उसळल्या. महापालिकेची एक जीप जाळण्याचा प्रयत्न झाला. ह्याच्या आजूबाजूच्या परिसरात थोडंसं भीतीचं वातावरण पसरले. इंदिराजींच्या भेटीनिमित्त जे काही 'सनसनाटी' म्हटलं जाईल असं नाटय घटलं ते एवढंच! मंत्र्यांना पुण्यात पडलेले घेराव, काँग्रेस आमदारांवर ओढवलेले प्रसंग ह्यामुळे व कृतिसमितीच्या प्रवक्त्यांच्या भाषणामुळे इंदिराजी येथील तेव्हा पुण्यात फार मोठं रामायण घडतं की काय असं वाटायला लागलं होतं. ना. वसंतराव दादा पाटील, ना. शरद पवार आदी काँग्रेस मंत्र्यांच्या भडक भाषणामुळे व ह्या मंत्र्यांच्या आव्हानाला कृतिसमितीच्या नेत्यांनी दिलेल्या प्रतिआव्हानामुळे पुण्याची रणभूमी गाजणार असं वाटू लागलं होतं. पण नंतर एकाएकी वेगवेगळ्या घटना घडू लागल्या. संपूर्ण महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणावर पोलीस फोर्स पुण्याकडे वळवला जाऊ लागला. एका माहितीनुसार राज्यभरातून गोळा केलेले व एस. आर. पी. मिळून दहा हजारांच्या आसपास पोलीस पुण्यात अक्षरशः ओतले गेले होते. काही छोट्या ठिकाणच्या पोलीस चौक्यांना त्या दिवशी अक्षरशः कुलूपं ठोकण्यात आली होती, तर येरवड्यासारख्या तुरुंगात केवळ नाममात्र लोक ठेवण्यात येऊन बाकीच्यांना बंदोबस्तासाठी रेसकोर्सवर, लोहगाव विमानतळावर पिटाळलं गेलं होतं अशी अगदी आतल्या गोटातली बातमी एकानं मला कॉफी हाऊसमध्ये पुरवली. 'त्याच्या म्हणण्यानुसार, 'येरवड्याच्या कैद्यांनी ठरवलं असतं तर इंदिराजींच्या आगमनाच्या मुहूर्तावर तिथल्या सर्वांना स्वतःची सुटका करून घेता आली असती'.'

ह्या प्रचंड बंदोबस्ताने, पंतप्रधानांच्या वाटेवर व विद्यापीठ आणि रेसकोर्स इथल्या सुरक्षा व्यवस्थांनी कृतिसमितीला चांगलाच हादरा दिला. त्याचप्रमाणे, युक्रांद, पँथर्स, समाजवादी, यु. सं. समिती आदी लढाऊ संघटनांच्या चार-पाचशे धडकशील तरुणांना आदल्या दिवशीच शासनाने अटक केल्यानेही कृतिसमितीला तडाखा बसला. त्यामुळेच, ऐनवेळी, प्रत्यक्ष लढाऊ निदर्शनांच्या ऐवजी शांततापूर्ण पण जोरदार निदर्शने करण्याचा कार्यक्रम कृतिसमितीला जाहीर करावा लागला. पंतप्रधानांचा रस्ता अडवण्याऐवजी, त्यांच्या वाटेवर काळे झेंडे घेऊन उभे राहण्याचा पर्याय कृतिसमितीला स्वीकारावा लागला. इथेच, निदर्शनं संपली होणार, पुण्यात काही फारशी गडबड होणार नाही अशी अटकळ अनेकांनी बांधली व ती चुकीची ठरली नाही. उलट जे काही थोडंसं नाटय तिथे घडलं त्याचंच अनेकांना आश्चर्य वाटलं.

एवढं सारं असूनही आणि बंदोबस्त व इतर गोष्टींवर प्रचंड पैसा खर्च होऊनही इंदिराजींची भेट खऱ्या अर्थाने यशस्वी झाली असं मला वाटत नाही. १९७१, १९७२ मध्ये इंदिराजींनी महाराष्ट्राचा दौरा केला होता. त्यावेळच्या त्यांच्या सभा मला आठवतात. 'She Came, She Saw, She Won.' अशा थाटात इंदिराजींचे तेव्हाचे दौरे पार पडल्याचे मला चांगले आठवते. १९६७ मध्ये काँग्रेसला हादरा बसला होता. १९७१ मध्येही जनमत वरवर तरी विरोधी वाटत होते. सर्व महत्त्वाचे विरोधी पक्ष एकत्र झाले होते. त्यांच्या एकेका अधिरथी महारथींनी इंदिराजींविरुद्ध तोफा डागलेल्या होत्या. आणि तरीही तशा अवस्थेत इंदिराजींच्या सभा होत होत्या. तुफान गर्दी असळत होती. इतकी की सभेसाठी केलेली व्यवस्था अपुरी पडत होती. त्यावेळची त्यांची भाषणे ठासून होत असत. ज्या पद्धतीने त्यावेळी इंदिराजी एकामागोमाग एक सभा एका आवेषाने जिंकीत गेल्या, ते पाहिले की वाटायचे इंदिराजींनी आपल्या पिताजांनाही ह्या क्षेत्रात मागे टाकले आहे.

## सुमार भाषणे

ह्या संदर्भात पुण्यातला एकूणच कार्यक्रम मला अगदीच अयशस्वी वाटला. विद्यापीठाच्या आवारात उभारण्यात आलेला खास मंडप अर्ध्यापेक्षा जास्त रिकामा होता. तीच गत रेसकोर्स मैदानावरची! विद्यापीठाच्या समारंभात, विद्यार्थी व शिक्षक ह्यांच्यापेक्षा इतरांचीच गर्दी जाणवत होती; तर रेसकोर्सवरील सभेत पुणेकरांपेक्षा बाहेरून ट्रक्स भरभरून मुद्दाम आणलेल्या मंडळींचीच भरती जास्त वाटत होती. ह्याचा साहजिक परिणाम म्हणून की काय कोण जाणे, इंदिराजींची दोन्ही ठिकाणची भाषणे सुमारच झाली. सध्याचा विद्यार्थ्यांमधला असंतोष, महागाईने त्रस्त झालेली, चिडलेली जनता व तिचे देशभर सुरू असलेले उठाव ह्यांचा योग्य पद्धतीने परामर्श घेऊन काही भरीव उपाययोजना त्या सांगतील अशी अपेक्षा होती पण त्यांनी नेहमीचेच उपदेशाचे डोस जनतेला पाजले. गुजराथेतल्या जनतेला, प्रचंड आंदोलन केल्यावर, अनेक मुडदे पडल्यावरच धान्याच्या प्रमाणात वाढ करून मिळाली ही वस्तुस्थिती डोळ्यासमोर असताना, 'हिंसाचार करू नका, हिंसेने मी दबणार नाही' वगैरे नेहमीची पालुपदे आळवून त्यांनी सभा कशा यशस्वी केल्या ते एक काँग्रेसवालेच जाणोत. पुण्यात काय किंवा मुंबईत काय, दडवलेला माल बाहेर येऊन लोकांना तात्पुरता दिलासा मिळतो तो देखील विरोधकांच्या दंडेलीनेच ही वस्तुस्थिती आहे. शासनाने किंवा काँग्रेसने त्यांच्या 'सनदशीर' मार्गानी असा माल बाहेर काढल्याचे आजपर्यंत तरी माझ्या ऐकिवात नाही. दंडेलीनेच असे प्रश्न सुटत असताना व तशीच वेळ आल्याशिवाय पावले उचलायची नाहीत हेच धोरण सातत्याने काँग्रेस सरकारने अवलंबिले असताना इंदिराजी असा उपदेश करतात हे नवलच म्हणायचे नाही काय?

इंदिराजींच्या भेटीचा आणखी एक भाग म्हणजे जमदलेले

पृष्ठ ३७ वर

शतपावली

# नटवर्य नानासाहेब

रवींद्र पिंगे

सत्तरी ओलांडलेला माणूस नेहमीच जगन्मित्र असतो. व्यक्तिगत वैरभावाला त्याने तिलांजली दिलेली असते. अखेर, आपण सारे एक आहोत; आपण सर्वांनी एकमेकांना सांभाळून घेतलं पाहिजे; अरे हिंदूंना कोणी वाली उरलेला नाही रे; आपण एकमेकांकडे येत जात असावं; एकमेकांविषयी अगत्य दाखवावं; देवाची दया भाकावी आणि ज्याचं त्याचं श्रेय काडीमात्र दुस्वास न करता ज्याच्या त्याच्या ओंजळीत टाकावं; पिकलेल्या केसांचा आपल्या संस्कृतीत सांगितलेला आदर करावा, आणि सर्वांची भलाई जोडावी, असं मोठं रीतीचं बोलणं सत्तरीच्या शीवेपलीकडे पाऊल ठेवलेला माणूस मोठ्या उमाळ्याने करतो. नानासाहेब फाटक ह्याला अपवाद नव्हते. सत्तरी पलीकडले नानासाहेब अतिशय हळुवार, अगत्यशील आणि दयार्द्र झाले होते. सत्तरीच्या अलीकडले नानासाहेब ही फार तिखट आणि कुणाची भीड-मुर्वत न जाणणारी चीज होती. त्यांचे हे दोन्हीही अवतार आम्हा रेडिओवाल्यांच्या दैनंदीन परिचयाचे होते. पन्नाशीच्या अलिकडले नानासाहेब मलखांबासारखे ताठ आणि मिरचीसारखे तिखट होते म्हणतात. पण त्या झाल्या सांगोपांगीच्या गोष्टी. नानासाहेबांना आम्ही देखलं ते त्यांच्या उत्तरायणात.

पुणावाडी; दादर.

त्यांच्या अगदी बाळबोध अशा घरी मी आलेलो आहे. सकाळच्या उन्हांच्या प्रकाशाने घर आतून अगदी उजळून निघालं आहे. नाना अगदी घरगुती वेषात आहेत. पट्ट्यापट्ट्याची तोकडी चड्डी. अंगात सॅन्डो बनियन. जानवंही आहे. दातांची कवळी आहे हे स्पष्ट जाणवतं. शरीर पक्कं कमावलेलं वाटतं. बोलणं वाऱ्यासारखं मोकळं मोकळं. आत-बाहेर असं काही नाही. सगळं काही खुल्लं खुल्लं. ह्या माणसाचा पिंड भटजीचा आहे आणि नट हा जरी ह्याचा पेशा असला तरी हा अंतर्यामी कुठेतरी स्थिर वृत्तीचा कुटुंबाळू घरवाला आहे, ही त्याची मनावर पडणारी पहिली छाप.

'नाना, सध्या तुमचं बरं चाललंय ना ?'

'देवदयेनं बरं चाललंय बाबा. तसं माझं नेहेमीच बरं चालत आलंय. मी पैसे उधळले नाहीत कधी. तशात माझी बायको म्हणजे साक्षात देवता होती. तिने मला काहीही उणं पडू दिलं नाही. बरीच वर्षं ती क्षयाने आजारी होती. पण तिची सोबत होती. आता ती गेल्यापासून एकाकी वाटतं. बाकी मुलगा व्यवस्थित आपल्या मार्गी आहे, सूनबाई चांगली शिकली-सवरलेली आहे. आता नव्या काळमानाप्रमाणे ती नोकरी करते. आज ते आवश्यकच आहे म्हणा. उरलं कोण ? मी आणि माझा नातू. आम्ही एकमेकांना आहोत. पूर्वी ह्याच गॅलेरीत धुमाळ रहायचा. बारा वर्षं माझ्या घरी होता. नाटकात माझ्याबरोबर कामं करायचा. जी काही बिदागी मिळे ती माझ्या बायकोच्या स्वाधीन करायचा. ते पैसे माझ्या बायकोने नीट संभाळून ठेवले होते एका पेटीत.'

'तुम्ही नवीन मंडळींना अभिनय शिकवण्याचे वर्ग का काढीत नाही. तुमचं नाव फार मोठं आहे. खूप लोक येतील. अनायासे तुमची विद्या पुढल्या पिढीकडे सुपूर्त होईल नि शिवाय तुम्हाला चार पैसेही सुटतील.'

'नव्या पिढीत शिक्षणाची ओढ आहेच कुणाला ? कुणालाही खर्ची म्हणून कस ते पडायला नको. काशीनाथने सुधाकराचं काम बसवून घ्यावं असं मला फार वाटतं. पण मी जो सूर लावतो, तसा तो लावायला गेला तर त्याच्या छातीचं डबडं होऊन जाईल. त्याने शरीर मुळी कमावलंच नाही. What a sad thing. ह्या नव्या पिढीत सर्वांगसुंदर नट श्रीकांत आहे. अंगयष्टी, आवाजी, भूमिकेची नीट समज, नजर, तरतरीतपणा आणि लवचिक चेहेरा ह्या सगळ्या गोष्टी त्याच्याकडे दिसताहेत बुवा. Let us see how he develops.'

'नाना, बहुतेक सगळ्या हिरोंनी नाटक कंपन्या काढून झाल्या; मग तुम्हालाच आपली स्वतंत्र कंपनी काढण्याची बुद्धी कशी काय झाली नाही ?'

'त्याचं असं आहे की नटाने कंपनीची मालकी स्वीकारली की त्याचं सगळं चित्त गल्ला किती जमला आहे इकडे लागतं आणि अभिनयाचं खोबरं होतं. मीसुद्धा तसा प्रयोग करून पाहिला होता. हॅम्लेटचे आठ-दहा प्रयोग माझे मीच अंगावर लावून पाहिले. पण व्हायचं काय की, स्टेजवर मी इकडे चंद्रसेनची कॉपी बोलायचा तेव्हा माझं सारं लक्ष थिएटरच्या बाहेर प्लॅनवर बसलेल्या माणसाकडे असायचं. डोक्यात पैशांचा हिशोब नि जिभेवर सरस्वती म्हणजे डुक्कराची नि मोराची जोडी ! तेव्हा ठरवलं की बाबा, कंपनी काढणं ही आपली लाईन नाही. तुम्ही शंभर रुपये रोख मोजा नि लागेल ती लहान-मोठी भूमिका माझ्याकडून वदवून घ्या. तुम्ही सांगाल तिथे मी हजर राहीन. तुम्ही सांगाल ती वाक्यं बोलेन. वाक्यं चार असोत की चारशे असोत, आपला रेट एका नाईटला शंभर. नि मला त्याची यत्किंचितही लाज वाटत नाही. अरे आपण धंदेवाईक नट आहोत. रंग लावून उभं रहाणं हेच आपलं काम. ह्या धंद्यात वणवण होणार हे आपल्याला माहीत आहे.'

'काही नट-मालक गबर झाले ह्या धंद्यात.'

'खोटं आहे. तुम्ही फक्त बाहेरचा भपका बघता. अंदरकी बात आम्हाला ठीक माहीत असते. बाबुराव पेंढारकर उत्तम नट. त्यांनी कंपनी काढली. उदोउदो झाला. लोकांना फक्त त्यांचे बसायचे गालीचे दिसले. त्या गालीच्यांच्याखाली कुठली लाकडं जळत होती ते मला विचारा !'

'हल्ली नाट्यसमिक्षणं छान होतायत. त्यांचा उपयोग होईल नव्या नटांना ?'

'छे ! झालाच तर सकाळी मुलांची शी काढायला होईल. अरे, एकाचा तरी अभ्यास आहे काय रे ? हे म्हणे माझ्या हॅम्लेटबद्दल लिहिणार ! पण ह्यांनी हॅम्लेट मुळातून वाचलंय का ? काय कळलं ह्यांना हॅम्लेटचं ? किती पाठभेद माहीत आहेत यांना ? मी

छातीठोकपणे सांगतो की जन्मभर मी हॅम्लेटचा अभ्यास करीत आलेलो आहे. असं एक पुस्तक नसेल हॅम्लेटवर की जे मी परत परत वाचलेले नाही. अरे, अत्रे एवढे मोठे स्कॉलर. पण तेही म्हणत की नाना, तुम्ही जसा शेक्सपिअरचा अभ्यास केलाय तसा मी पदवीपरीक्षेसाठीही केलेला नाही! हे नवे टीकाकार अत्रेंच्या पासंगाला तरी पुरतील काय? काय बोलता राव!'

'तुम्ही इतक्या भूमिका केल्यात, त्यातल्या कुठल्या भूमिकेने तुम्हाला झपाटून टाकलं?'

'त्यागराजाच्या भूमिकेने मी अगदी वितळून गेलो. वाटलं, अंगावर घातलेली भगवी वस्त्रं अशीच ठेवावीत आणि हिंदु मिशनरी व्हावं! पण कुठलं काय नि कुठलं काय! आम्ही पोटार्थी नट माणसं. रंग लावायचा, पुसायचा, पुन्हा लावायचा नि पुन्हा पुसायचा, हेच आमचं लाईफ.'

'तुम्ही नट म्हणून तुमच्यांवर मोहब्बत करणारी माणसं होती का तुमच्या जवानीत?'

'तर! माझे फॅन्स गावोगाव होते. ते मला खुशीत ठेवायचे. आम्ही पोटभर मजा मारलेली माणसं आहोत हो! ते दिवसही वेगळे होते. स्वस्ताईही होती. लोकांना ख्यालीखुशाली करायला वेळही होता. Those days are gone; their sweet memories remain!'

ह्या संवादाचा तुकडा असंख्य तुकड्यांतला एक. रेडिओवर त्यांना पाचारण करायला आम्ही त्यांच्या घरी अनेकवार जायचे. दरवेळी ते आमंत्रण झटकून टाकीत. म्हणत, 'अरे, कशाला रे ह्या म्हाताऱ्याची विटंबना करता आता? काय उरलंय माझ्यापाशी? ज्यांनी माझ्या जुन्या दरकाळचा ऐकल्या आहेत, ते माझा ह्या वयातला आवाज ऐकून मला क्षमा तरी करतील का? खरंच नको. आम्ही एकेकाळी मोठ्या कष्टाने कमावलंय ते असं पाच मिनिटांत गमावता कामा नये. दया करा बाबांनो माझ्यावर. हं, वाटल्यास मुलाखत घ्या माझी. विचाराल त्या प्रश्नाला आपल्याकडे उत्तर तयार आहे. पण श्रुतिकेत काम नको.'

त्यांच्या मुलाखती नीट जतन केलेल्या आहेत.

लोक मोठ्या उमाळ्याने त्यांच्या नाटकांना गर्दी करायचे. नाना साठीत आहेत हे त्यांना माहित असायचं. परंतु गुणी कलावंतांना सांभाळून घेतलं पाहिजे, हे रसिकांना कुणी शिकवाव लागत नाही. पदरमोड करून स्वखुशीने आलेले प्रेक्षक नानांच्या स्वरांचे आरोह-अवरोह ऐकून तृप्त व्हायचे. ही अगदी कालपरवापर्यंतची गोष्ट आहे. त्यांच्या कवळीची हिरडीवरची पकड सैल झाली होती. त्यामुळे शब्दांमध्ये खुळखुळ्यासारखा आवाज व्हायचा. प्रेक्षकांनी तेही गोड करून घेतलं. काही वेळा तर वाक्याची फेक करताना त्यांची कवळी तोंडातून चक्क बाहेर उडे! परंतु तेवढ्यामुळे तुडुंब भरलेल्या नाट्यगृहात त्यांचा कुणी अवमान केला असं झालं नाही. लोक नाराज होत तेव्हाच की जेव्हा मद्यप्राशनामुळे नानांची स्मरणशक्ती लुळी पडे. त्यांच्या वाक्यांचे संदर्भ चुकत, काही वाक्यं गाळली जात, कधी कधी रंगमंचावर साथ करणाऱ्या कलावंतांबरोबर अनावश्यक लगट करीत. हे प्रमाद होते. पण कृतज्ञ रसिक क्षमाशील होते. नाना हे जाणून होते. नाना पट्टीचे पिणारे. रंगमंचावरसुद्धा बेधडकपणे पिणारे. ते सुद्धा हे छातीठोक सांगत. पण जगात शेराला सव्वाशेर सर्वत्र आहे. नुकतीच कोकणात एक बैठक बसली होती. संगतीला नव्या दमाची कलावंत मंडळी होती. ही कच्ची पोरं काय पिणार, ह्या भावनेने नानांनी पटाईतपणे घ्यायला सुरुवात केली. पण नव्या पिढीने सोडा-लिंबूचा आधार न घेता कच्ची कंट्री ठोकायला सुरुवात केली. सर्वांनी आकंठप्राशन केलं. तरीही प्रत्येकजण ठीक शुद्धीवर होता. आणखी मागत होता. नाना अवाक झाले. हात जोडून म्हणाले, 'मंडळी, माझा जन्म पिण्यात गेला. मी गॅलनवारी प्यायलो असेन. पण तुमचा प्रताप विशेष आहे, साल्यांनो कच्ची पिता? कच्ची? मी तुम्हाला शरण गेलो. मंडळी तुम्ही माझे गुरु आहात!'

नानांनी काही लोकांवर मंत्र टाकला होता ह्यात शंका नाही. बेचाळीस-त्रेचाळीस साल असेल. मुंबईत थंडी पडली होती. उमाकांत ठोमऱ्यांना घेऊन ते दादरला एका बारमध्ये गेले. प्यायले. नंतर पैसे देऊ लागले. तोच पलीकडच्या स्टुलावर बसलेला एक अनोळखी वोहरी व्यापारी आडवा आला. नानांना म्हणाला, 'तुम्ही नाही पैसे द्यायचे तुमचे पैसे मी देणार.' नाना म्हणाले, 'अरे, पण का? मी घेतलीय, मी पैसे देतो.' तो व्यापारी म्हणाला, 'असं कसं? तुमची नाटकातली किती तरी कामं बघून आपण खूश होऊन गेलो. तुम्ही मला आनंद दिला. आता तुमचे पैसे मला भरू द्या.'

कलावंताचा हात पेरता असतो. कुठे नि केव्हा काय उगवेल त्याची कींद मांडता येणार नाही.

नानांना मोटारींचा शौक होता. त्यांची एक बिबट्यासारखी लांबट आकाराची रेसर कार होती. आपली मोटरगाडी आहे ह्याचा त्यांना सार्थ अभिमान होता. ते म्हणत, 'स्वतःची गाडी असलेला मी एकुलता एक हिरो आहे. बापू पेंढारकरांची सुद्धा गाडी होती. पण ते कंपनीचे मालकही होते. मी नोकरदार नट. तरीसुद्धा माझ्याकडे गाडी आहे.' मात्र, गाडी असून भागले नाही. पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानात व्ही. आय. पी. मंडळींच्या मोटारींवर तांबड्या रंगाची नंबराची पाटी लावण्याची मुभा असे. संस्थानातला तो एक मान असे. तांबड्या नंबर प्लेटची गाडी दिसली की कोल्हापूरी पोलीस शिटी वाजवीत. सलाम करीत. नानांच्या महत्त्वाकांक्षेने फणा काढली. आपण एवढे नटसम्राट मग आपल्या मोटारीला तांबडी नंबर प्लेट का नको? आपल्यात काय कमी आहे? नानांची त्याकाळी कोल्हापुरात खूप पैरवी असे. नानांचे 'बेबंदशाही' म्हणजे हमखास टाळीचा खेळ. महाराजांना आवडलेला. पण महाराज काही नानांची जमा तांबड्या नंबर प्लेटवाल्या उमरावांमध्ये करायला राजी होत ना. नाना रंजीस आले. मदतीसाठी आसपास शोधू लागले. तर, कर्नल इंगळे दिसले. कर्नलसाहेब बडे मुरब्बी. म्हणाले, 'तुम्ही असं करा, गाडीला तांबडी पाटी बेश मारा. देवासकर महाराजांसारखा फेटा बांधा नि सांजपारीला दणक्यात महाद्वार रोडवर एन्ट्री घ्या. आमची पोलीसं गांगरतील. अटेन्शन करतील. सलाम ठोकतील.'

नानांना पटलं, नाना फेटे मोठे मस्त बांधायचे. इचलकरंजीकरांचा, कोल्हापूरकरांचा, बुधगावकरांचा, जव्हारकरांचा, सोंडूरकरांचा, देवासकरांचा, मिरजकरांचा, असे निरनिराळ्या ढंगांचे फेटे नाना सफाईने

बांधीत. त्यांनी आपल्या रेसरकारला तांबडी पाटी मारून घेतली. देवासकरांचा साफा बांधला आणि रंकाळयाकडून वेशीत घुसत ऐशी ए वन् एंट्री घेतली की रस्त्यावरचे पोलीस चक्रावून गेले. त्यांनी शिट्या फुंकल्या. सलाम ठोकले. नाना कृतार्थ झाले. कर्नल इंगळयांनी हे नाटक महाराजांना ऐकवलं. त्यांचीही तब्येत खुश झाली. म्हणाले, "अरे वा, असा बेमालूम माणूस हाय का नानाराव? मग लावू दे त्याला तांबडी पाटी गाडीला."

नानांच्या गाडीला नंबराची तांबडी पाटी लागली.

ह्या साऱ्या जुन्या गोष्टी. अलीकडल्या नानांकडे त्याखुबातला पाव आणाही शिल्लक नव्हता. शरीर खंगलं होतं. मन अळवाच्या पानासारखं मान टाकून होतं. चिंतामणराव कोल्हटकरांचा नि नानांचा उभा दावा. पण चिंतामणरावांचं प्राणोत्क्रमण झाल्यावर नाना ढेपाळले. हिंदू कॉलनीतल्या बिऱ्हाडातून चिंतामणरावांचा निश्चेष्ट देह खाली आणला होता. इतक्यात नगरपालीकेची पत्र्याची ढकलगाडी आली. चिंतामणरावांचा देह त्या ढकलगाडीवर ठेवला जाणार ह्या विचाराने नानांची कालवाकालव झाली. मी बाजूलाच होतो. ते रडक्या स्वरात म्हणाले, "अरे, ही गाडी कशाला आणली? असं नको—असं नको. हा आपला माणूस आहे. आपण हिंदू आहोत. आपण ह्यांना खांद्यावरून पोहोचवू या." इतकं बोलून त्यांनी 'श्रीराम' म्हटलं आणि चिंतामणरावांच्या ताटीला खांदा दिला. केशवराव दात्यांचं नि त्यांचं तरी कुठे मोठं मेतकूट होतं? पण केशवरावांचं निधन झाल्यावर नानांचे श्रद्धांजलीचे शब्द ध्वनिमुद्रीत करायला मी टेपरेकॉर्डर घेऊन त्यांच्याकडे गेलो होतो. तर नाना नुसते रडले! नंतर डोळे कोरडे पुसून खणखणीत आवाजात म्हणाले, "लोंढे काय, चिंतामणराव काय, दाते काय, किंवा मी काय— अरे, आम्ही एक पर्व निर्माण केलं. आमचे आवाज कसे ट्रायम्फंट लागायचे. लोक आमची कुचाळकी करून म्हणायचे, "हे सगळे देवडीवाले आहेत, त्यांनी फक्त आरोळ्या द्याव्यात." पण मी चॅलेंज देतो— आमच्यासारखे आवाज लावून दाखवा! मूळव्याध होईल तुम्हाला—"

शुद्ध गृहस्थाश्रमी आचारसंहीतेत न बसणाऱ्या काही विशिष्ट प्रकारच्या स्त्रीसुखाची चव नानांना माहीत होती. मात्र समान क्षेत्रातल्या समान महत्त्वाकांक्षा असलेल्या चार दोन स्त्रीया त्यांच्यावर लुब्ध झाल्या, ह्यात विशेष ते काय होतं. तशी ती एक मामूली बाब होती. पण नानांना त्याचं मोठं अप्रुप वाटे. नाना तशी बढाईही मारीत. आडपडदा न ठेवता मारीत. दुय्यम दर्जाच्या कलावंतांनासुद्धा आज काल काही सुखं सहज प्राप्य असतात. त्यांची चव घेऊन ते सारं विसरायचं असतं. भोगलेलं जुनं पान पालटायचं असतं. नवं पान उघडायचं असतं. नियतीचा खेळ न्याहाळायचा असतो. नंतर शक्य तितकं अलिप्त रहायचं असतं. गुरफटायचं नसतं. तो विवेक नानांनी केला नाही. पर्यायाने नानांनी ठोकरा खाल्ल्या. आम्ही खाजगी गप्पांतही त्याची त्यांना कधी आठवण करून दिली नाही. कारण नानांचे पिकलेले केस. आणि अखेर काही काही गोष्टी माणसाला भोगाव्याच लागतात. विशेषतः परस्त्रीच्या संदर्भात. ह्या संदर्भात नानांनी एक मोठी लाख मोलाची गोष्ट केली. त्यांनी स्वतःच्या संसारावरून कधीही नांगर फिरविला नाही. अंथरुणावर दीर्घ काळ खिळून पडलेली एकनिष्ठ पत्नी हेच त्यांनी त्यांचं सौभाग्य मानलं. त्यांची धर्मपत्नी हेच त्यांच्या अंगणातलं तुळशी वृंदावन होतं. इतर सगळी विलायती फुलझाडं.

सत्तरी ओलांडल्यावर नानांना घशाच्या कॅन्सरने गाठलं आणि त्यांची रया संपली. नानांनी कॅन्सर जाळून घेतला. ते बरे झाले. पण मनाने आरपार पिचले. तशात पिऊन पिऊन त्यांची लिव्हर बिघडली. त्यामुळे पायावर सूज आली. ती हटेना. बरं जन्म वाघासारखा काढलेला. त्यामुळे घरात स्वस्थ बसवेना. म्हणून चावडीवर यायचे. साहित्य संघात यायचे. कपडे जुनेच होते. लांबरुंद पेराला शोभेसे बेतलेले ते कपडे आता वाळलेल्या देहयष्टीवर गलथान दिसू लागले. किंचित मंत्रचळेपणा करू लागले. त्याच आठवणी उगाळायचे. फार हळवं हळवं बोलायचे. लोक कंटाळायचे. मग एकटेच स्वतःशीच पुटपुटत निघायचे. त्यांचा तो निराधार अवतार तर बघवत नसे. शर्ट पॅंटीत खोवलेला आहे—आहे, नाही—नाही, पॅंट बेंबीच्या खाली घरंगळत गेलेली. आणि एकदा तर त्यांच्या जाड काचांच्या चष्म्यातून त्यांचे सुजलेले निस्तेज डोळे एखाद्या आजारी जनावराच्या डोळ्यासारखेच विस्फारलेले भासले. मनाशी म्हटलं, नाना संपले.

संपलेले नाना पुढेही दिसत राहिले. लोकांच्याकरवी नानांची तपोवन नट म्हणून उपयुक्तता संपली होती. नानांच्या लेखी इतरांनाही महत्त्व उरलं नव्हतं. घुमाळ नानांचा गंडाबंडा शागिर्द. घुमाळने नानांच्या अमृतमहोत्सवानिमित्त घरी यक्षयाग केला. नानांना विचारले,

"नाना, सांगा, कुणाकुणाला बोलवू तीर्थप्रसादाला?"

नाना शांतपणे म्हणाले, "कुणीही नकोत. फक्त उमाकांत ठोमरेला बोलाव."

नानांना अस्तकाळ समिप आलेला दिसत होता. अगदी अखेरची गोष्ट. नाटचपरिषदेच्या थैसासांना म्हणाले, "मी पिऊन पिऊन आतून इतका पोकळ झालोय की मेल्यावर फार लाकडं लागणार नाहीत. काडी लावली की कापूरासारखा भुर्रकन जळून जाईन!"

ते खरं ठरलं.

□ □


# फिडेल, चे आणि क्रांती

लेखक : अरुण साधू


किमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

## मुक्काम मुंबई

भारतकुमार राऊत

# जेव्हा सचिवालय आळसावते....



गिरगाव आणि सचिवालय या जगाच्या पाठीवरच्या अशा दोनच जागा आहेत की, जिथं मी चुकतो. अगदी हमखास चुकतो. झावबाच्या वाडीतून खोताच्या वाडीत कसं शिरायचं हे जसं मला अद्याप समजलेलं नाही, तसंच पाटबंधारे विभागाच्या कचेरीतून समाज कल्याण खात्यात कसं घुसायचं ते मला उमजलेलं नाही. आता गिरगाव आणि सचिवालय या दोघात चुकायला अधिक सोपी जागा कोणती, असं विचारलंत तर 'सचिवालय' हेच उत्तर. या सचिवालयाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यावरच्या कुठल्याशा ७२९ क्रमांकाच्या खोलीत गेलो की, तिथून बाहेर पडताना अभिमन्यूची चक्रव्यूहातून सुटताना काय अवस्था झाली असेल याची कल्पना येते. भर दुपारी तीनच्या सुमारास या महाकाय बिल्डिंगीत घुसलात आणि न चुकता सहिसलामत ठरल्या वेळेला बाहेर आलात तर जगात कुठेही तुम्हाला सोडलं तरी तुम्ही निर्धास्तपणे परत याल, याची मी खात्री देतो. मला मात्र अद्याप हा किल्ला सर करणं जमलेलं नाही. हल्ली आपण तसा प्रयत्न सुद्धा करीत नाही. तिथली हजारो टेबलं आणि त्याच्या दुप्पट खुर्च्या (अर्थात रिकाम्या). विडीकाडी करून सरकारची इमाने इतबारे सेवाकरणारे चतुर्थ श्रेणी कर्मचारी (उर्फ पिऊन) आपण सरकारचे जावईच, अशा थाटात फिरणारी तिथली जगप्रसिद्ध कारकून मंडळी आणि सर्वावर कळस म्हणजे कॉरिडॉरच्या कोपऱ्या कोपऱ्यात गुलूगुलू गप्पा मारणाऱ्या किंवा तार सप्तकात भांडणाऱ्या सचिवालय कन्या, हे सगळं पाहिलं म्हणजे अस्मादिक पार भांबावून जातात. सहाजिकच आहे. त्यामुळे एकवेळ गिरगावात जाईन पण सचिवालय नको, असा निश्चय आपण केला आहे.

असो. तर हे सचिवालय पुराण लावण्याचं कारण गेल्या ९ फेब्रुवारीला शासकीय कर्मचाऱ्यांनी पुकारलेला लाक्षणिक संप. या ९ फेब्रुवारीला सचिवालयात जाण्याचा योग आला. लांबूनच काही तरी विचित्र जाणवत होतं. दरवाजात गेलो तर एका पोलिसानं अडवलं. कसाबसा आत घुसलो तर 'चौकशी' बंद, म्हणजे पास वगैरे भानगड नाही. लिफ्ट पाशी आलो. रोज जिथं रेशनच्या लाईनी पेक्षाही प्रचंड रांगा लागतात त्या ठिकाणी मी आज पहिला होतो. अर्थात माझ्या मागे कुणीच नव्हतं. पण तरीही मी पहिलाच होतो. दहा मिनिटं वाट पाहिली पण ते सरकारी उद्वाहन खाली यायचं नाव नाही. तेव्हा खोबडीत प्रकाश पडला की आज सचिवालयातल्या शासकीय कर्मचाऱ्यांचा लाक्षणिक संप वगैरे आहे. सहज गंमत म्हणून मी सारं सचिवालय फिरलो. सर्वत्र रिकामी टेबलं फायलींवर पहारा करीत बसली होती. ते अजस्त्र सचिवालय कुंभकर्णा सारखं झोपाळलं होतं. ज्या कॉरिडॉर (सचिवालयाच्या भाषेत छत्रमार्ग) मध्ये हजारो प्रेमं फुलतात ते कॉरिडॉर सुनेसुने होते. कुठल्यातरी केबिनमध्ये 'साहेब' दिसत. पण तेही सुटीच्याच मूडमध्ये होते. एकूण काय ? संप जबरदस्त होता. इतर सरकारी ऑफिसात सुद्धा हीच परिस्थिती होती. मुंबईतल्या जवळ जवळ ३५ हजार शासकीय कर्मचाऱ्यांनी या दिवशी चक्क दांडी मारली.

संप म्हटलं की, एकच प्रश्न कायम पुढे येतो. 'कशासाठी ?' आणि त्याचं उत्तरही कायमच असत 'वेतन वाढीसाठी.' तर हाही संप निसर्ग नियमांनुसार वेतनवाढीकरता होता. कमीतकमी अडीचशे रुपये मूळ पगार हवा अशी मागणी कर्मचाऱ्यांच्या युनियननं केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या युनियनचं एक वैशिष्ट्य आहे की, त्यांच्यात फूट नाही. एकदा संपाची घोषणा झाली की, लगेच सर्वांनी मारलीच दांडी. मग भले ते जाऊन पिक्चर बघतील

पण कुणीही जरी सांगितलं की, 'मानानं पायऱ्या चढा' तरी त्याचा उपयोग नाही. युनियनचे दोन नेते, एम. व्ही. गुब्बी आणि र. ग. कर्णिक यांचा हा पराक्रम. या एकीमुळेच आतापर्यंतचे शासनाबरोबरचे सर्वच लढे कमी अधिक प्रमाणात युनियननंच जिंकले आहेत.

सध्या सरकारच्या कर्मचाऱ्यांचं कमीत कमी मूळ वेतन दीडशेच्या जवळपास आहे. त्यात शंभर रुपयांची वाढ हवी अशी मागणी आहे पण बऱ्याच कर्मचाऱ्याबरोबर बोलल्यानंतर असं लक्षात आलं की, त्यांना पन्नास रुपये वाढ अपेक्षित आहे. पंधराव्या भारतीय मजूर परिषदेनं ठरवलेल्या तत्त्वानुसार प्रत्येक कर्मचाऱ्याला या देशात किमान २५० रुपये मिळायलाच हवेत. हेच तत्त्व धरून कर्मचाऱ्यांनी ही मागणी केली आहे. आपल्या मागणीचं अधिक समर्थन करताना हे कर्मचारी म्हणतात की, आमची मागणी जर सरकारनं मान्य केली तर केंद्रीय कर्मचारी आणि राज्य कर्मचारी यांच्या पगारातली तफावत नाहीशी होईल.

अर्थात आपलं सरकार इतकं बेरकी आहे की, राज्य कर्मचाऱ्यांच्या या मागण्या सहजासहजी मान्य होतील हे संभवत नाही. तसं झालं तर बेमुदत संप करण्याची कर्मचाऱ्यांची तयारी आहे, असं युनियनच्याच एका प्रवक्त्यानं सांगितलं. असा संप झाला तर मग सरकार एक लांबलचक निवेदन प्रसिद्ध करील. ही वेतनवाढ दिली तर त्याचा सरकारवर इतका बोजा पडेल आणि तो शेवटी जनतेलाच सोसावा लागेल वगैरे वगैरे. पण तरीही संप चालेल. मग कुणीतरी मध्यस्थ पुढे येईल. 'वर्षा'वर वाटाघाटी होतील. संप मागे घेतला जाईल. सरकार चारदोन मागण्या मान्य करील. 'हे सारं नेहमीच्या प्रथेपणे निर्विघ्न पार पडेल.'

सुमारे तीन वर्षांपूर्वी राज्य कर्मचाऱ्यांचा प्रचंड संप झाला होता. तेव्हाही हीच नेतेमंडळी होती. हा संप शंभर टक्के यशस्वी होता. अकरा दिवस संप चालला. कामगार नेते मनोहर कोतवाल यांनी मध्यस्थी केली. त्यावेळी सरकारनं कर्णिकांना कस्टडीत टाकून ठेवल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या भावना प्रक्षुब्ध झाल्या होत्या. पण तशाही स्थितीत वाटाघाटी यशस्वी झाल्या. संपानंतर काही दिवसातच कर्मचाऱ्यांना जादा पगारवाढी मिळाल्या. हे सारं एकीच्या जोरावर मिळालं. याही वेळी जर एकजूट आणि निश्चय कायम राहिला तर सरकार बरोबरच्या लढयात या साडे चार लाख कर्मचाऱ्यांचा जय होईल, असा विश्वास वाटतो.

पण महागाई वगैरे लक्षात घेऊन वेतनवाढीचं समर्थन करीत असतानाच आणखी एक विचार चमकून जातो की, हे राज्य कर्मचारी खरोखरच इतका पगार घ्यायला लायक आहेत का? सचिवालयातल्या कुठल्याही टेबलावर जे फायलींचे प्रचंड ढीग दिसतात ते या कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेचं द्योतक का? फाईल एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जायला सहा सहा महिने लागतात ते कशामुळे? कॅंटिनमध्ये सदासर्वकाळ गर्दी करून टाईमपास करणाऱ्या या कर्मचाऱ्यांना 'पहिले दाम-बादमे काम' बोलण्याचा हक्क पोहोचतो का? सचिवालयात किंवा कुठल्याही सरकारी कार्यालयात जितकं काम असतं त्यापेक्षा कितीतरी जास्त काम खाजगी क्षेत्रातले कर्मचारी कित्येक पटींनी झटपट आटोपतात ते का?

या साऱ्या प्रश्नांचा शासकीय कर्मचाऱ्यांनी गंभीरपणे विचार करायला हवा. जनता त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देईल, अगदी कळ सोसूनसुद्धा. पण जेव्हा एखाद्या सामान्य होतकरू तरुणाचा कर्ज मागणीचा अर्ज पुढे सरकवायला हे कर्मचारी वर्ष, वर्ष लावतील आणि तो पटकन पुढे सरकवण्यासाठी 'पेपरवेट'ची मागणी करतील तेव्हा हा पाठिंबा दिल्याबद्दल जनता स्वतःच्याच तोंडात मारून घेईल.

¤

# इर्मा ला दूसचा खून

'इर्माला दूस' मी एकदा पाहिला. भलताच आवडला. दुसऱ्यांदा पाहिला. आणखीनच आवडला. पुन्हा पाहिला. आवडण्याची हद्द झाली. चौथ्यांदा पहायला गेलो तर पिक्चर गेलेलं होतं. 'इर्मा' गेला आणि दोन अडीच महिन्यात 'येणार, येणार म्हणून गाजत असलेला मनोरंजन पाहिला. पाहिला म्हणजे चक्क तिकिट काढून आणि तीही दहा दहा रुपयांची दोन तिकिटं काढून पाहिला. हा मनोरंजन पाहिला आणि पस्तावलो. इतका पस्तावलो की, यापुढे प्राण गेला तरी हिंदी सिनेमा पहायचा नाही अशी शपथ घेऊन बाहेर पडलो. अर्थात ही शपथ दोन चार महिन्यात सुटेल हा भाग वेगळा.

'मनोरंजन' बघायला जातानाच बिचाऱ्या इर्माचं अस्सल हिंदीकरण झालेलं असणार याची कल्पना होती. पण शम्मी कपूर आणि मंडळी तिचा इतका फडशा पाडतील, असं त्यांचे आधीचे पराक्रम माहीत असून सुद्धा वाटलं नव्हतं. अक्षरशः इर्माचं त्यांनी वाटोळं केलं आहे. इर्माचा पार खून करून टाकलाय.

उचलेगिरी हे हिंदी सिनेमावाल्यांच्या लक्षणापैकीच एक लक्षण आहे. इर्माची आपण उचलेगिरी केलीय हे प्रथम शम्मी आणि कंपू सांगायलाच तयार नव्हता. पण त्यांच्या दुर्दैवानं प्रत्यक्ष इर्माच मुंबईत अवतरली आणि प्रसिद्ध पावली. मग पुन्हा माना वर करून या कंपूनं आपलं कूळ जाहीर केलं.

शार्ली मॅक्लेननं इर्मा साकार केली. इथं सेक्स क्वीन झीनत अमनला त्या करिता उभं केलंय. तिनं मन लावून काम केलंय. पण कुछ जमता नही. अर्थात शम्मीने तिच्यावर सर्व अँगल्सनी कॅमेरा रोखलाय. कॅमेऱ्यानं सुद्धा पब्लिकला जे हवंय ते बरोबर टिपलंय.

संजीव कुमार मात्र पोलिसाच्या भूमिकेत जॅक लेमनची आठवण करून देतो. संबंध सिनेमात झीनत सोडली तर बघण्यासारखं काही नाही. झीनतच्याही चेहऱ्यावर अॅक्टींग वगैरे सारखे क्षुद्र प्रकार बिलकूल नाहीत. जिथं इर्माची फ्रेम टू फ्रेम कॉपी आहे, असे शॉट्स अर्थातच चांगले झालेत. पण जिथं जिथं शम्मीला दिग्दर्शनाला वाव आहे तिथं तिथं त्यानं पुरा बोऱ्या वाजवलाय.

एकूण काय? आपली अशी विटंबना झालेली बघून, वेश्या असूनही इर्मा ढसाढसा रडत असेल. मी इर्माला मनापासून श्रद्धांजली वाहतो. □ □

# शांतिनिकेतनातील दोन दुर्दैवी मृत्यू

**सांगलीतील शांतिनिकेतन प्रकरणी प्रत्यक्ष प्रतिनिधी पाठवून माहिती गोळा करणे वेळेअभावी माणूसला जमले नाही. त्यामुळे या प्रकरणाच्या दोन्ही बाजू वाचकांसमोर येथे ठेवल्या आहेत.**

## एक जातीय व राजकीय अड्डा

गेल्या ४ मार्च रोजी येथील शांतिनिकेतन महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. त्यातील दोघेजण दगावले. या घटनेचे पडसाद साऱ्या महाराष्ट्रभर उमटले. विधानसभेतही चर्चा घडून आली. या विषबाधा प्रकरणाच्या अनुषंगाने अर्थातच सांगली शहरात बरेच मोठे वादंग माजले. या रणधुमाळीत विद्यार्थी, विद्यार्थी, संघटना व युवक संघटनांचे कार्यकर्ते, पुढारी आणि पत्रकारही घुसमटून निघाले. मूळचे हे विषबाधा प्रकरण आणि तत्संबंधाने घडलेले अनुचित प्रकार–वादंग आदीबाबतचा हा शब्दप्रपंच !

सांगली शहरातील आठ महाविद्यालयांपैकी 'शांतिनिकेतन' हे एक. सांगलीच्या शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या पैशावर विस्तृत परिसरात, आधुनिक इमारतींचा फापटपसारा इथे उभा केला गेलाय. नवभारत शिक्षण मंडळ या आ. पी. बी. पाटील यांच्या संचालकत्वाखालील संस्थेचे या भागातील हे एकमेव रेसिडेन्सिअल कॉलेज आहे. शिक्षणाबरोबरच इतर विविध सोयीसवलतींची प्रचंड जाहिरातबाजी व 'कमवा–शिका' योजनेचे आमिष यामुळे गरीब, ग्रामीण विद्यार्थी वर्ग बहुसंख्येने या कॉलेजकडे आकर्षिला जातो. साखर कारखान्याच्या पैशाचा मुक्त हस्ते वापर करून उभारलेल्या या संस्थेचा फायदा सभासदांच्या वा अन्य गरीब लोकांच्या मुलांना किती होतो हा भाग अलाहिदा ! पण ग्रामीण जनतेच्या मुलांच्या सोयीसाठी म्हणून बहुजन समाजाचे हिताचे नावाखाली हजारो शेतकऱ्यांच्या पैशाची प्रचंड प्रमाणात होणारी लूट उघडया डोळ्यांनी दिसत असतानाही वरिष्ठ नेत्यांच्या नावावर ती केली जात असल्यामुळे याविरुद्ध आवाज उठवायला कुणी तयार होत नाही. निदान आजवर तरी हे होत नव्हते.

त्याचे असे आहे. आ. पी. बी. पाटील हे या भागातले कॉंग्रेसचे आमदार. 'बोलका समाजवाद' सांगून जनसामान्यावर भुरळ पाडण्यात पटाईत. त्यासाठी सभा जिंकण्यासाठी म्हणून का होईना, पण कॉंग्रेसवाल्यांना त्यांची–विशेषत: निवडणुकीचे काळात–तर हमखास गरज असते. तशातच वीज व पाटबंधारे मंत्री श्री. वसंतराव-दादा पाटील यांच्या खास मर्जीतले म्हणून ते ओळखले जातात. आमदारकीबरोबरच महाविद्यालयाचे प्राचार्यपदही तेच उपभोगतात. आणि 'दादांचा माणूस' म्हणून शिडीवरच्या चित्राप्रमाणे आजवर अनेक वर्षे ते 'सुरक्षित' आहेत. आपल्या काही खास 'चमचे' प्राध्यापकांचा लाचारवर्ग यांनी बहुमतासाठी पदरी बाळगला असल्याने त्यांच्या कर्तृत्वाचे व गुणगौरवाचे प्रचारकार्य ते बिनबोभाट पार पाडतात. काहींना तर ही भाटगिरी करणे एवढेच काम आहे. बहुजनसमाजाची (नव्हे मराठा जातीचीच !) एकसंध शक्ती जोपासण्यासाठी व वाढविण्यासाठी म्हणून ह्या संस्थेच्या छायेत शिपायापासून प्राचार्यांपर्यंत 'जातवाली' मंडळी गुण्यागोविंदाने एकत्र नांदविण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न होत असताना दिसतो. आणि अशा या 'आधुनिक शांतिनिकेतन' परिसरात आपल्या गरीब व ग्रामीण विद्यार्थी–युवकांवर 'भावी आधारस्तंभ' बनविण्याच्या दृष्टीने 'संस्कार' कोठले केले जातात ? राजकीय लाळघोटेपणा, संकुचित जातीय वृत्ती आणि हीन लाचार प्रवृत्ती या साचेबंद मुशीतून आपले शिक्षणकर्तव्य पार पाडून सहीसलामत बाहेर पडण्याचे दिव्य अनेक विद्यार्थ्यांना पार पाडावे लागते. अवास्तव गाजावाजा झालेल्या या संस्थेच्या गलिच्छ अड्ड्यात प्रतिवर्षी अनेक विद्यार्थी मोठ्या उत्साहाने दाखल होतात. लौकरच खरी परिस्थिती पाहून पश्चात्ताप पावतात. पण या घाणीतून त्यांना क्वचितच बाहेर पडता येते. काही सवयीने रुळतात आणि नाइलाजास्तव 'वर्षे' पार पाडतात.

असे हे 'शांतिनिकेतन !' टागोरांचे नाव बदनाम करणाऱ्या तुंबडयाभरू लोकांचा राजकीय व जातीय अड्डा. विषबाधेमुळे मरण पावले ते दोन दुर्दैवी विद्यार्थी इथेच शिकत होते. ज्या सहा विद्यार्थ्यांना विषबाधा झाली ते सर्वचजण याच महाविद्यालयाचे (रेसिडेन्शिअल) विद्यार्थी होते. पण तरीही बाहेर खाजगी स्वतंत्र खोली घेऊन रहात. 'कमवा व शिका' योजनेनुसार महाविद्यालयात काम करीत. त्या कामाबद्दल त्यांना ४५ रु. मोबदला मिळे. मेसचा खर्च परवडत नाही म्हणून हाताने स्वयंपाक करून जेवीत. ४ मार्च रोजी त्यांना अन्नातून विषबाधा झाली. लागलीच त्यांना सांगलीच्या सरकारी इस्पितळात दाखल करण्यात आले. पण तेथे दि. ७ मार्चला बैजू दत्ता पाटील (१९) व ८ मार्चला नारायण यल्लाप्पा तलवार (२१) हे दोघे मरण पावले. हे दोघेही कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगडचे रहिवासी.

४ मार्चला विषबाधा प्रकरण झाले पण ८ मार्चपर्यंत बाहेर त्याची कुणालाही माहिती नव्हती. ८ मार्चला पत्रकारांना कुणकुण लागली. पण याबाबत पोलीसखात्याकडे वारंवार विचारणा करूनही पोलिसांनी टाळाटाळ केली. अखेर निर्वाणीच्या क्षणी त्यांनी हे वृत्त देण्यास पोलिसांना भाग पाडले. ९ मार्चला बहुतेक सर्वच वृत्तपत्रांतून ही बातमी प्रसिद्ध झाली; आणि सर्वत्र एकच खळबळ उडाली. 'नवसंदेश'

या इथल्या स्थानिक दैनिकाने ही बातमी बॅनर लाईन टाकून प्रसिद्ध केली. पोलीसखात्याने वृत्तपत्र-प्रतिनिधींना माहिती देण्यास जाणूनबुजून टाळाटाळ केली व वृत्त दडपण्याचा प्रयत्न केला म्हणून बऱ्याच दैनिकांनी त्यांच्यावर जहरी टीका केली. याच दिवशी नव-संदेशमध्ये युवकसंघटनांचे एक निवेदनही प्रसिद्ध करण्यात आले होते. या विषबाधा प्रकरणास जबाबदार असणाऱ्या प्राचार्य पी. बी. पाटील यांच्या राजीनाम्याची मागणी त्या निवेदनात करण्यात आली होती.

## प्राध्यापकांची मुक्ताफळे

वृत्तपत्रातील या बातम्यांमुळे प्राचार्य महाशय चिडले; नव्हे संतापाने पेटून उठले आणि त्यांनी उपस्थित विद्यार्थी वर्गासमोरच वृत्तपत्रांच्या संपादकांना शिव्या हासडल्या. 'मला जाणूनबुजून बदनाम करण्याचा हा वृत्तपत्रांचा प्रयत्न आहे' असे त्यांनी विद्यार्थ्यांच्या डोक्यात भरवले. हा उफाळलेला संताप व्यक्त करण्यासाठी त्यांनी नवसंदेश या दैनिकाचे 'टारजेट' बनविले. आणि मग सकाळी-सकाळीच प्राचार्यमहाशयांची पाठीराखी प्राध्यापक, सेवक व अन्य काही मंडळी या वृत्ताचा जाब विचारण्यासाठी त्या दैनिकाच्या संपादकांकडे गेली. चुकीचे वृत्त छापले आहे हे सांगण्यासाठी त्यांनी अश्लील शिव्यांचे सहाय्य घेतले; आणि अत्यंत अशोभनीय व ओंगळ शब्दात संपादकांची सर्वांसमक्ष नाचक्की केली. मोर्चा येणार म्हणून इतर बरेच पत्रकार यावेळी त्या दैनिकाच्या कार्यालयात उपस्थित होते. 'हे वृत्तपत्राचे कार्यालय आहे की सलून आहे?' 'कसला हा फालतू संपादक' आदी मुक्ताफळे त्यातल्या 'प्राध्यापक' म्हण-विणाऱ्यांनी सर्वांसमक्ष ओकली. आणि आम्ही देऊ तो खुलासा जसाच्या तसा प्रसिद्ध करा अन्यथा आमचे विद्यार्थी हे कार्यालय जाळायलाही कमी करणार नाहीत'' अशी धमकी दिली. प्रसिद्ध झालेल्या बातमीत काय चूक आहे, हे मात्र त्यातल्या कोणासही सांगता आले नाही. उपस्थित पत्रकारांनी व पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी या जबाबदार (?) प्राध्यापकांच्या बेजबाबदार वर्तणुकीचा प्राचार्य पाटील यांना जाब विचारला. पण 'प्राध्या-पकांशी माझा संबंध नाही, तुमचे तुम्ही पाहून घ्या.' असे त्यांनी दुरुत्तर दिले. त्याचप्रमाणे आमचे विद्यार्थी मोर्चा घेऊन येतील; त्यांना तोंड द्या, असा इशाराही दिला.

बातमी का प्रसिद्ध केली म्हणून धमकी देण्याचा, मोर्चा आणण्याचा व गलिच्छ शिवीगाळ करण्याचा प्रकार प्राध्यापक मंडळींकडून व्हावा ही लांछनास्पद गोष्ट! त्या तथाकथित प्राध्यापकांची उपस्थित पत्रकारांना कीव करावीशी वाटली. यदाकदाचित त्यांनी आपल्या शिष्यवर्गास मोर्चा नेण्यास भाग पाडले तर युवा-शक्तीस निष्कारण वेगळे वळण लागण्याचा धोका होता, म्हणून त्या संपादकांनी पोलिसांकडे तक्रार केली आणि पोलीस संरक्षण मागितले.

प्राचार्यांनी सांगितल्याप्रमाणे अखेर विद्यार्थी मोर्चा आला पण तो सकाळी ८ ऐवजी सायंकाळी ५ वाजता! विद्यार्थी होते अवघे तीस-पस्तीस. मात्र सकाळी शिष्टमंडळातून आलेल्या प्राध्यापकांपेक्षा ते बरेच समंजस दिसले. त्यांनी आपले निवेदन दिले. काही वेळ प्रचंड गिल्ला केला व उद्या हे निवेदन छापून आले नाही तर कचेरी जाळू, वगैरे धमकी दिली हे खरे, पण कुठलाही अनुचित प्रकार न करता ते संयमाने परत गेले. जाताना मात्र त्यांनी कचेरीलगतच्या रस्त्यावर 'त्या' वृत्तपत्राची होळी केली व निषेधाच्या घोषणा दिल्या. सारा प्रकार मख्खपणे उभे राहून पाहाणाऱ्या पोलिसांना व अधिकाऱ्यांना 'कर्तव्य' बजावण्यास फारसा वाव नसल्याने त्यांनी या किरकोळ बाबीकडे दुर्लक्ष केले.

दै. नवसंदेशवरील या मोर्चाचा व प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी दिलेल्या धमकीचा दुसऱ्या दिवशी सर्वच वृत्तपत्रांतून पुन्हा गाजावाजा झाला. प्रकरण अधिक चिघळले. आदल्या दिवशी मोर्चातून जे विद्यार्थी आले ते प्राध्यापकांनी दम भरल्यामुळेच आले होते, असे नंतर उघडकीस आले. कारण सात-आठशे विद्यार्थी असलेल्या महाविद्या-लयातील अवघे तीस-चाळीसच मोर्चात कसे? वृत्तपत्रावरील या हल्ल्याचा निषेध करणारी पत्रके शहरातील बहुतेक सर्वच प्रमुख युवक संघटनांनी व काही संस्थांनी प्रसिद्ध केली; तसेच या विष-बाधा प्रकरणाची चौकशी व्हावी आणि आ. पी. बी. पाटील यांनी प्राचार्यपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली. सांगली व कोल्हापूर जिल्हा पत्रकार संघानेही या प्रकरणी तातडीच्या बैठका घेऊन वृत्तपत्रांवरील हल्ल्याच्या या प्रवृत्तीचा निषेध केला.

## अध्यक्षांविरुद्ध अविश्वासाचा ठराव

सांगली जिल्हा पत्रकार संघाने निषेध ठराव केल्यानंतर संघाचे अध्यक्ष श्री. वसंतराव भोसले यांनी 'या ठरावाशी मी सहमत नाही व संघाच्या नावावर काही मूठभर पत्रकारांनी पी. बी. पाटील यांच्या व्यक्तिद्वेषाने पछाडले जाऊन तो मंजूर केला आहे' असे पत्रक काढले. पण उपस्थित सर्वच पत्रकारांनी एकमताने हा ठराव संमत केल्यामुळे पत्रकार संघाची बदनामी केल्याबद्दल अध्यक्ष श्री. भोसले यांच्यावर पुढच्या पत्रकार सभेत अविश्वास ठराव आणून त्यांची अध्यक्षपदावरून हकालपट्टी करण्यात आली. वैयक्तिक हितसंबंधासाठी संघाच्या अध्यक्षांनी काढलेल्या पत्रकाचा फायदा घेऊन काही पुढारी मंडळींनी संघात मतभेद आहेत असा कांगावा केला. काही पत्रकारांना विकत घेऊन संघात दुफळी माजविण्याचाही असफल प्रयत्न केला. आधीच विकल्या गेलेल्या एका स्थानिक वृत्त-पत्राच्या लाचार व काँग्रेस धार्जिण्या संपादकाने पुढाऱ्यांना या कामी साथ दिली. सर्वच पत्रकार (स्वतः सोडून) 'अधम' आहेत, बेअक्कल आहेत, 'यलो जर्नालिझम'वाले आहेत अशी अशोभनीय व धड-धडीत मूर्खपणाची विधाने करून आपण फार शहाणे आहोत हे दाखविण्याचा अट्टाहास त्यांनी एका अग्रलेखाद्वारे केला. इतर सर्वच पत्रकार जनसंघाच्या फायद्याचे व काँग्रेसविरोधी राजकारण करताहेत असा प्रचार करून काँग्रेसवाल्यांची तळी उचलण्याचे काम या वृत्त-पत्राने निष्ठेने पार पाडले.

जिल्हा पत्रकार संघात या विषयावर काही मतभेद अद्यापी आहेत, पण पुढाऱ्यांचे राजकारण त्यांनी बहुमताचे जोरावर हाणून पाडले आणि वृत्तपत्रावरील हल्ल्याच्या प्रवृत्तीबद्दल निषेध ठरावास पाठिंबा दिला आहे.

पत्रकार संघात किरकोळ वादंग चालले होते पण शहरातील युवक संघटनांनी मात्र या विषबाधा प्रकरणाचा संघटितपणे पाठ-पुरावा चालूच ठेवला होता. युवक क्रांती दलाचे व्यंकाप्पा पत्की यांच्या नेतृत्वाखाली 'शांतिनिकेतन शुद्धिकरण मोहीम' हाती घेण्यात आली. अनेक पुढारी व त्यांच्या चमचेमंडळींनी या कार्यकर्त्यांना

दमबाजी करून दहशत बसविण्याचा प्रयत्न केला पण विद्यार्थी कार्यकर्त्यांनी त्यांना मुळीच जुमानले नाही. युवक संघटनांनी जाहीर प्रश्न उपस्थित केले आहेत. उदाहरणार्थ : प्राचार्य पी. बी. पाटील हे थर्डक्लास एम. ए. आहेत. तसेच त्यांना प्राचार्यपद भोगण्यासाठी आवश्यक असणारा किमान १० वर्षांचा अनुभवही नाही. तर मग शिवाजी विद्यापीठाने प्राचार्यपदी राहण्यास त्यांना परवानगी कशी दिली ? रेसिडेन्सिअल कॉलेज असताना 'कमवा–शिका' योजना कशी लागू केली गेली ? आणि रेसिडेन्सिअल कॉलेजचे विद्यार्थी बाहेर कसे रहात होते ? जेवत तरी कसे होते ? त्यांना परवानगी का दिली गेली ?

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे महाराष्ट्र शाखा मंत्री श्री. माधव ठाकूर यांनीही तातडीने सांगलीस येऊन या प्रकरणी चौकशी केली व शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पवार यांना एका शिष्टमंडळासमवेत भेटून प्राचार्य पाटील यांना प्राचार्यपदावरून दूर करावे व विषबाधा प्रकरणाची चौकशी करावी अशी मागणी केली.

### पत्रकारावरील वाढती दडपणे

या विषबाधा प्रकरणाच्या निमित्ताने इतरही बरेच गैरप्रकार उघडकीस येत आहेत. पी. बी. पाटील यांच्या संस्थेतील हुकूमशाही व भ्रष्टाचारी वृत्तीवर उघड उघड वक्तव्ये केली जात आहेत. आता हे प्रकरण बरेचसे थंडावले आहे. पण या प्रकरणाच्या अनुषंगाने एका गोष्टीची चर्चा महाराष्ट्रात प्रकर्षाने घडण्याची आवश्यकता जाणवली. पत्रकार व वृत्तपत्रावरील हल्ल्याचे वाढते प्रकार महाराष्ट्रात अलीकडे वारंवार घडत आहेत. सांगलीतही असे एक भयानक प्रकरण ९ जानेवारीस घडले. श्री. बापूसाहेब खराडे नावाच्या इथल्या एका पत्रकारावर काही गुंडांनी हल्ला केला. त्याच्या अंगावर ॲसिड फेकले गेल्यामुळे त्याच्या दोन्ही डोळ्यांना इजा झाली. एक तर कायमचाच निकामी झाला. शिवाय सर्वांग भाजले गेले. त्यांना जीवनातून उठविण्याचाच प्रयत्न झाला. एका (कु) प्रसिद्ध 'गुंड' सेनेचा यात हात असल्याचे उघड सत्य सर्वश्रुत असतानाही पोलीस याबाबत अद्यापी गप्प आहेत. आरोपी पकडला जात नाही. चौकशीचे केवळ नाटक केले जाते.

वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गदा येण्याचा धोकाच अशा प्रकारातून संभवतो. अन्यायाविरोधी व खऱ्या बातम्या देणे पत्रकारांना आणि वृत्तपत्रानांही त्यामुळे कठीण होऊन बसेल. विशेषतः जिल्हा दैनिकांना व अन्य छोटचा वृत्तपत्रांना तर निर्भीडपणा दाखवणे दुरापास्तच झाले आहे. वृत्तपत्रे म्हणजे आमच्या 'रखेल्या' आहेत अशी उघड उघड भाषा आता गावगुंड पुढाऱ्यांच्या तोंडून ऐकावयास मिळू लागली आहे. आम्ही जाहिरातींचा मलिदा देतो तेव्हा 'हवे तेच' छापून आले पाहिजे हा यांचा अट्टाहास ! ही वृत्ती अशीच बळावत गेली तर...?

महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघानेही आता या प्रकरणी लक्ष घातले आहे. संघाचे अध्यक्ष श्री. य. वि. नामजोशी यांनी ३० मार्च रोजी एका पत्रकाद्वारे सांगलीच्या नवसंदेश प्रकरणाकडे व अशा वाढत्या प्रवृत्तीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले असून वृत्तपत्रांना संरक्षण मिळावे अशी मागणी केली आहे.

मूळ शांतिनिकेतन विषबाधा प्रकरणाची अद्याप चौकशी चालू आहे. ११ मार्च रोजी विधान सभेत या प्रकरणी विरोधी पक्षांनी स्थगन प्रस्ताव आणला होता. २१ मार्चला गृहराज्यमंत्री श्री. शरद पवार यांनी एक निवेदन केले व 'ते' विद्यार्थी सरकारी धान्य दुकानातील विषारी ज्वारी मुळे नव्हे तर 'एंड्रीन'मुळे मेल्याचे सांगितले. सरकारची जबाबदारी संपली आहे... आणि हे विषबाधा प्रकरणही आता पडद्याआड गेल्यासारखेच आहे...

—एक पत्रकार

## शांतिनिकेतन : एक कुटुंब

आजकाल कुठल्याही गोष्टींचा संबंध राजकारणाशी जोडणे हे तथाकथित पुढाऱ्यांचे वैशिष्टय झाले आहे. त्याचे ताजे उदाहरण म्हणजे शांतिनिकेतन महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांचा अन्न-विषबाधेमुळे झालेला दुर्दैवी मृत्यु होय.

गरीब परंतु शिक्षणाची आवड असणारे विद्यार्थी या शांतिनिकेतन संस्थेतील (कमवा व शिका) या योजनेखाली स्वतःचे पायावर उभे राहून शिक्षण घेत असतात. काही विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती इतकी हलाखीची असते की हा स्वतः मिळवलेला पैसाही त्यांना आपल्या जेवणासाठी व राहण्यासाठी अपुरा पडतो. त्यामुळे अर्थातच हॉस्टेलवर राहून कॉलेजच्या मेसमध्ये जेवण करणे त्यांना शक्य नसते. अशावेळी हॉस्टेलवर राहून जवळपास एखादी खोली घेऊन एकाच गावचे पाच सहा मित्र स्वतः स्वयंपाक करून जेवतात. घरून धान्य मागवून स्वयंपाक करणे त्यांना मेसच्या जेवणापेक्षा निश्चितपणे परवडते. अशाच हलाखीच्या परिस्थितीत जिद्दीने आपले शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यातच अन्न विषबाधेने आजारी पडलेल्या सहा विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यातील दोन विद्यार्थी, दुर्दैवाने काळाने आमचे पासून हिरावून नेले. पण बाकी चार विद्यार्थी मात्र सुदैवाने आता पूर्णपणे बरे झाले आहेत. पण या सर्व प्रकाराची जबाबदारी प्रा. पी. बी. पाटील यांच्यावर–पर्यायाने संस्थेवर कशी येते हे निदान आम्हाला तरी समजत नाही. हे विद्यार्थी कॉलेजच्या मेसमध्ये जेवतच नव्हते. शिवाय हे प्रकरण घडलेल्या वेळी प्राचार्य पी. बी. पाटील येथे नव्हतेही. तेव्हा त्यांच्या विरुद्ध ओरड करणारे नवसंदेशचे संपादक महाशय व इतर विद्यार्थी संघटनांचे नेते यांनी कुठल्या पुराव्याच्या आधारे त्यांना या सर्व प्रकारात जबाबदार धरले ?

खरी वस्तुस्थिती अशी : कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील कै. वैजू दत्तू पाटील, कै. श्री. नारायण कल्लाप्पा तरवार,

अशोक देसाई, विठ्ठल पाटील, रामचंद्र पाटील, मारुती येलूरकर, व भुजंगा सत्याप्पा जाधव, हे सात मित्र शांतिनिकेतन महाविद्यालयाचे विद्यार्थी असून त्यापैकी तीन हॉस्टेलवर तर बाकीचे महाविद्यालयाजवळच पंचशील नगरमध्ये खोली घेऊन रहात. परंतु त्या सर्वांचे जेवण मात्र या खोलीवर एकत्रच होत असे. दिनांक ४–३–७४ रोजी संध्याकाळी स्वयंपाक करून ७ वाजता हे सर्व विद्यार्थी जेवावयास बसले. दोन घास खाल्ल्याबरोबरच त्यांना भोवळ आल्यासारखे झाले. या विषबाधेचा सहा जणावर परिणाम झाला. जाधव हा एकच विद्यार्थी यातून वाचला. त्याने ताबडतोब पळत जाऊन ही बातमी कॉलेजवर दिली. लगेच दोघा प्राध्यापकांनी येऊन प्राचार्यांच्या गाडीतून या विद्यार्थ्यांना हॉस्पिटलमध्ये नेले. ताबडतोब पोलीस इन्स्पेक्टर व फूड इन्स्पेक्टर यांना फोन करून त्यांनी खाल्लेले अन्नही तपासणीसाठी देण्यात आले. त्या विद्यार्थ्यांवरील उपचारालाही ताबडतोब सुरुवात झाली. त्यांना आवश्यक असलेली औषधे सांगलीत मिळाली नाहीत. तेव्हा ती मिरज व कोल्हापूर येथूनही उपलब्ध करण्यात आली. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत या सर्व विद्यार्थ्यांचे नातलगही हजर झाले. दिवसरात्र आमचे विद्यार्थी व प्राध्यापक उशापायथ्याशी बसून होते. आपल्या मित्रांचे सेवेसाठी त्यांनी परीक्षा जवळ आली असून अभ्यासाचाही विचार केला नाही. आमच्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल हॉस्पिटलमधील डॉक्टर्स व नर्सेस यांनीही कौतुक केले. त्यांच्या परिश्रमाचे पूर्ण सार्थक झाले नाही. आमचे दोन विद्यार्थी वैजू पाटील व नारायण तरवार या विषबाधेला बळी पडले. ऐन परीक्षेच्या दिवसात ही बातमी आम्हा विद्यार्थ्यांना धक्का देणारी होती. शक्यतेबद्दल सर्व मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही आमच्या हाताला यश यायचे नव्हते. त्या मुलांच्या नातलगांवर व आमच्या संस्थेवर हा दुःखाचा केवढातरी डोंगर कोसळला होता. ह्या परिस्थितीत सांत्वनाचा एक शब्द तर राहूच द्या पण या बातमीचा विपर्यास करून दुःखात भर घालण्याची कामगिरी मात्र तुम्ही लोकांनी चोख बजावली.

## अतिरंजित प्रसिद्धी

म्हणे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला: कोणी केला? केव्हा केला? या विषबाधेची बातमी कोल्हापूरच्या सत्यवादीमध्ये प्रसिद्धही झाली. इतरत्रही फोनवरून ही बातमी कळविली होती. तेव्हा तुम्ही लोक काय करीत होता? बातम्या तुमच्या वार्ताहरांनी गोळा करावयाच्या की आम्ही तुम्हास पुरवावयाच्या? उशीरा जागे झालात ते झालात आणि बातमीही किती अतिरंजित छापलीत? कोणीही उपटसुंभाने यावे काहीही बातमी सांगावी, आणि तिच्या शक्याशक्यतेचा विचार न करता तुम्ही ती छापावी, हे कुठल्याही जबाबदार संपादकांना शोभण्यासारखे आहे काय? दिनांक ८ च्या नवसंदेशमध्ये आलेली ती बातमीच इतकी भयंकर होती की शांतिनिकेतन संस्थेशी जवळून काय पण दुरूनही संबंध असणाऱ्या लोकांच्या तळपायाची आग मस्तकाला जाईल. आपल्या मुलासाठी कष्टाची, पैशाची कशाचीही पर्वा न करता धडपडणाऱ्या पितृतुल्य प्रेमालाच तुम्ही मुलांच्या मृत्युसाठी कारणीभूत ठरविले. ही धडपड प्रत्यक्ष बघणारे किती तरी डोळे तुम्हाला या गोष्टीची साक्ष देतील. आमचे प्राध्यापक व विद्यार्थी बंधू चिडणार नाही तर काय हे आरोप मुकट्याने सहन करतील? ग्रामीण भागातील मुलांसाठी विद्यादानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शांतिनिकेतन आश्रमासारख्या संस्थेला बदनाम करताना तुम्ही थोडा तरी विचार करावयाचा होता? रागाच्या भरात आमचे प्राध्यापक–विद्यार्थी कमीजा्‌ । बोललेही असतील. पण नागाच्या शेपटीवर पाय देऊन त्याला डिवचण्याची चूक प्रथम तुम्हीच केलीत. आणि नंतर दोन चार पत्रकार गोळा करून त्या वागणुकीचा निषेध करूनही मोकळे झालात आणि तेही जिल्हा पत्रकार संघाच्या नावावर? पण संपादक महाशय, दोन चार पत्रकार म्हणजे सांगली जिल्हा पत्रकार संघ होत नाही हे ही काय आम्हीच तुम्हाला सांगाला हवे? परंतु तुमच्या या निषेध ठरावाला किंवा तुमच्या या निखळ चोरटचा बातम्यांना आपला अजिबात पाठींबा नसल्याचे स्वतः सांगली जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. वसंतराव भोसले यांनीच स्पष्ट सांगितले आहे. कारण प्रत्यक्ष सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांवरील उपचारांचे अवलोकन केले होते. म्हणे वृत्तपत्र व्यवसायावर गदा आणण्याचा हा प्रयत्न आहे! उगीच खोट्यानाट्या बातम्या छापून एखाद्याला बदनाम करणे हेच तुम्ही वृत्तपत्रव्यवसायाचे स्वातंत्र्य समजता काय?

## भावनांची हळुवार जपणूक

युक्रांदचे कार्यकर्ते श्री. व्यंकप्पा पतकी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते श्री. माधव ठाकूर, महाराष्ट्र स्टूडंटस् कौन्सिल व त्यांचे विद्यार्थी, चेले यापैकी एकाने तरी प्रत्यक्ष जाऊन वस्तुस्थितीची पहाणी केली काय? शांतिनिकेतन महाविद्यालयाची मान्यता काढून घ्या म्हणताना ग्रामीण विद्यार्थ्यांच्या तोंडातील घासच आपण आपल्या वक्तव्याद्वारे काढून घेतो आहोत, ह्याची तुम्हाला कल्पना आली होती का? श्री. माधव ठाकूर यांना या प्रकाराबाबत विद्यार्थ्यांवरील दडपण कोठे दिसले? आम्ही तर खात्रीने म्हणतो की, त्यांनी कॉलेजला भेट दिली नसलीच पाहिजे. नाहीतर आपल्या मित्रांसाठी आमच्या विद्यार्थ्यांची चाललेली धडपड पाहून त्यांचेही डोळे पाणावल्याशिवाय राहिले नसते. या प्रकाराबाबत कुठे काही बोलू नका असे आम्हाला कोणी सांगितल्याचे आठवत नाही. सर्व गोष्टी सरळ आणि साध्या. त्यात दडपणाचा प्रश्न येतोच कुठे? हॉस्पिटलमध्ये आजारी मुलांवर आमच्या विद्यार्थ्यांचा पहारा होता हे कबूल. पण तो कशाला? तर त्यांच्या नाजूक तब्बेतीत, इतर दोन मुलांच्या मृत्यूची बातमी कोणीही अनवधानाने त्यांच्यापर्यंत पोचवू नये म्हणून. इतकी साधी गोष्ट कळण्याचे व्यवहारज्ञान एका विद्यार्थी नेत्याला नसावे हे आमचेच दुर्भाग्य. वरील मृत्यूच्या तावडीतून सुटलेल्या चार मुलांना, ती पूर्णपणे बरी होऊन दिनांक १५ ला संध्याकाळी परत कॉलेजवर जाईपर्यंत त्यांच्या दोन मित्रांच्या मृत्यूची बातमी समजलेली नव्हती. त्यांच्या मनाची, भावनांची जपणूक इतक्या हळूवारपणे व दक्षतेने कोणीतरी केली असती का? ते बिचारे दोन अभागी जीव मिरजच्या मिशन हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत अशीच त्या बिचाऱ्यांची समजूत होती. बाहेरच्या जगात उठलेल्या वावटळीपासून त्यांना पूर्णपणे दूर ठेवले होते. आपल्या दोन मित्रांच्या कायमच्या विरहाचे दुःख सहन करूनही या बाकीच्या चार विद्यार्थ्यांजवळ मात्र दुःख लपवून हसतमुख रहावयाचे, ही तारेवरची

कसरतही आमच्या प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी किती जड अंतःकरणाने केली ! संशयाला कुठे जागा असती तर मृत्यू पावलेल्या मुलांचे नातलग किंवा ते चार विद्यार्थी गप्प बसले असते का ? कॉलेजच्या इतर विद्यार्थ्यांनी तरी अन्यायाला वाचा फोडली असती.

शांतिनिकेतन हे आमचे कुटुंब आहे. आमच्या भावंडांसाठी आम्ही झटलो. व त्यात आम्ही विशेष काही केले नाही. ते आमचे कर्तव्य होते. मग आमच्याच भावंडांना मृत्यूच्या खाईत लोटण्याचे मोगलाई कृत्य आम्ही केले असे भयानक विधान करताना आमच्या भावनांचा थोडातरी विचार तुम्ही करावयाचा ? बाकी शांतिनिकेतनमधील काम करू शकणारे गरीब विद्यार्थी कसे जगतात, कसे राहतात, कसा अभ्यास करतात, त्याची चौकशी करण्याची तुम्हा विद्यार्थी नेत्यांना आजवर कधी गरज भासली नाही. विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी तुम्ही आपल्या संघटना स्थापता व मग तेही विद्यार्थी होते ना ? मग त्यातील दोन विद्यार्थी हे जग सोडून गेल्यावरच तुम्हाला त्यांचे प्रेमाचे एवढे भरते यावे ? त्यांच्या मृत्यूचे भांडवल करून तुम्ही लोकांनी आमच्यावर व आमचे संस्थेवर चिखलफेक केली. घटकाभर असे समजा, आम्हाला आमची जबाबदारी पार पाडता आली नाही. पण मग मृत्यूचे सापळ्यातून सहीसलामत बाहेर पडलेल्या इतर चार विद्यार्थ्यांची तरी वास्तपुस्त तुम्ही केली का ? तुमच्यापैकी एकतरी महाभाग साधे सौजन्य व माणुसकी म्हणून त्यांना भेटून आला का ? त्या दोन दुर्दैवी मुलांच्या आईचे अश्रू पुसून तिला मदतीचा हात तुम्ही पुढे केलात का ? अं हं, यापैकी काहीही तुम्ही केले नाही. कारण त्या मुलांशी, त्यांच्या तब्येतीशी, त्यांच्या आई-वडिलांच्या दुःखाशी तुम्हाला काही सोयरसुतक नव्हतच. तुम्हाला कर्तव्य होतं फक्त राजकारणी संधीसाधूपणा करून प्रा. पी. बी. पाटील यांची राजकीय व सामाजिक प्रतिमा डागाळण्याशी. आपल्या संस्थेची, आपल्या मुलांची सर्वांगीण उन्नती व्हावी यासाठी ते धडपडतात हे तुम्ही पाहिले असते तर अशी खोडसाळ बिनबुडाची विधाने करण्याचे धाडस तुम्ही केले नसते. कुठल्याही कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या प्राचार्याविषयी नसेल इतके प्रेम आम्हा विद्यार्थ्यांना आमच्या प्राचार्याविषयी आहे. त्यांच्या मायेच्या सावली खाली आपल्या पिल्लांना सोडून त्यांचे आईवडील आपापल्या गावी अगदी निश्चित असतात. मग तुम्हालाच संशयाची गोम कुठे दिसली ?

### विद्यार्थ्यांची दिशाभूल

आज ८-१० दिवस लागोपाठ तुमची वक्तव्ये वर्तमानपत्रांतून वाचतो आहोत. तुमचे प्राचार्य पी. बी. पाटील यांचेशी काही राजकीय मतभेद असतीलही. किंवा तुम्हाला त्यांच्या कर्तृत्वाविषयी मत्सरही वाटत असेल. म्हणून या सर्व प्रकरणात त्यांना दोषी ठरवून या दोन विद्यार्थ्यांच्या मृत्यूचे खापर त्यांच्या माथी फोडण्यात तुम्ही कुठला सुजाणपणा दाखविलात ? तुम्ही हे लक्षात ठेवा की आमच्या शिक्षण-संस्थेशी त्यांचा संबंध फक्त प्राचार्य नात्याने आहे. त्यांच्या आमदारकीशी आम्हाला काही कर्तव्य नाही. परंतु तुम्ही तथाकथित विद्यार्थी नेते त्यांच्या प्राचार्यपदाला दृष्टीआड करून प्रत्येक बाबतीत राजकारणाचे रंग आणता. असे कोणासाठी कुणी काही करू शकत नाही. करीत नाही याची जाणीव आम्हाला होती. आम्ही जे करीत होतो त्यातून माणुसकीसाठी आपण काहीतरी करतो आहोत केवळ याच समाधानाकरित; आणि हाच आमचा स्वार्थ होता. म्हणून तो आनंद ते समाधान आम्हाला मिळाले पण टिकले नाही. यात तुमची प्रसिद्धी झाली. पण माणुसकीसाठी झीज सोसून काही करण्यात अतीव समाधान असते या भावनेची पायमल्ली आपण केलीत. कौतुक नको पण तटस्थपणे परिस्थितीची पहाणी केली असती तर आमच्या-प्रमाणे मानवी प्रयत्नांची पराकाष्टा केल्यानंतर लाभणाऱ्या समाधानात आपणासही सहभागी होता आले असते.

आश्चर्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या कल्याणाच्या मूळ हेतूने उभ्या केल्या जाणाऱ्या पण मूळ उद्देश डावलून फक्त राजकारणातच नाक खुपसणाऱ्या या विद्यार्थी संघटनात विद्यार्थी जातात तरी कसे ? यात संघटनांची प्रसिद्धी होते. पण विद्यार्थ्यांची दिशाभूल होते. अर्थात आम्हाला त्याचेशी कर्तव्य नाही. पण परत एकदा कळकळीने सांगावेसे वाटते की, आमच्या ह्या दोन दुर्दैवी मुलांबद्दलच्या प्रेमाचे भरते आल्याचा तुम्ही कितीही कांगावा केलात तरी त्यांचे विषयीची तुमची सहानुभूती व्यक्त होत नाही व त्यांचेविषयी कोणत्याही भावनेला तुमच्या अंतःकरणात थारा नाही हे उघड आहे. आमच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी आमच्या संस्थेचा पालक वर्ग समर्थ आहे. खेडयापाडयातील बहुसंख्य शेतकऱ्यांची मुले आमचे संस्थेत शिक्षण घेतात हे तरी तुम्ही विसरलेले दिसत नाही. म्हणूनच निदान आमची संस्था यशस्वीपणे चालावी अशी सदिच्छा आपण व्यक्त केलीत त्याबद्दल आभारी आहोत.

आम्ही वस्तुस्थिती मांडली आहे. त्यामध्ये आमच्या मनातील सहज खळबळही व्यक्त झाली आहे. निःपक्षपातीपणे ह्याची दखल घेतली जावी एवढीच अपेक्षा. खरोखरच न्यायाची चाड असेल तर वतुस्थिती जाणून आपण केलेल्या चुकीचे समर्थन करीत न बसता आपण चुकलो एवढेच मनोमन जाणलंत तरी आपणासही पुष्कळ मिळेल.

**विजया देशमुख, संध्या सोले**
शांतिनिकेतन महाविद्यालय, सांगली


# पूर्णिया

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन

# रशियाच्या पाठिंब्यासाठी दलाई लामांचे प्रयत्न

वा. दा. रानडे

तिबेटमध्ये काय घडत आहे ? तेथील चिनी राजवटीला तिबेटींचा प्रतिकार अजूनही होत आहे का ? तिबेटच्या बातम्या फारच थोड्या येतात. पण दलाई लामांनी नुकतीच दिलेली एक मुलाखत इकनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीच्या २३ मार्च १९७४ च्या अंकात प्रसिद्ध झाली. त्यावरून त्यांच्या मतांची व योजनांची कल्पना येते.

दलाई लामांनी काही महिन्यापूर्वी युरोपला भेट दिली. त्यावेळी त्यांनी व्यक्त केलेल्या मतांवरून ते चिनी नेत्यांशी तडजोड करून तिबेटला परतण्यास तयार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. माओबद्दल आपणास आदर वाटतो. तसेच चिनी लोकांबद्दल आपल्या मनात तिटकारा नाही असे त्यांनी म्हटले होते. तिबेटच्या भवितव्याबद्दल आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली सार्वमत घेण्यास चिनी नेते तयार असतील तर मी तिबेटला परतेन अशी त्यांची पहिली भूमिका होती. पण सार्वमताचा आग्रह त्यांनी नंतर सोडला. चीनच्या अंतर्गत स्वायत्तता तिबेटी जनतेला मान्य असेल तर मीही ती मान्य करीन असे त्यांनी या दौऱ्यात म्हटले होते पण दलाई लामांसंबंधी चीनच्या भूमिकेत काहीही बदल झाला नाही हे त्यावेळी लंडनमधील चिनी वकिलातीने प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकावरून स्पष्ट झाले. 'प्रतिगामी', 'देशद्रोही' अशी विशेषणे या पत्रकात दलाई लामांना लावली होती.

रशिया-चीन संघर्षाचा फायदा घेऊन रशियाचा पाठिंबा आपणास मिळविण्याचा प्रयत्न दलाई लामा करीत असावेत असे अंदाज करण्यात येत होते. चिनी सीमेस लागून असलेल्या सोव्हिएट स्वायत्त प्रजासत्तांकांमधील बौद्ध मंदिरे व मठांची यात्रा ते करणार असल्याची बातमी 'तिबेटन रिव्ह्यू' पत्राने प्रसिद्ध केली होती. त्याबद्दल प्रश्न विचारला असता दलाई लामा म्हणाले, 'अजून काहीच निश्चित ठरलेले नाही' तिबेटी निर्वासितांनी राजकीयदृष्ट्या रशियाकडे झुकण्याचे ठरविले आहे काय या प्रश्नावर त्यांनी पूर्ण मौन राखले. याबाबत ते उघड काही बोलणार नाहीत हेच स्वाभाविक होते पण रशिया व मंगोलियाशी अधिक निकटचे संबंध प्रस्थापित करण्याच्या हालचाली तिबेटी निर्वासित करीत असल्याच्या त्यांच्या गोटातील बातम्या आहेत.

तिबेटमधील चिनी दडपशाही व हत्याकांडाच्या बातम्यांना रशियन पत्रातून मोठी प्रसिद्धी देण्यात येत आहे. १९७२ साली चिन्यांनी बारा हजार तिबेटींना ठार केले अशी माहिती एका सोव्हिएट साप्ताहिकात गेल्या नोव्हेंबरात प्रसिद्ध झाली होती. या साप्ताहिकातील लेखात बानीवेकॉव्ह हे लेखक लिहितात, 'चीनने १९५० साली तिबेटशी कुरापत काढून संघर्ष केला आणि तिबेटी जनतेची राष्ट्रीय मुक्ततेची चळवळ निर्दयपणे दडपून टाकली.' पण तिबेटची ही राष्ट्रीय मुक्ती चळवळ असल्याचा साक्षात्कार या रशियन लेखकाला इतक्या वर्षानंतर झाला काय ? १९५० मधील या संघर्षाच्या वेळी रशियाने तिबेटी जनतेच्या मुक्ती चळवळीची बाजू न घेता चीनला पाठिंबा दिला होता. चीन व रशियन नेत्यात मतभेद असले तरी त्यांना पुढे एवढे तीव्र संघर्षाचे स्वरूप येणार आहे याची कल्पना त्यावेळी रशियन नेत्यांना नव्हती. तिबेटवर पाश्चात्य राष्ट्रांचे प्रभुत्व प्रस्थापित होण्यापेक्षा तो चीनच्या नियंत्रणाखाली असला तरी हरकत नाही असा विचार त्यावेळी रशियन नेत्यांनी केला असावा.

दलाई लामांची बाजू घेण्यात रशियापुढे मुख्य अडचण म्हणजे तसे केल्याने तिबेटातील सरंजामदार-जमिनदार वर्गाची बाजू घेतल्यासारखे होते. समाजवादाच्या दृष्टीने याचे समर्थन कसे करता येईल ? म्हणून दलाई लामांना उघड पाठिंबा दिल्यासारखे होईल अशी कोणतीही हालचाल करण्याचे रशिया टाळीत आहे. लामांच्या नियोजित दौऱ्याचा कार्यक्रम अजून ठरला नाही त्याचे कारणही हेच आहे. दुसऱ्या बाजूने दलाई लामाही आपण प्रतिगामी नाही, सुधारणाविरोधी नाही अशी आपली प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्या दृष्टीने वरील मुलाखतीत त्यांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. दलाई लामा म्हणाले 'मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा मी गौरव करतो. कम्युनिझम आणि बौद्धधर्म यांच्यात समान भूमिका आहे असे मला वाटते. दुसऱ्यांच्या हितासाठी हालअपेष्टा भोगणाऱ्या मानवजातीच्या भल्यासाठी त्याग करा असे बौद्धधर्मातील महायान पंथ सांगतो. कम्युनिझमचे तेच उद्दिष्ट आहे. पिळले गेलेल्यांना त्यांच्या वाट्याचे आहे ते मिळवून देणे हेच कम्युनिझमचे उद्दिष्ट आहे असे मला सांगण्यात आले.' कम्युनिझम व बौद्धधर्म यांच्यातील साम्य दर्शविणारी ही कसरत ओढून ताणून केल्यासारखी वाटते.

तिबेटमधील बदलाबद्दल दलाई लामा म्हणाले, तिबेटमध्ये योग्य व व्यवहार्य बदल होण्याची निकड आहे. जग झपाट्याने बदलत असता तिबेट बदलणार नाही असे म्हणणे अविचारीपणाचे आहे. जुन्या रचनेत बदल अटळ आहे. विकसनशील जगास आवश्यक असलेली नवी रचना आणू शकणारी मार्क्सवाद ही अत्यंत शास्त्रीय सामाजिक आर्थिक पद्धती आहे. 'यावर असा प्रश्न उपस्थित होतो की चीन, तिबेटात कम्युनिझमच आणीत आहे मग त्याला लामांचा विरोध का ? त्याला दलाई लामांचे उत्तर असे की चीन जे आणीत आहे तो कम्युनिझम नसून उघड वसाहतवाद आहे. तिबेटचे आधुनिकीकरण करण्याच्या प्रत्येक प्रयत्नास चिन्यांनी विरोध केला आहे. आमचा विरोध कम्युनिझमला नसून चिनी वर्चस्वास आहे.' □

# सोलकढी

## □ सूर्यांच्या या देशात

समर्थ रामदासांप्रमाणे विश्वाची चिंता करणे मला जमत नसले तरी प्राध्यापक पु. ग. सहस्रबुद्धयांप्रमाणे या देशाची चिंता मात्र मी अहर्निश करत असतो. (येथे चिंता हा शब्द विचार या अर्थाने वापरला आहे.) या देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक भौगोलिक अंगाकडे, त्यांच्यात होणाऱ्या स्थित्यंतरांकडे माझे बारीक लक्ष असते. त्यामुळे या देशात काय चालले आहे, काय होणार आहे, हे मला चांगले आणि सहज समजते.

शिवाय, मराठीच्या प्राध्यापकाप्रमाणे, आपल्याला समजते तेवढेच खरे, असे मानणे मला शक्य होत नाही. म्हणून इतरांना या देशाबद्दल जे वाटते त्याचा सुद्धा परामर्श मी घेतच असतो. त्यावरून अलीकडे माझ्या असे लक्षात आले आहे की आशिया खंडातल्या या सर्वात मोठ्या देशाची स्थिती फार बिकट झाली आहे. येथे भ्रष्टाचार, वशिलेबाजी, लाचलुचपत बोकाळली आहे, टंचाई, महागाई, गरिबी यामुळे जीवनाला अवकळा आली आहे; सत्ताधारी पक्ष उन्मत्त आणि विरोधी पक्ष उन्मनस्क झाले आहेत; विचारवंत लाचार आणि सामान्य माणूस विकल झाला आहे; व्यक्तिस्वातंत्र्याचा एकीकडे लिलाव आणि दुसरीकडे गळचेपी चालू आहे; येथे लोकशाही पद्धतीने माणुसकीचे योजनापूर्वक विडंबन होते आहे; सगळी आश्वासक मूल्ये येथून परागंदा झाली आहेत.

हा तपशील पुरेपुर लक्षात आल्यावर या देशाची मी अहर्निश चिंता करू लागलो होतो. (येथे चिंता हा शब्द चिंता याच अर्थाने वापरला आहे.) परिस्थिती एकूण कमालीची गंभीर होती. आणि मुख्य म्हणजे बऱ्यापैकी उपाय कोणालाच सुचत नव्हता. कोणालाच म्हणजे अगदी मलासुद्धा.

अशा निरुपाय मनस्थितीत असताना दहा-पंधरा दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एक बातमी वाचायला मिळाली, आणि चिंतेची जागा चैतन्याने घेतली! (व्वा व्वा.) या बातमीप्रमाणे, देशातल्या सर्व महाविद्यालयातल्या व विद्यापीठातल्या प्राध्यापकांचे वेतन घसघशीत वाढणार आहे. महाविद्यालयात नव्या नवलाईने लागणाऱ्या प्राध्यापकाला भत्ते सोडून निव्वळ वेतनच आता रु. ७००।- मिळणार असून ते वर्षास चाळीस रुपयांनी वाढत जाऊन अखेर रु. १६००।- च्या शेंडचाला भिडणार आहे. विद्यापीठातल्या रीडरला रु. १२००।- ते १९००।- आणि प्राध्यापकाला रु. १५००।- ते २५००।- इतके खासे वेतन मिळणार आहे.

या वेतनवाढीमुळे काय होणार आहे माहित आहे? माझा शब्द मानणार असाल तर सांगतो: मित्रांनो, या देशाचे उद्याचे चित्र पार पालटून जाणार आहे! प्राध्यापक लोक मुळातच कष्टाळू आणि निष्ठाळू. विद्यादान करताना वेतनाचा विचार मनात येऊ नये म्हणून कोण त्यांची धडपड. तेवढ्यासाठी ते स्वतःला शिकवणे, शिकणे, तयारी करणे उजळणी करणे, नवे विषय आत्मसात करणे, संशोधन करणे या व्यवसायोपयोगी कार्यक्रमात गुंतवून ठेवत असत. धर्मकृत्य असलेल्या ज्ञानदानाचा धंदा होऊ नये यासाठी वाटेल तेवढी किंमत द्यायला त्यांनी आजवर मागेपुढे पाहिले नव्हते. अनघड मुलांना घडवता घडवता हे धडपडणारे राष्ट्र सुडौल घडवले जावे, असा उदात्त हिशेब त्यांच्या मनीमानसी अखंड तेवत होता. स्वतःचे सगळे छानछुनछनक करण्याची कांक्षा त्यांच्या समर्पित जीवनात कधी डोकावलीच नव्हती.

पण अवघड परिस्थितीनेच प्राध्यापककुलाला असे घेरले की त्यांचा सुद्धा नाईलाज व्हावा. त्यांच्या तोंडाने पोटाकडे कधी पाहिले नव्हते, पण अलीकडे पोट इतके कफल्लक झाले होते की विद्यादान बोबडे व्हावे. त्यांच्या विचारी डोक्यांनी छपराची फारशी पर्वा केली नव्हती, पण अलीकडे छप्पर गळायला लागून विचारांची खळ होऊ लागली होती. त्याचा, नाही म्हटले तरी, बिचाऱ्या प्राध्यापकांच्या शिकवण्यावर परिणाम होऊ लागला. त्यांच्या तयारीत ढिसुळपणा येऊ लागला, अधिक पैशासाठी शिकवण्याव्यतिरिक्त, मोसमाप्रमाणे, आंबे आणि फटाके विकायला ते उद्युक्त झाले. चारित्र्याचा पीळ हळू हळू विस्कटू लागला. दोष त्या प्राध्यापककुलाचा नव्हता, फुले पेरणाऱ्यांच्या (?) शेतात काटे पिकवणाऱ्या कृतघ्न मातीचा दोष होता तो. (हे वाक्य नाटककार वि. वा. शिरवाडकरांनी लिहिले असते तर ते काव्यमय भाषेचे उदाहरण ठरले असते, आम्ही लिहिल्यामुळे कोणालाही ते बटबटीत अलंकरण वाटेल. खरे म्हणजे ते तसेच आहे)



म्हणजे झाले असे की परिस्थिती बिघडली म्हणून प्राध्यापक बिघडले, प्राध्यापक बिघडले, म्हणून विद्यार्थी-नागरिक बिघडले, विद्यार्थी-नागरिक बिघडले म्हणून राष्ट्र बिघडले, आणि राष्ट्र बिघडले म्हणून परिस्थिती बिघडली. त्यामुळे 'उषःकाल होता होता काळरात्र झाली' असे सर्वांनाच वाटू लागले. पण आता प्राध्यापकांचे वेतन वाढणार आहे, ही गोष्ट मला अत्यंत शुभसूचक वाटते. या वेतनवाढीमुळे वाघिणीच्या दूधाचा महा-प्रकल्प उभारला जाणार आहे. साऱ्या राष्ट्रात एक नवे तेज, एक नवे चैतन्य फैलावणार आहे. यापुढे या देशातला प्रत्येक प्राध्यापक एक (ज्ञान) सूर्य असेल. अशा सूर्यांनी प्रज्वलीत केलेले असंख्य सूर्य या देशात पिढ्यानपिढ्या तळपत राहतील. सूर्यांच्या या देशात सूर्यांची पिल्ले, 'अंधकार अंधकार म्हणतात तो असतो तरी कसा?' असा प्रश्न पुन्हा पुन्हा विचारतील. ◻

## ◻ ही सवय वाईट्ट असते म्हणे

पाच हजार मैलांवरून आलेल्या इंग्रज साहेबाने आपल्यावर हव्वे तेवढे राज्य केले. साहेब शासक; आपण शासित. साहेब शोषक; आपण शोषित. अशा संबंधामुळे, शिमग्याच्या कवित्वात, साहेबाच्या एका अवयवावर बंदुकीची गोळी झाडण्याची तळमळ आपण व्यक्त केली तर ते योग्य, उचित आणि स्वाभाविकच होय. आता साहेब पाच हजार मैलांवरच्या त्याच्या मायदेशात परत गेला; (शिमग्यालाही आता एक सांस्कृतिक मूल्य आणि प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे); साहेबाला आणि त्याच्या त्या एका अवयवाला आपण विसरलो आहोत.

विसरणे हा आपला राष्ट्रीय स्वभावविशेष आहे. त्यानुसार हे यथास्थित झाले. आमच्यासारख्या काही अराष्ट्रीय लोकांना मात्र वाटते की, आपल्याला पारतंत्र्य देणाऱ्या इंग्रजांना विसरलो तरी क्रिकेट देणाऱ्या इंग्रजांना आपण विसरू नये. क्रिकेट ही एक अद्‌भुत गोष्ट आहे. तो नुसता खेळ नाही; तो एक जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन आहे. क्रिकेट जसे खेळायला हवे तसे खेळणाऱ्या आणि पहायला हवे तसे पाहणाऱ्या राष्ट्राचे वर्तमान आणि भविष्य सर्वस्वी निराशाजनक असू शकत नाही, असा आमचा एक सिद्धांत आहे.

भारत हे खेळणारे राष्ट्र आहे. आपण भारतीय मंडळी घराघरांतून, रस्त्यारस्त्यांतून, सार्वजनिक ठिकाणातून, वाहनातून आपले खास राष्ट्रीय खेळ अव्याहत खेळत असतो. त्याचबरोबर आपण क्रिकेटसुद्धा खेळतो, ही गोष्ट मला लक्षणीय वाटते. मिळेल त्या चिरफाळच्या जागेत यष्टीचे प्रतीक उभारून क्रिकेट चाललेले असते. कोठल्याही वयाच्या मुलाच्या तोंडात क्रिकेटची परिभाषा शिवीगाळीसारखी चपखल बसलेली असते; कसोटी सामन्यांच्या मोसमात लक्षावधी नीटनेटक्या माणसांची माथी एकदम बिथरून जातात; क्रिकेटमधल्या विजयाचा आनंद किंवा पराजयाचे दुःख व्यक्त करताना आपले सगळे तारतम्य पार ढगात जाते; आठवड्यातल्या वारांची नावे एक वेळ आपल्याला व्यवस्थित सांगता येणार नाहीत, पण प्रतिस्पर्धी संघातल्या खेळाडूंची चित्रविचित्र नावे आपल्याला पक्की माहीत होतात.

त्यातही गेल्या चार वर्षांत आपल्या क्रिकेटला जो न्यारा रंग चढला आहे त्याला तोड नाही. टायगर पतौडीनंतर कर्णधार झालेल्या घाटी अजित वाडेकरच्या नेतृत्वाखाली भारताने गॅरी सोबर्सच्या वेस्ट इंडीज संघाचा नक्षा वेस्ट इंडीजमध्ये उतरवला. पाठोपाठ, इंग्लंडमध्ये, जगज्जेत्या रे इलिंगवर्थला धूळ चारली. हे विजय आकाशातून पडलेले नाहीत हे सिद्ध करण्यासाठीच जणू भारताच्या दौऱ्यावर आलेल्या टोनी लुईसच्या इंग्लिश संघाविरुद्धची कसोटीमालिका अजित वाडेकरने जिंकली. परवापरवापर्यंत, हसत पराभव पत्करणे किंवा सर्वस्व पणाला लावून सामना अनिर्णित ठेवणे, एवढेच आपल्याला जमत होते. गणितासारख्या धोकेबाज विषयाची आवड असलेल्या, चित्रपटात नट होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या आणि दादरला शिवाजी पार्कजवळ राहात असल्यामुळे क्रिकेट खेळण्यावाचून गत्यंतर नसलेल्या या वाडेकरांच्या अजितने आता आपल्याला जिंकायची सवय लावली आहे.

ही सवय फार वाईट्ट असते म्हणे. यापुढे आपण सारखे जिंकले पाहिजे, आपण जिंकू तेच क्रिकेट चांगले, असे आपल्याला साहजिकच वाटू लागते. त्यामुळे टोनी लुईसच्या संघाविरुद्ध दिल्लीच्या कसोटी सामन्यात पराभव झाल्यानंतर कलकत्त्याच्या सामन्यासाठी आलेल्या अजित वाडेकरला, 'अजित वाडेकर मुर्दाबाद', 'अजित वाडेकर चले जाव' अशी सभ्य दमदाटी खिलाडूपणाने करून आपली भूमिका आपण व्यवस्थित स्पष्ट केली होती.

निवड-समितीची भूमिका यावेळी वेगळी असू शकत नाही. त्यामुळे तूर्त तरी अजित वाडेकरहून वेगळा कर्णधार निवडण्याचा राष्ट्रीय महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला नाही. अशा परिस्थितीत, इंग्लंडविरुद्ध होणारी कसोटीमालिका अजित वाडेकरला जिंकायलाच हवी. हॉकीत पदरी येणारे अपयश क्रिकेटमध्ये भरून काढल्याशिवाय आपल्याला चैन कशी ती पडणार नाही.

आता आपल्याच (म्हंजे भारतीय जन्तेच्या) चैनीवेचैनीचा सवाल असल्यामुळे अजित वाडेकर विजयी हा होईलच आणि यदाकदाचित ते त्याला जमले नाही तर गणित विषयाचा उच्च अभ्यास करण्याची किंवा हिंदी–मराठी चित्रपटात चरित्रअभिनेता होण्याची संधी आपण त्याला सहज देऊ शकू.

—अनंतराव

चित्र
वार्ता
पुरवणी

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

झीनी – झीनत




## फ्लॉप्समुळे काही बिघडले नाही

' हलचल ' या चित्रपटासाठी निर्माता–दिग्दर्शक ओ. पी. रल्हन यांनी प्रेस कॉन्फरन्स घेतली होती. ' आपण आपल्या चित्रात कोणीही ' भंगी ' (स्टार) घेणार नाही. काही लेकाचे काम करत नाहीत. सगळे नवीन लोक घेणार आहोत. कबीर बेदी, अंजली कदम, झीनत अमान– '

झीनत अमानची ' मिस आशिया ' म्हणून रल्हनसाहेबांनी ओळख करून दिली. त्यावेळेस ती स्टार नव्हती. मिस आशिया कशी दिसते म्हणून हलचल पहाताना पडद्यावरची प्रत्येक फ्रेम पहात होतो. पण कुणाही मिस एशियाची ओळख पटली नाही.

त्यानंतर ' हंगामा. '

' हंगामा 'ची नायिका होती झीनत. या कॉमेडीमध्ये तिला विशेष काम नव्हते. पण तिला पडद्यावर नीट पहाता आले. ती एका खानदानी राजघराण्यातली छोकरी होती. उंच–निंच. रेखीव चेहरा. कुठेही मांसलपणा नाही–नाजुकपणा नाही. पण चेहऱ्यात



झीनी
अ परफेक्ट
मॉडर्न गर्ल...

अद्याप लहान मराठी नाटकात चालणाऱ्या फ्लॉवरी चेहऱ्याच्या बालनटीचा चेहरा घेऊन ती आली होती. तिच्या उंचीमुळे ती भारदस्त 'सूर्यफुला'सारखी वाटत होती. आमच्या पत्रकार मित्रांनी तिला नामंजूर केली. आम्ही हेमा आणि नूतनखेरीज कुठल्याही अभिनेत्रीला हिरॉइन म्हणून पास करत नसू. आम्हाला मीनाकुमारी चालते हे ठीक आहे. पण जाहिदा, किंवा झीनत मात्र पसंत नव्हती.

'हरे राम हरे कृष्ण'च्या निमित्ताने देवसाहेबांनी इऱ्या–गिऱ्या पत्रकारांना पार्टी दिली होती त्यावेळी झीनत आईबरोबर हजर होती. झीनत सफाईदार इंग्रजी बोलणारी, आपले अभिनयगुण दाखवण्यासाठी आसूसलेली. 'हंगामा–हलचल' यातील भूमिका केल्यामुळे यापुढे आपण चोखंदळ होणार असे सांगणारी. 'हरे राम–हरे कृष्ण' या चित्रपटाचा संगीतानंतर दुसऱ्या क्रमांकाचा ॲसेट झीनत ठरेल असे कुणालाही वाटत नव्हते. त्या चित्रात देवसाहेब होते, मुमताझ होती. झीनतलाही वाटत नव्हते. ती फक्त आम्हाला आपली भूमिका समजावून सांगत होती. आपण एक 'एशिया सुंदरी' असून सिनेमात पाऊल टाकणे, ही गलती नव्हे. हे पटवून सांगत होती. आणि तिची मातोश्री–ती मराठी बाई आहे. आमच्या 'लाँग जॉन' या दर्जेदार व्हिस्कीच्या ग्लासला ग्लास लावून 'माझ्या छोकरीच्या यशासाठी प्राशन करा' म्हणून आवाहन करत होती. आम्हाला तिच्या डोक्यात व्हिस्की चढल्यामुळे मजा वाटत होती. आईचं तोंड फाटेपर्यंत छोकरीचं कौतुक चाललं होतं. त्यावेळी झीनत आम्हाला एकेकटचाला गाठून सांगत होती, 'आईचं म्हणणं मनावर घेऊ नका हो. (मी काही एवढी मोठी ॲक्ट्रेस नाही!)

त्यानंतर हरे राम हरे कृष्ण झळकलाच. आणि कालची अत्यंत मॉडेस्ट मिस एशिया 'दम मारो दम' छोकरी म्हणून तत्काल गाजली. मिनी फ्रॉक–गोगो गॉगल, तिचे आपल्या हिप्पी सहकाऱ्यातले अत्यंत निरागस वागणे, अखेर आपली हिप्पीगिरी अंगाशी येताच, तिचे पंख तुटलेल्या पाखरासारखे तडफडणे या साऱ्यातच एक जान होती. एरवी तिला नुसती चिलीम फुंकूनही काम रेटता आले असते. पण तिने खरोखरच

आपली भूमिका वठवण्यासाठी पराकाष्ठा केली होती.

एकूण झीनत ही पडद्यावरची एक घटना होती.


झीनत गाजली. एका चित्रामध्ये एखादी अभिनेत्री गाजली तर किती गाजावी. परवा हृषिदांनी आपल्या 'चैताली' या चित्रातून शर्मिला टागोरला काढून टाकले आणि सायराबानुला घेतले. त्यावेळी शर्मिला म्हणाली, 'मला हे समजत नाही,–. सायराबानुला हृषिदा माझ्यापेक्षा अधिक चांगली अभिनेत्री मानू लागले ? एकवेळ त्यांनी हेमाला किंवा झीनतला माझ्या जागी घेतले असते, तर तेही मी मंजूर केले असते. कारण आज त्यांचे दिवस आहेत.

सिनेमात दिवस हेमाचे आहेत की नाही कुणास ठाऊक पण झीनतचे मात्र आहेत. कारण झीनत ही आजच्या सगळ्या नटचामध्ये आधुनिक आहे. तनुजा ज्यावेळी आधुनिक पेहराव करीत असे, सिगारेट, व्हिस्की पीत असे, त्यावेळी, ते दिवस तिचे नव्हते. त्यामुळे तिच्या वागण्याची चर्चा होत असे. झीनत दारू, सिगारेट पीत नाही. पण आधुनिक पेहेराव करते, आपल्या दोस्त मंडळीमध्ये रमते, देवसाब बरोबर रहाते आणि तरीसुद्धा ती गाजते. आपल्याला पिक्चर्स मिळतील की नाही याची तिला कधीच फिकीर वाटत नाही.

गॉसिपवाले झीनीवर एकदम खुश. झीनतमुळे देवसाबची 'पडदा फाश' सुरू झाली होती. यापूर्वी देवची प्रकरणे नेहमी छुपी राह्यली होती ना. राजकपूर म्हणायचा माझ्याबरोबर कुणालाही पाह्यलं की चर्चा होते आणि देवबद्दल ? तो कुणाला थांग पत्ता लागू देत नाही. पण झीनीमुळे अखेर देवही गॉसिपवाल्यांच्या तावडीत सापडले. देवच्या यापूर्वीच्या मुमताझ, जहिदा या जवळ आल्या नि गेल्या. एकच पिक्चर करूनच दूर गेल्या. देववर नाराज होऊन पण झीनी मात्र देवला सोडून गेली नाही. हीरा-पन्ना फ्लॉप झाल्यावरही. त्याच्याबरोबर 'इष्क-इष्क इष्क' 'डार्लिंग-डार्लिंग' 'प्रेमशास्त्र' अशी आणखी तीन चित्रे करते आहे. देवच्या 'इष्क-इष्क-इष्क' चे हिमालयात शुटिंग होते. झीनत गेली. दुसऱ्यांची कामे बाजूला सारून ती गेली. 'मनोरंजन'च्या निमित्ताने झीनीने गॉसिप कॉलमीस्टांना जबाब देण्याचे ठरवले. झीनत मोठी चतुर. तिने असे जबाब दिले की त्याच्यातून कुठलाही अर्थ निघू शकेल. किंबहुना गॉसिप कॉलमिस्टांनी तिच्यामध्ये आणि देवमध्ये जे संबंध सूचित करायचे आहेत ते खरोखरच तसे आहेत की नाहीत याचा तिने थांग पत्तालागू दिला नाही. दॅट



देव – झीनत – कोण कोणाला खेचतोय्...



'आ 'कारान्तवाले ओमप्रकाश 'आपकी कसम 'च्या वेळी मुमताजबरोबर

वॉज झीनी—ए परफेक्ट मॉडर्न गर्ल.

ती कधी हिरॉईन नव्हतीच. हिरॉईनची कामे तिला जमली नसती हे तिच्या 'यादों की बारात किंवा हीरा-पन्ना ' या चित्रावरून दिसून आलेच. एक खरोखरच जिवंत भूमिका असेल तरच ती त्या भूमिकेला फिट् बसते. एरवी ती हंगामा-हलचल इतकीच अभिनयाने कोरी वाटते. 'यादों की बारात ' मधल्या 'चुरा लिया है दिल किसीने ' या गाण्यापुरतीच काही ती जिवंत झाल्यासारखी वाटली नि पुन्हा बेजान झाली. 'हीरा-पन्ना 'मध्ये तर एकसुरी डॉयलॉग्ज टाकण्याच्या लकबीने तिने इतका उवग आणला ली राखी इतकी की लक्षातच राह्यली नाही.

'मनोरंजन ' मध्ये झिनीसाठी खरोखर एकच चपखळ भूमिका मिळाली.

'मनोरंजन ' मधली भूमिका 'इर्मा ' या वेश्येची. एक सरळ मनाची वेश्या. आपला पेशा आणि प्रेम यातील तोल सांभाळताना गडबडून गेलेली सरळ मनाची वेश्या. अर्थात तिचा प्रियकर हा वेगळ्या संस्कृतीतला. तिच्यावर निरतिशय प्रेम करणारा आणि तिच्यामध्ये परिवर्तन करण्याची धडपड करताना गडबडलेला. त्यामुळे तिला त्याचा संशय येऊ लागतो आणि ती त्याच्यावर गुस्सा करू लागते हे प्रसंग झीनतने जीव तोडून पेश केले आहेत. तिचे आणि संजीवचे झगडे हा 'मनोरंजन ' मधला अत्यंत पकड घेणारा भाग झाला आहे. झीनतची बोलण्याची एकसुरी लकब लपून रहात नाही आणि नाचताना ती 'दम मारो—दम ' हे नृत्यापलीकड जाऊ शकत नाही. ह्या मर्यादा असूनही ज्यावेळी ती संजीवपुढे आपले नुसते ओठ पेश करते, त्यावेळी ही अदा सर्वांनाच 'इन्वाईट ' करत असते. अशी माशुकगिरी पाह्यल्यानंतर आपण इतके कधी थरारलो नव्हतो. झीनी 'मनोरंजन ' मध्ये आपल्याला पहा म्हणत होती. 'हरे कृष्ण हरे राम ' पूर्वी असेच म्हणत होती. झीनीला योग्य भूमिका मिळाली की ती नेहेमी, 'नाऊ यू वॉच मी ' असं म्हणते नी आपण खरोखरच मग तिच्याकडे पहात रहातो.

आणखी एक गोष्ट. मनोरंजनमध्ये प्रथमच झीनीला खूबसुरत अंदाजाने पेश केली आहे. She was luxury in bed, grace in nudity and a dream in costume. □

दृश्याने केलीय. अमर मनातून दुःखी आहे. जाहिरात जगातील एक मस्त चेहऱ्याची पोरगी त्याला ' मुन्ही ' बघण्यासाठी बोलावते. परंतु आजचा त्याच्या लग्नाचा वाढदिवस. अर्ध्या खेळातूनच तो उठून येतो. इकडे त्याचा मित्र आणि बायको वाट पाहात बसलेत. पण कसलाच उत्साह नाही. डोकं दुखतंय म्हणून तो आत निघून जातो. आणि मग यादो की बारात सुरू होते. फ्लॅशबॅक पद्धतीचा सुंदर वापर करून अनेक प्रसंग दोघांनाही आठवतात तसे दाखविले आहे. लग्नाआधी एकमेकांना भरविणारी ही पाखरं आता जेवणावरूनच एकमेकावर उठतात. खाली पेट तुम काम नही कर सकता म्हणून मानसी अमरची किती काळजी घ्यायची. पण हल्ली अमर बारक्यासारख्या गोष्टीवरून चिडतोय. माझ्या कपाटात तुझे कपडे का म्हणून तिला फटकारतोय. तिनं वैतागून त्याला ' बिचारा ' म्हटल्याबरोबर अमर मानसीला थोबडून काढतो. मानसी आतल्या आत रडतेय. तिच्या गालावरून एक टपोरा अश्रू मोत्यासारखा ओघळतो आणि तिला लग्नाआधीचा प्रसंग आठवतो. कमळाच्या पानातला थेंब घेऊन अमर मानसीला विचारतो हे काय आहे. मानसी म्हणते, पानी की बूंद, मोती. अमर म्हणतो, नाही हा अश्रू आहे. कमळाचा. मानसी तो चाखते तर खरोखरच तो खारट असतो. अमर मग एक आदिवासी कथा सांगतो. लग्नाच्या दिवशी आदिवासी जोडपे रात्रभर रडतात. का तर म्हणे पुढच्या संसारात रडारड नको म्हणून. आज मानसीला ती कथा पटली आहे. इकडे अमरला पहिल्या वाढदिवसाची धमाल आठवते. पहिल्या वाढदिवशी टॅक्सीत टॅक्सीवाल्याच्या बायकोसह चौघेही वाढदिवस साजरा करून धमाल करतात. कविता करून ती दोघांच्या फोटोच्या मागे चिटकवली जाते. दोघांनी तीवर एकमेकांची नावे लिहिलेली असतात. आज तीच फ्रेम अमर चिडून फेकून देतो अशा अनेक तपशीलवार प्रसंगातून अमर आणि मानसीच्या मनातील सारा संघर्ष उभारून शेवटी संसारातल्या काव्याबरोबर दूधवाला भैय्याही महत्त्वाचा असतो हे सांगत बासु भट्टाचार्यांनी अमर आणि मानसी ह्याने स्वप्न आणि वास्तव ह्यांचा सुंदर छेद घेतला आहे.

## सुंदर छायाचित्रण

छायाचित्रण हे अविष्कारचे खास वैशिष्टच. चित्र रंगीत आहे. त्यात पुन्हा काही शॉटस असे काही देखणे आहेत की डोळ्यांचे पारणे फिटते. थोडक्यात छायाचित्रण परदेशी चित्रपटाच्या तोडीचे आहे. परंतु चित्रपट कलात्मक व्हावा ह्या वेडाने झपाटल्यामुळे फोटोग्राफीच्या जेवढ्या काही ' गिमिकस ' असतात तेवढ्या वापरून टाकल्या आहेत. लाँग शॉट, झूमशॉट, क्लोज-अप त्वर, स्लो मोशन, स्टील, वगैरे वगैरे अनेक प्रकार वापरल्यामुळे फिलम अति डेकोरेटिव्ह झाली आहे. विशेषतः प्रिया-प्रियकराचे मिलन स्लो मोशनमध्ये म्हणजे हवेत तरंगल्यासारखे दाखविण्याइतके सर्रास झाले आहे की ते सिगरेटच्या जाहिरातीत सुद्धा दाखवतात. हा मोह वासुभट्टाचार्यांनी टाळावयास हवा होता. तसेच अमर मानसीला थोबाडतो हा शॉट पुन्हा का दाखवला आहे हे कळत नाही. फ्लॅशबॅक पद्धतीने स्मृती आणि कल्पना ह्यांच्या साहचार्यातून भूतकाळातील स्वप्नील क्षण पकडताना बासु भट्टाचार्य अति कलात्मकता दाखवितात. ह्या अति कलात्मकतेच्या वेडाने ह्या चित्रपटाचा आत्माच गुदमरून गेला आहे. शेवटी प्रेक्षक अस्वस्थ होत नाही. एवढे रामायण घडूनही तो भारावला जात नाही. काहीतर सुंदर-सुरेल डोळे आणि कान पाहतात, ऐकतात पण हृदय हेलावत नाही. शेवटी प्रेक्षक परिणामशून्यसा बाहेर पडतो.

## संवाद आणि अभिनयाची जुगलबंदी

ह्या चित्रपटातील संवाद खरोखरच ऐकण्यासारखे आहेत. संवाद खटकेबाज आहेत. दोन पात्रे बोलताना आपण जुगलबंदीच ऐकतोय असे वाटते. परंतु हे सारे संवाद लेखकाचे वाटतात. त्या त्या पात्रांचे वाटत नाहीत. सारीच पात्रे अशी काही बुद्धीगम्य संवाद फेकतात की त्यामुळे अमर जसा बोलतो तसाच अमरचा सासराही बोलतो, तशीच अमरची मैत्रीणही बोलते. त्यामुळे वैचित्र्य काहीच नाही. मात्र जिथे संवाद नाहीत तेच प्रसंग अधिक बोलके झाले आहेत. उदाहरणार्थ अमर व मानसी ह्या दोघांचेही हात नकळत एकाचवेळी लहानग्या बाळावर पडतात व ते पटकन बाजूला काढणे, तसेच अमरचे सिगरेट पेटविणे आणि मानसीने ती सिगरेट आपल्या हाताने फटकारणे ही फटकेबाजी फारच परिणामकारक झाली आहे. तसेच ' बाबूल मोरा ' ह्या सैगलच्या गाण्याचा वापर फारच योग्य ठिकाणी केला आहे. एका ठिकाणचा संवाद औचित्यपूर्ण वाटला नाही. मानसी आपल्या गर्भावस्थेचा अनुभव सांगताना अमरला सांगते की तो इवलासा जीव ' दूरसे दौडके आता है ऐसा लगता है,' तेव्हा अमर म्हणतो इतनी छोटीसी जगमे वह दौडते कैसा आयेगा ? तसाच एक प्रसंग. मानसी गंमत म्हणून धंदेवाईक बाईसारखे अमरला शुक् शुक् करून बोलावते तेव्हाचा. असो.

अविष्कारचे खरे वैशिष्टय राजेश खन्ना आणि शर्मिला टागोर ह्यांच्या सहज अभिनयात आहे. दोघांनीही आपल्या भूमिका मन लावून केल्या आहेत. राजेश खन्ना व शर्मिला टागोर ह्यांच्या अभिनयाची जुगलबंदी बघत राहावी अशी आहे. दोघांनीही आपला वैताग आपल्या व्यथा, तडफड आणि एकमेकारचे असीम प्रेम मनापासून व्यक्त केले आहे.

अविष्कारचा शेवट मात्र परिणामकारक नाही किंवा तो पटणारा नाही. कित्येक दिवस मनातून दुरावलेले पती पत्नी हे केवळ वाढदिवसाचे एका घटनेने जवळ येतील असे वाटत नाही. म्हणूनच रात्रभर आतल्या आत रडणारी मानसी पहाटे जेव्हा दुध घ्यायला दरवाजा उघडते तेव्हा बाहेर तिच्यासाठी अमर वाढदिवसाची भेट म्हणून आणलेला पण कोमजलेला पुष्पगुच्छ दिसतो आणि तिचे सर्व गैरसमज दूर होऊन ती अमरला बिलगते हे फिल्मी वाटते.

तरी पण चालू हिंदी सिनेमात जो मालमसाला असतो तो येथे नाही. त्यामुळे अविष्कार रसिक प्रेक्षकांनी आवर्जून बघावा. निदान शर्मिला राजेशच्या अभिनयासाठी.

□ □

# मला न भेटलेले नानासाहेब फाटक

पुष्पा भावे

कोणतेही नाटक प्रत्यक्ष पाहाण्यापूर्वी नानासाहेब फाटक हे नाव मी ऐकले होते. नाव...म्हणजे सगळं काही—नानासाहेब रंगमंचावर पहिले पाऊल टाकत ते दमदार कसे असे – नानासाहेब दिसत कसे – नानासाहेबांचा आवाज – आवाजाचा पल्ला – असंच खूप काही जुनी माणसे हरखून जात बोलत असत. त्यामुळे आमच्या लेखी नानासाहेब फाटक ही आख्यायिकाच होती. अशी बरीच वर्षे गेली. मध्यंतरी दादरच्या नाक्यावरून जाताना कुणीतरी दबलेल्या आवाजात 'नानासाहेब फाटक' असे शब्द उच्चारले. आमच्यासमोर पांढराशुभ्र सदरा घातलेली उग्र मुद्रा असणारी एक व्यक्ती स्वतःच्याच तंद्रीत उभी होती. हे त्यांचे दर्शन नेहमी घडत असे. लहान असताना मी घाबरत घाबरत हात उचलून नमस्कारही केला होता. त्यांनी सरावाने तो स्वीकारलाही होता. पण नंतर खरोखरच नाटके पहायला लागल्यावर, नाटक—नाटचेतिहास यांविषयी स्वारस्य निर्माण झाल्यावरही, नानासाहेबांना भेटायला जायचा धीर कधी झाला नाही. ओळखीचा योग कधी आला नाही. त्यामुळे परवा कोणीतरी धावत येऊन सांगितले, 'नानासाहेब गेले' तेव्हा चेहऱ्याच्या रेषा फार हलल्या नाहीत. कारण जाण्याआधी दहा घरे पलीकडे ते राहत होते तेव्हाही, भेट कधी झालीच नव्हती.

एखाद्या नटाची अशी भेट झालेली नसणे यालाही फारसा अर्थ नव्हता. पण अन्य मार्गानेसुद्धा या नटवर्याचे खरे दर्शन घडतच नव्हते. नानासाहेबांच्या खूप गाजलेल्या काही भूमिका पाहाण्याचा योग आला पण तो त्यांच्या उतरत्या उमेदीच्या काळात की ज्यावरून त्यांच्या अभिनयाविषयी काही निर्णय घेणे न्यायाचे होणार नाही. मला साल आठवत नाही....पण तेव्हा 'शिवाजी मंदिर'चे बांधकाम चालू होते म्हणून गच्चीवर उभारलेल्या तात्पुरत्या नाटचगृहात प्रयोग होत असत. 'बेबंदशाही' नाटकात नानासाहेब फाटक काम करणार म्हणून आम्ही काही विद्यार्थी धावतपळत नाटक पहायला गेलो. ज्या अवस्थेमध्ये नानासाहेब संभाजीची भूमिका करायला उभे राहिले होते त्या अवस्थेत दमदार पाऊले, दमदार आवाज, काहीच शक्य नव्हते. केवळ विमनस्कता पदरी घेऊन आम्ही परतलो. पुन्हा स्वतःची परीक्षा पाहू नये असा निश्चय करूनही 'हॅम्लेट'चा प्रयोग पहायला गेलो. 'हॅम्लेट'च्या भूमिकेत मात्र काही जागी खरे नानासाहेब कसे असतील याची चुणूक दिसत असे. विशेषतः 'हॅम्लेट'ची भूमिका ते समजून करीत असत. वाक्यांचा न्यास ते असा काही तोलीत असत की त्यातून बदलती मनोवृत्ती व्यक्त व्हावी. तरीही अनेक ठिकाणी ते विनाकारण चढा सूर लावीत असे आम्हाला वाटे. पुढे कोणाबरोबरतरी बोलताना फाटकांनीही हे कबूल केले होते– 'प्रेक्षकांना आवडते म्हणून करतो' असे त्यांचे स्पष्टीकरण होते. 'मुंबई मराठी साहित्य संघा'ने थाटामाटाने रंगमंचावर आणलेल्या 'भाऊबंदकी' नाटकात त्यांची 'राघोबा'ची भूमिका पाहिली. याकाळात ठेकेदारी पद्धतीने होणाऱ्या नाटकातील चित्रपटकलावंतापेक्षा नानासाहेबांचा व्यक्तिगत डौल इतका झकास होता की त्यामुळे कोणतीही भूमिका त्यांना शोभून दिसे. जो शोध आम्ही गेली अनेक वर्षे करीत होतो तो मात्र आम्हाला लागत नव्हता. –आम्ही ऐकलेल्या आख्यायिकांचा प्रत्यय आम्हाला हवा होता. पण हा नट तर जवळजवळ निवृत्त झाला होता. याचवेळी 'वीणा' मासिकातून त्यांचे लेख येऊ लागले आपण केलल्या विविध भूमिकांचे विश्लेषण करणारे हे नानासाहेब फाटकांचे लेख त्यांच्या चाणाक्षतेची, वाचनाची आणि नाटककाराच्या शब्दांविषयीच्या आदराची साक्ष देणारे होते. पण त्याचबरोबर सरसकट सगळ्या नव्याला तुच्छ लेखण्याचा त्यांचा दर्पही झोंबत असे. विशेषतः गणपतराव बोडसांविषयीचे त्यांचे लेखन मागच्या पिढीलाच नाही तर आम्हालाही खुपत असे. कारण जुन्या नटांपैकी गणपतराव बोडसांना रंगमंचावर आम्ही खूप पाहिले होते– त्यांची व्याख्याने ऐकली होती. त्यामुळे 'वीणे'तली लेखमाला वाचताना वा कालच पुन्हा 'मुखवटचांचे जग' वाचताना नानासाहेब फाटक या श्रेष्ठ नटाची हुकलेली भेट काही साधली नाही.

ऐन संगीत रंगभूमीच्या वैभवाच्या काळातला हा व्यक्तित्त्वसंपन्न गद्यनट किती सामर्थ्यवान होता हे आम्हाला का कळले नाही ? कारण आम्ही परंपरेच्या अभिमानाच्या कितीही गप्पा मारल्या तरी काही मेहनतपूर्वक जतन करणे आम्हाला जमत नाही. अधुनिक सुविधांच्या या काळात चिंतामणराव, गणपतराव, नानासाहेब या साऱ्या नटांचे काही संचित मागे न ठेवता आपण त्यांना जाऊ दिले. अजूनही हे काही जतन करण्याची यंत्रणा आमच्या सरकारच्या सांस्कृतिक खात्याकडे वा नाटचपरिषदेकडे नाही. येणाऱ्या अनेक पिढ्या नानासाहेब फाटकांचा शब्द ऐकू शकल्या असत्या – जर तो शब्द ध्वनिमुद्रित असता तर–

मग कालपासून मनात येतो तो फक्त एकच प्रसंग : 'ललितकलादर्श'च्या हीरकमहोत्सवानिमित्त पु. ल. देशपांडे यांनी घडविलेल्या इतिहासदर्शनात नानासाहेबांनी 'वृंदावन' उभा केला होता. त्यावेळचा त्यांचा अभिनय पाहाताना वा आज तो आठवताना हुकलेल्या भेटीची हुरहूर मात्र वाढत आहे !

# उलटी सुलटी अमेरिका

लेखक
**आर्ट बुकवॉल्ड**

अनुवाद
**अनंत भावे**

## निळे डोळे, हिरवे दात

वर्णभेदावर विश्वास असलेले गव्हर्नर जॉर्ज सी. वॉलेस समजुतदार गृहस्थ आहेत. वर्णभेदाचे समर्थन करताना ते निग्रोवर सरसकट तुटून पडत नाहीत. अगदी वेगळचा पद्धतीचा अवलंब ते करतात. उदाहरणार्थ, समान नागरी हक्काच्या कायद्याला विरोध करताना ते युक्तिवाद असा करतील : 'एखाद्या निळचा डोळचांच्या आणि हिरव्या दातांच्या माणसालाच तुम्हाला आपलं घर विकावसं वाटेल, हे योग्यच आहे. याला विरोध नाही माझा. पण अशाच माणसाला ते विकण्याची सक्ती असता कामा नये तुमच्यावर. माणसाचं घर हा त्याचा किल्लाच असतो स्वतंत्र.'

अगदी अलीकडे वॉशिंग्टनमधले माझे घर विकायला काढले मी; तेव्हा वॉलेसमहाशयांच्या युक्तिवादात केवढेतरी तथ्य आहे हे माझ्या लक्षात आले. कितीतरी माणसे विकाऊ घराकडे नुसती पाहायची. ते विकत घ्यायची इच्छा मात्र कोणालाच जणू होत नव्हती. मग एके दिवशी एक मनुष्य त्याच्या बायकोसमवेत आला. त्याचे कपडे नीटनेटके, व्यवस्थित होते. बोलण्यावागण्यात अदब होती. पण सर्वात जर कोणती एक गोष्ट मला ठळकपणे जाणवली असेल तर त्याचे निळेभोर डोळे. मी घर त्याला विकूनच टाकणार होतो; इतक्यात तो हसला आणि त्याचे हिरवे दात मला दिसले !

'माफ करा', मी शक्य तितक्या सौम्यपणाने म्हटले, 'पण मला हे घर तुम्हाला नाही विकता येणार.'

'का? माझे दात हिरवे आहेत, म्हणून ?' त्याने विचारले,

'होय, निळचा डोळचांच्या आणि हिरव्या दातांच्या माणसाला घर विकणार नाही, असं शेजाऱ्यांना वचन दिलंय मी. तुमचे डोळे हिरवे आणि दात निळे असते किंवा डोळे तपकिरी आणि दात पिवळे असते तर काहीच अडचण नव्हती. पण एक गोष्ट तुम्हीही मान्य कराल : माझं घर हा एक किल्लाच आहे माझा !'

तो मनुष्य माझ्या बायकोकडे वळून विषादाने म्हणाला, 'आधी तीनजणांनी याच कारणासाठी घर दिलं नव्हतं आम्हाला, तुम्ही चौथे. दात हिरवे आहेत माझे, हा काही माझा गुन्हा नाही. बाजारातली सगळी दंतमंजनं वापरून पाहिली मी. देशातल्या सगळचा तज्ज्ञ दंतवैद्यांचा सल्ला घेतला मी. ते म्हणतात, माझ्या रक्तपेशीतच असलं पाहिजे काहीतरी, आपण तरी द्या ना मला घर. फार उपकार होतील.'

'समजा, द्यावंसं वाटलं आम्हाला तरी कसं देणार हो ?' माझ्या बायकोने त्याला सांगितले, 'कारण केवळ तुमचे डोळे निळे निळे आणि दात हिरवे आहेत असं नाही, तर तुमच्या बायकोचे पण डोळे निळे आणि दात हिरवे आहेत ना ?'

आता त्याची बायको बोलली, 'अर्थात डोळे निळे आणि दात हिरवे आहेत माझे. पण मला सांगा, अशा मुलीशी निळचा डोळचांच्या आणि हिरव्या दातांच्या पुरुषाशिवाय दुसरं कोण लग्न करणार होतं ? हॅरॉल्ड भेटेपर्यंत मला वाटायचं, मी अशीच म्हातारी होऊन मरणार.'

मी मध्येच विचारले, 'मला वाटतं, तुमच्या मुलांचेसुद्धा डोळे निळे आणि दात हिरवे असतील नाही ?'

हॅरॉल्ड 'हो' म्हणाला.

'माझी पंचाईत लक्षात घ्या तुम्ही' मी त्यांना म्हटले, 'आमच्या शेजारी सगळी तपकिरी डोळचांची आणि पांढऱ्या दातांची मुलं आहेत. या मुलांना जर निळे डोळे आणि हिरवे दात असलेल्या मुलांच्या शाळेत जावं लागलं तर त्यांच्या आईवडिलांना काय वाटेल ? तुमच्या आणि माझ्या मुलांनी एकत्र खेळावं अशी परमेश्वराची खरोखरच इच्छा असती तर माझ्या आणि तुमच्या मुलांच्या डोळचांचा-दातांचा रंग सारखाच ठेवला असता त्यानं.'


'पण माझ्या मुलांना एक संधी उपलब्ध करून द्यायची इच्छा आहे माझी' हॅरॉल्ड सांगू लागला. पांढऱ्या दातांच्या मुलांना मिळते तशी चांगल्या वस्तीत राहायची, चांगल्या शाळेत जायची संधीच जर निळचा डोळचांच्या आणि हिरव्या दातांच्या मुलांना मिळाली नाही तर त्यांच्यात सुधारणा व्हायची तरी कशी ?'

'केवळ माझ्या एकटचाचाच प्रश्न असता तर बहुधा घर विकत दिलं असतं मी तुम्हाला माझं.' मी म्हणालो, 'पण मी तसं केलं तर पाठोपाठ निळचा डोळचांच्या आणि हिरव्या दातांच्या माणसांचे लोंढेच्या लोंढे वळतील या वस्तीकडे. जमिनीचे, घरांचे भाव धडाधड कोसळतील. निळचा डोळचांची माणसं करडचा डोळचांच्या माणसांशी लग्न करतील, आणि काय होतंय हे कळायच्या आत चमत्कारिक आडवेतिडवे वर्णसंकर होऊन जातील.'

हॅरॉल्डने सांगितले, 'पण करडचा डोळचांच्या आणि पांढऱ्या दातांच्या माणसांशी लग्न नाही करणार आम्ही. आम्हाला फक्त राहायला चांगली जागा हवी आहे. बऱ्यापैकी नोकरी आहे मला. पण माझ्या मुलांनी आयुष्यात काहीतरी आणखी बरं करावं अशी इच्छा आहे माझी. तुम्ही समजून का घेत नाही मला ?'

'मी जरूर समजून घेतो तुम्हाला' मी उत्तरलो, 'पण दुसरं कोणीच समजून घेत नाही, त्याला मी काय करणार ?'

□ □



इलेनच्या कॅफेतून ते बाहेर पडले तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. जाताना वेस्टोननं कॅरोलला आपल्या घरी चलण्याबद्दल विचारलं, तेव्हा तिनं त्याचा हात घट्ट पकडून उत्तर दिलं. मग वेस्टोन खुशीत आला. संध्याकाळपासून सगळा वेळ कसा आनंदात गेला होता. त्याचा शेवट असाच हवा होता.

वेस्टोननं आपल्या पत्नीशी घटस्फोट घेतल्यानंतर त्याची कॅरोलशी चांगलीच ओळख झाली होती. पण कॅरोल त्याच्या घरी क्वचितच राहात होती. घरी पोचल्यावर वेस्टोनच्या डोक्यात आलं, 'कॅरोलला काय वाटत असेल ? आपण तिला आज रात्री बोलावलं खरं.' तो तंद्रीत असतानाच तिनं त्याच्या अंगावर झुकून त्याचं चुंबन घेतलं. त्या स्पर्शानं वेस्टोनला फार बरं वाटलं, त्याच्या दुखावलेल्या मनाला दिलासा वाटला.

'नित्याची चाकोरी
तुम्हाला नको होती.
पण मला त्यात
आनंद होता.
त्या चाकोरीतच मला जगायचं होतं.'
नॉर्मा आवेगानं बोलत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता गजर झाला. त्याआधी वेस्टोन जागा झाला होता. रविवार उजाडल्याची जाणीव त्याला केव्हाच झाली होती. ताबडतोब उठून तो सकाळच्या कार्यक्रमाला लागला. आंघोळ, दाढी उरकून तो कॅरोलपाशी आला तोपर्यंत कॅरोल जागी झाली होती. उजाडलेली सकाळ पाहात ती तशीच बसून होती. तिचे दाट काळे केस विखुरले होते. तिनं त्याला विचारलं, 'आज तुम्हाला आपल्या घरी जायचं असेल. तुमचा चेहराच सांगतोय तसं. वेस्टोनची

खुषी उघड दिसत होती. तो जायला निघाला तेव्हा तिनं त्याला जवळ बोलावलं, त्याच्या कोटाच्या खिशात अर्धवट खोचलेला रुमाल नीट बसवला आणि विचारलं, 'तुम्ही परत येईपर्यंत मी काय करू ?' त्या दिवशी तरी कॅरोलनं थांबू नये असं त्याला वाटत होतं. तिला न दुखवता कसं सांगावं हे त्याला समजेना. झटकन तो बोलून गेला, 'मी उशीरा येईन. अर्थात तू थांबणार असलीस तर जरूर थांब.' तिनं हसून त्याला निरोप दिला.

आपल्या 'घरी' जाण्यासाठी वेस्टोन स्टेशनवर पोचला. त्याचं घर न्यूयॉर्कच्या बेलमोर उपनगरात होतं. घटस्फोटानंतर प्रत्येक महिन्यात पहिल्या रविवारी त्या मुलाला भेटण्याची परवानगी त्याला कोर्टानं दिली होती. गाडी अजून प्लॅटफॉर्मवर होती, दहा मिनिटे अवकाश होता. वेस्टोन खिडकीजवळच्या जागेवर बसला. तासाभरातच तो घरी पोचणार होता. घटस्फोटानंतर त्याला हा प्रवास रविवारी करावा लागत होता. वेस्टोन अस्वस्थ होऊ लागला. पाहाता पाहाता गाडीनं वेग घेतला, एकामागून एक उपनगरे मागे पडत चालली. बेलमोर स्टेशनवर गाडी धडकली तेव्हा त्याला हायसे वाटले.

वीसएक मिनिटांच्या रस्त्यावर त्याचं घर होतं. घर त्याचं असं म्हणण्यात अर्थ उरला नव्हता, ते नॉर्माचं, त्याच्या पत्नीचं घर होतं. पायाखालचा रस्ता अगदी परिचित होता. जाताना त्याला अचानक स्तिमित करणारी जाणीव झाली. मनाच्या कप्प्यातून पार पुसलेल्या जगात तो चालला होता. त्याला नवल वाटलं, 'इतकं परिचित है जग, पण आपण येईपर्यंत कुठं होतं हे सारं ? आसपास बघता बघता तो गावात पोचलासुद्धा. त्यानं आपल्या घराकडे नजर टाकली तेव्हा त्याला नॉर्माची गाडी दिसली. पायऱ्यांपाशी जोई बसला होता. वेस्टोनचा मुलगा. वेस्टोननं त्याला हात केला. जोई आपल्याकडे धावत येईल असं त्याला वाटलं. जोई तिथंच बसून बघत राहिला. वेस्टोननं विचारलं, 'जोई, कसं काय आहे ?' जोईनं नुसती मान डोलावली. वेस्टोन त्याच्या शेजारी बसला. भोवतालच्या साऱ्या गोष्टी किती ओळखीच्या होत्या. कॉलनीतल्या घरांच्या ओळी, हिरवळींचे पट्टे आणि अंगणातून उभ्या केलेल्या गाड्या. जोई आपल्या वडिलांकडे निरखून पाहात होता, अजाणतेपणी त्याचा चेहेरा गंभीर झाला होता.

"चल जोई, आपण बेकरीतून ब्रेड, केक्स आणू या," वेस्टोननं सांगितलं. जोईनं परत मान डोलावली.

तो त्यांचा ठरलेला कार्यक्रम होता. नॉर्मानं गाडीत ड्रायव्हरच्या जागेवर किल्ल्या ठेवल्या होत्या. ते निघाले की ती त्यांच्यासाठी कॉफी करणार होती.

गाडीत बसताना जोईनं विचारलं, 'पपा मी गाडी चालवू ?' वेस्टोननं त्याला गाडी चालवू दिली. सुटीचा दिवस होता, रस्ते रिकामे होते. बेकरीतून ब्रेड घेतल्यावर वेस्टोननं वर्तमानपत्रं घेतली. रस्त्यावर ओळखीचे लोक भेटत होतेच. आता वेस्टोन घरी राहात नाही हे कुठं त्याला माहित होतं ? अलिकडे त्याना वेस्टोन एखाद्या रविवारी दिसत होता एवढंच. घरी जाताना परत जोईनं गाडी चालवली. ते घरात गेले तेव्हा स्वयंपाकघरात स्टोव्हवर उकळलेली कॉफी गाळण्याच्या भांड्यात झिरपत होती आणि नॉर्मा आपले केस बसवण्यात गर्क होती. अशा वेळी नॉर्माचा हा उद्योग वेस्टोनला फार त्रासदायक वाटायचा. पण आता दिवस वेगळे होते. वेस्टोन तसाच खुर्चीत बसून राहिला. जोईनं आईला बोलावून आणलं.

नॉर्मा स्वयंपाकघरात आली, जोई तिच्या मागे माग हिंडत होता. नॉर्मा छान दिसत होती. सकाळची वेळ आहे म्हणून ती तरतरीत दिसत असेल, कदाचित ती नेहमीच व्यवस्थित राहात असल्याने सुरेख दिसते...वेस्टोनच्या मनात विचार येऊ लागले. त्याचा गोंधळ उडालेला असतानाच नॉर्मा त्याच्याकडे पाहून सहजगत्या हसली. 'जोई सात वाजल्यापासून तुमची वाट पाहात होता,' ती म्हणाली, बोलताना जोईला हळूवारपणे थोपटत राहिली. तिच्या साध्या वाक्यामुळे वेस्टोन एकदम दुखावला गेला होता. वेस्टोनचा चेहरा तिनं पाहिला मात्र पटकन ती पुढे म्हणाली, 'जोई नेहमीच लवकर उठतो ना—अगदी लहान असल्यापासून.'

नॉर्मा काम करू लागली. तिच्या हालचालीत डौल होता. तिनं कॉफीचे कप भरले, जोईचा ब्रेड कापून त्याला लोणी लावलं. किती मोहक दिसत दिसत होती ती. तरी वेस्टोन संयम राखून होता, सावध होता. हेच आव्हान आणि आकर्षण त्याला आदल्या रात्री कॅरोलच्या स्पर्शातून जाणवलं होतं. अगदी पहिल्या रविवारी तो जोईसाठी घरी आला तेव्हा नॉर्माच्या स्पर्शासाठी त्याचं मन तडफडत राहिलं होतं.

कॉफी घेताना त्यांच्या थोड्या गप्पा झाल्या. नॉर्मानं विचारलं, "माझा एक मित्र मी दुपारी चहाला बोलावला आहे. चालेल ना?" वेस्टोननं मान डोलावली. पण तो थोडा चिडल्यासारखा झाला. आपल्या मुलाला, जोईला भेटायला तो आला होता. त्याच्यानंतर नॉर्मा कुणाला का शोधेना, त्याच्याशी त्याला काय करायचं होतं ?

कॉफी घेतल्यानंतर वेस्टोन आणि जोई चक्कर मारायला बाहेर पडले. वेस्टोनला ओळखीचे लोक दिसत होते. जोईचे नवीन मित्र भेटत होते. जोई रस्त्यातून आपल्या पपांच्या पुढे पळत होता, हातातला लाल चेंडू त्यांच्याकडे टाकत होता. वेस्टोन चेंडू झेलायला चुकला आणि चेंडूमागे पळत गेला की जोईला फार हसू येत होतं—मोठ्या माणसाची फजिती झाल्याचा आनंद जोईला होत होता. वेस्टोन म्हणाला, "जोई, चेंडू नीट टाक ना."

"पण, मी चेंडू बरोबर टाकतोय," जोई म्हणाला, "तुम्ही नीट झेला ना." वेस्टोन आणि जोई दोघांना हसू आलं. रमतगमत ते

# एका असह्य दिवसाची कथा

## मारिओ पुझो

### अनुवाद: मनोहर सोमण

परत घरी आले. तोपर्यंत वेस्टोन खूप दमला होता. नॉर्मानं एका दृष्टिक्षेपात ते ओळखलं. त्याच्याबद्दलची कोणतीही गोष्ट तिच्या नजरेतून सुटत नव्हती. ती म्हणाली, "तुम्ही थोडा वेळ विश्रांती घ्या. स्वयंपाक झाला की मी तुम्हाला उठवीन. जोईला पण मी आता काम सांगणार आहे."

वेस्टोन तिला उडवून लावीत म्हणाला, "एक दिवसाचा तर प्रश्न आहे. मी काही फार दमलेला नाही."

नॉर्मा म्हणाली, "काही झालं तरी आता जोईनं चर्चेला जायला हवं."

वेस्टोननं तत्काळ नॉर्माकडे पाहिलं. तिनं शांतपणे त्याच्या नजरेला नजर दिली. गेल्या दहा वर्षांत ते कधी चर्चला गेले नव्हते. वेस्टोननं जोईवर कोणतंच धार्मिक बंधन घातलं नव्हतं. पण आता गोष्टी बदलल्या होत्या. ज्या गोष्टींना वेस्टोनचा विरोध होता, त्या त्या गोष्टी नॉर्मा अट्टाहासानं करीत चालली होती. वेस्टोननं मुकाट्यानं कपडे बदलले, विश्रांतीसाठी तो शयनघरात पलंगावर आडवा झाला. त्याच खोलीत तो कित्येक वर्षे झोपत आला होता. भिंतींना तोच शीतल निळा रंग होता. पडदे ओढलेले होते, मंद प्रकाश आणि शीतल हवा होती. वेस्टोन पाहता पाहता झोपला.

त्याला जाग आली तेव्हा त्याला जोई हलवीत होता. "पपा, उठा ना." अर्धवट गुंगीत वेस्टोन कुशीवर वळला. त्याचं मन भूतकाळात शिरलं होतं. त्यानं शेजारी नजर टाकली. त्याला क्षणभर आश्चर्य वाटलं. सकाळी इतक्या लवकर नॉर्मा गेली कुठं?" तेवढ्यात जोई ओरडला, "पपा, चला ना. जेवण तयार आहे."

वास्तवाची जाणीव एवढी विलक्षण होती, वेस्टोन धडपडत उठला. जोईनं त्याला जवळजवळ खेचतच स्वयंपाकघराकडे नेले. नॉर्मा त्याच्याकडे पाहून हसली आणि म्हणाली, "झोप चांगली झाली ना? काल रात्री जागला होतात काय?" तिच्या लोभानं वेस्टोन आणखी अस्वस्थ झाला.

जेवण आटोपल्यावर, नॉर्माचा मित्र आला. उंचापुरा, व्यवस्थित आणि दिसण्यात तरतरीत. त्याच्या वागण्यात सहजपणा होता. नॉर्माकडे बघताना, तिच्याशी बोलताना तो गडबडत नव्हता. जोईची त्यानं चौकशी केली. त्याच्याशी तो हसतखेळत दोन शब्द बोलला. तसाच वेस्टोनशी थोडा वेळ बोलत राहिला आणि नंतर निघून गेला.

नॉर्मा वेस्टोनचा अंदाज घेत होती. शेवटी ती बिचकत म्हणाली, "मीच त्याला बोलावलं होतं. तो 'नकोच' म्हणत होता." थांबून ती पुढे म्हणाली, "तुम्हाला तो कसा वाटला?"

"चांगला दिसतोय," वेस्टोन म्हणाला. त्याला नॉर्माच्या मित्राचं नावदेखील समजलं नव्हतं, त्याच्याशी झालेलं बोलणंसुद्धा वाऱ्यावर उडून गेलं होतं. वेस्टोनचं खरं लक्ष नॉर्माकडे होतं. नॉर्माच्या वागण्यात नैसर्गिक लाघव होतं. तिला जे लोक आवडत होते त्यांच्याशी ती खास लोभानं वागायची. तिच्या मित्राशी बोलताना ती त्याच्या निकट राहून बोलायची, त्यांच्या अंगावर झुकून झुकून. पण आता तिच्या या नवीन मित्राशी नॉर्मा तशी वागली नव्हती. वेस्टोनला त्यामुळे समाधान वाटत राहिले.

आणखी बोलावं किंवा न बोलावं अशा विचारात नॉर्मा अवस्थ झाली होती. तिच्या संभ्रमित अवस्थेत वेस्टोनला ती फार आकर्षक दिसायची. तशीच गोंधळून ती म्हणाली, "प्रत्यक्षात तो कसा आहे ते समजलं पाहिजे."

तिच्या या वाक्याबरोबरच दोघांना एकच आठवण झाली, ती दोघं हसू लागली, 'प्रत्यक्षात कोण कसा असतो,' याबद्दल त्यांचे खूप वाद झाले होते. वेस्टोनचे लेखक-मित्र बुद्धिमान, चिकित्सक वृत्तीचे होते. सकृतदर्शनी चांगल्या दिसणाऱ्या वागण्यामागे खरा उद्देश काय असतो याची ते सतत चीरफाड करायचे. नॉर्माला अशा चर्चा नको व्हायच्या, त्यांच्या तार्किकात तिला कसलीच गोडी नव्हती. उलट तिच्या मित्र-मैत्रिणी वेस्टोनला नको वाटायच्या, त्यांच्या बोलण्यात त्याला तोचतोचपणा जाणवायचा. त्याच्या मते ते बावळट होते, सर्वसामान्य होते. एकदा त्यानं विचारलं होतं,

"असले लोक तुला आवडतात कसे?'

नार्मानं उत्तर दिलं होतं, "कोण कसा असतो याचा विचार माझ्या मनात येत नाही."

ते खरंच होतं. तिला वेस्टोनचासुद्धा कधी अंदाज लागला नव्हता. पण वेस्टोनला माणसांची पारख होती याची तिला खात्री होती. म्हणून तिच्या नव्या मित्राबद्दल तिला वेस्टोनचं मत हवं होतं. वेस्टोननं परत तिला सांगितलं, "तुझी थट्टा करीत नाही. तुझा मित्र खरंच चांगल्या स्वभावाचा दिसतो."

तेवढ्यात जोई रडत रडत खोलीत आला. वेस्टोनला एकदम फार काळजी वाटली. त्यानं विचारलं, "काय झालं जोई?" जोईचा गुडघा खरचटला होता. त्यानं स्वतः जोईची जखम बांधली, त्यावेळी त्याला जाणवलं, नॉर्मा त्याच्याकडे काहीशा उपहासानं बघत होती. त्याचा एका दिवसाचा लोभ आणि काळजी जोईला किती पुरी पडणार होती? जोईची समजूत घालताना त्यानं जोईला काहीतरी गंमत देण्याचं कबूल केलं.

दुपार पुढे सरकली होती. वेस्टोन जोईबरोबर बेसबॉल खेळायला हिरवळीवर गेला. नॉर्मा त्यांचा खेळ बघत खुर्चीत बसली. तिचा चेहरा निर्विकार होता. पण घटस्फोटापूर्वीचे दिवस वेगळे होते. त्यावेळी ती भरलेल्या नजरेने बाप-लेकाचा खेळ बघत राहायची. थोड्या वेळानं तिनं जोईला हाका मारल्या, "आता खेळ पुरे कर बाबा. तुझ्या पपांना विश्रांती घेऊ दे. तुझ्या मित्रांबरोबर तू खेळायला जा पाहू."

नॉर्मा सहजगत्या 'तुझे पपा' असा उल्लेख करून गेली. त्यामुळे वेस्टोन खुशीत येऊन हसला आणि नॉर्माजवळच्या दुसऱ्या खुर्चीवर टेकला. सावल्या लांब सरकल्या होत्या, वाऱ्याची मंद झुळूक अंगावरून वाहात होती. ती दोघं आरामात तशीच बसून राहिली. जणू ते अद्यापही पती-पत्नी या नात्यातच गुरफटले होते. दोघांच्यातला दुरावा त्या क्षणापुरता विरून गेला होता. त्या भारलेल्या अवस्थेत वेस्टोननं नॉर्माला विचारलं, "रात्री जेवायला काय करणार आहेस?"

तिनं चकित होऊन त्याच्याकडे पाहिलं. दुपारचं जेवण किती उशिरा झालं होतं. शिवाय त्याला न्यूयॉर्कची सात तीसची लोकल पकडायची होती. त्याचा गोंधळलेला चेहरा पाहून ती सौम्य हसली. काय झालं असेल ते तिच्या लक्षात आलं ती म्हणाली. "बघते, काहीतरी करते."

वेस्टोननं पडलेल्या चेहऱ्यानं खुलासा केला, "नको, नको. मला निघायचं आहे. हे मी विसरूनच गेलो होतो." पुढं त्यानं विचारलं. "तू काय ठरवलं आहेस? त्या तुझ्या मित्राशी लग्न करणार आहेस?"

"काही सांगता येत नाही," ती उत्तरली.

"माझ्याकडून मिळणारे पोटगीचे पैसे बंद होतील अशी तुला भीती वाटते का? मी वकिलांशी बोलतो. असे ना तसे, जोईसाठी म्हणून, पण ते पैसे तुला मिळतील याची मी व्यवस्था करीन."

"कशाला इतकं चांगलं वागता माझ्याशी?" ती वैतागून बोलली. पण वेस्टोनच्या चांगलं लक्षात आलं. याच कारणासाठी तिचा पक्का निश्चय होत नव्हता. नवीन संबंधाचा विचार त्या पैशांच्या संदर्भात करायला तिला लाज वाटत होती.

"तुझ्यासाठी मी तेवढं नक्की करीन," त्यानं सांगून टाकलं, "सध्या मला बऱ्यापैकी पैसे मिळतात."

"एवढ्यात कसं सांगणार?" नॉर्मा बोलली, "मला तो इतका पसंत आहे असं म्हणणं कठीण आहे."

तिचा स्वर खालचा होता. वेस्टोनच्या पैशावर ती अवलंबून होती हे उघड होतं. ती त्याच्याशी ताठपणे वागू शकत नव्हती. वेस्टोननं विषय वाढवला नाही. मुलाला भेटण्यासाठी त्याला जो दिवस हक्कानं मिळाला होता तो संपत आला होता. वेस्टोन जायला निघाला. पण जोई कुठे होता? आपल्या वडिलांना निरोप द्यायच्या अवघड वेळी जोईच्या मनात काय चालत असेल कोण जाणे. जोई कुठेतरी पळून गेला होता. मागच्या वेळी तो असाच पसार झाला होता. वेस्टोन काळजीत पडला. त्यानं नॉर्माला सुचवलं, "तू मला पोचवायला आली नाहीस तरी चालेल. जोईला एकटा सोडू नकोस." नॉर्मा फट्कन बोलली, "कमाल करता तुम्ही. जोई इथेच असेल कुठेतरी. आणि मी काय, दहा मिनिटात परत घरी येईनच की."

ते स्टेशनवर जाण्यासाठी बाहेर आले. वेस्टोन अस्वस्थच होता. त्या भरातच त्यानं विचारलं, "मी निघायच्या वेळी जोई कुठे लपून बसतो? तू त्याला सांगत का नाहीस?"

"जसं काय तुम्हाला माहीतीच काही. किती अस्वस्थ असतो तो! मी तुम्हाला सांगणारच होते, तुम्ही अजिबात आला नाहीत तर बरं होईल", नॉर्मानं अवचित घाव घातला.

वेस्टोनला राहावेना. कसाबसा तो पुढे बोलला, "अग, माझा सगळा दिवस अशानं वाया जात नाही का? तू त्याला सांगायला हवंस."

"कसं सांगायचं त्याला हे? लहान मुलांना समजावून सांगायच्या का गोष्टी आहेत या? आपण एकमेकापासून दूर व्हायचं ठरवलं तेव्हा तुम्ही जोईचा विचार का केला नाहीत? आता चिडण्यात काही अर्थ नाही", नॉर्मा निर्दयपणे त्याला तोडून टाकीत होती.

वेस्टोननं तिच्याकडे पाहिलं. त्याच्या डोळ्यात राग मावत नव्हता. नॉर्मा तितक्याच थंडपणे त्याच्याकडे पाहात राहिली.

"आमच्या संसारात मी किती सुखात होते," नॉर्मा बोलत राहिली, "पण तुम्हाला माझ्यापासून सुख लागत नव्हतं. अगदी पहिल्यापासून मी पाहाते आहे."

त्यांच्या दहा वर्षांच्या वैवाहिक आयुष्यात कितीतरी वादाचे प्रसंग घडले होते, दोघांच्या चुका झाल्या होत्या पण त्या गोष्टी उगाळण्यात अर्थ नव्हता. वेस्टोनला ते जाणवलं. तो एवढंच म्हणाला, "तसं नाहीये. तुझी चुकीची समजूत झाली आहे."

"तुम्ही माझं संसाराचं स्वप्न उध्वस्त केलंत," नॉर्मा आवेगानं बोलत होती, "संसारातली साधी हौस-मौज तुम्हाला निरर्थक वाटत होती. नित्याची चाकोरी तुम्हाला नको होती पण मला त्यात आनंद होता, त्या चाकोरीतच जगायचं होतं. तुम्ही स्वतःला चांगलं म्हणवता ना? तुमच्या पुस्तकात कुठे मांडलंयं हो तुमचं तत्त्वज्ञान?"

वेस्टोननं खांदे उडवले. काय सांगायचं हिला? तिच्या गैरसमजुती दूर करण्यापलिकडच्या होत्या. तो नुसतं म्हणाला, "चला, उशीर होतोयं."

नॉर्मानं गाडी बेलमोर स्टेशनकडे काढली. ती सफाईनं गाडी चालवीत होती. वेस्टोनच्या मनात आलं, "आपण हिला गाडी चालवायला शिकवली. प्रेमाची भाषा आपणच तिला शिकवली—तिच्या लाघवानं तिनं आपल्याला भारून टाकलं. आपल्यात मतभेद झाले—त्याचं पर्यवसान इथपर्यंत झालं." त्याचं मन कटुतेनं आणि उद्वेगानं भरून गेलं.

ते स्टेशनवर पोहोचले तेव्हा तो तिला कोरडेपणानं म्हणाला, "बरं झालं, तू मला इथपर्यंत सोडलंस."

त्यावर ती काहीच बोलली नाही. एकाएकी तिनं त्याला विचारलं, "यापुढे परत जोईला भेटायला येणार आहात का?"

तिचा प्रश्न इतका निर्दय होता, वेस्टोनच्या मनात कोंडलेला राग एकदम बाहेर पडला. तो विलक्षण त्वेषानं बोलू लागला, "माझ्या मुलाला भेटण्याचा हक्क मला कोर्टानं दिला आहे—तोही महिन्यातल्या एका रविवारी. तुला मी काय दिलं नाही, सांग. गाडी, घर, बँकेतली शिल्लक आणि आपला मुलगा—सगळं मी तुला घेऊ दिलं. माझ्या आयुष्यातली दहा वर्षे घालवून मी मात्र रिकाम्या हातानं घराबाहेर पडलो. तुला पोटगीचे पैसे मिळतातच. आता तू मला 'येऊ नको' असं सांगतेस? कोण समजतेस तू स्वतःला? जोई माझा मुलगा आहे—मी त्याला भेटायला येणारच."

"जोईची तुम्ही काय काळजी करता ते माहिती आहे," नॉर्मा तिटकाऱ्यानं बोलली, "तुम्हाला हवं होतं तसंच सगळं झालेलं


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासुन मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

आहे." वेस्टोनच्या रागाचा पारा खूप उतरला होता. "आपण परत एकत्र यावं अशी का तुझी इच्छा आहे?" त्यानं विचारलं. त्यानं आपली व्यथा सौम्य शब्दात सांगितली, "मला जोईची फार आठवण येते."

"कशाला सांगता हे सारं?" ती भडकून उद्गारली, "आजवर प्रत्येक गोष्ट तुमच्या मनासारखी घडली. तुमच्याकडे हवा तसा पैसा आहे, प्रतिष्ठा आहे, मित्र आहेत. माझा काहीच त्रास नाही, हे असलं निरस आयुष्य नाही. आता तुम्हाला तुमचा मुलगा हवा आहे, नाही का? तुमचं तुम्ही निस्तरा सारं."

त्यावर त्या दोघात एक चमत्कारिक शांतता पसरली. किती राग आला तरी एकमेकांवरचा लोभ त्यांना जाणवत राहिला.

नॉर्मानं त्याला थोडं डिवचून पाहिलं, "तुम्हाला भेटली असेल एखादी–तुमचं मन रमवायला."

उत्तर देण्यात अर्थ नव्हता. तिच्या पोरकटपणाकडे वेस्टोननं दुर्लक्ष केलं. तो म्हणाला, "अच्छा, आता आपली भेट पुढच्या महिन्यात अशाच रविवारी."

त्यानं मधेच तोडून टाकल्याचं तिच्या जिव्हारी लागलं. न बोलता तिनं गाडी सुरू केली. तिची गाडी गावाकडे जाईपर्यंत वेस्टोन थांबला. गावात दिवेलागणी झाली होती. क्षणार्धात त्याच्या डोळ्यासमोर घराचं चित्र उभं राहिलं, त्याच्या पायातलं त्राण निघून गेलं. लोकल यायला अवकाश होता. नॉर्मा घरी पोहोचली असेल अशा अंदाजानं त्यानं तिला फोन केला. ती घरी जेमतेम पोहोचली होती, धावतपळत तिनं फोन घेतला.

"जोई कसा आहे?" त्यानं विचारलं.

वेस्टोनचा फोन येईल अशी तिची अपेक्षा नव्हती. तिला दुसऱ्या कुणाचा तरी फोन येणार होता असं तिच्या थबकण्यावरून त्याला वाटलं. तिनं उत्तर दिलं, "जोई ठीक आहे. माझी वाट पाहात तो बाहेर उभा होता. तुम्हाला त्याच्याशी बोलायचं आहे का?"

"बोलाव त्याला." वेस्टोननं सांगितलं.

जोईला फोनवर बोलायला ती सांगत होती, समजावीत होती. तिनं रागावून पाहिलं. पण जोई ऐकत नव्हता. वेस्टोनला पलीकडे सारं ऐकू येत होतं. शेवटी तिनं सांगितलं, "काय करू मी? जोई ऐकत नाही."

वेस्टोनचा आवाज कापरा झाला, "तू सांग ना त्याला. कसंही करून बोलायला सांग. इतकं महत्त्वाचं सांगायचंय मला..."

नॉर्मा फटकन मधे बोलली, "काहीतरी मी त्याला सांगणार नाही. परत आपण एकत्र राहू अशी खोटी आशा दाखवण्यात काय अर्थ?"

"आपण तसा फेरविचार करायला काय हरकत आहे?" वेस्टोन म्हणाला, "खरंच, काय हरकत आहे?"

नॉर्माचा आवाज अतिशय मृदु झाला, "तुम्हाला कळत का नाही? तसं आता जमणार नाही.मी तुम्हाला 'येऊ नका' सांगितलं पण तुम्ही ते मनावर घेऊ नका." थांबून ती पुढे म्हणाली, "हळूहळू तुम्हाला हा ताण जाणवणार नाही." आपल्यावाचून वेस्टोनचं चालत नाही याचं समाधान तिच्या शब्दातून व्यक्त होत होतं. तिचे शब्द हळुवार होते पण ते समाधान लपत नव्हतं.

वेस्टोननं काहीच उत्तर दिलं नाही. टेलिफोन बूथच्या काचेत त्याचं प्रतिबिंब पडलं होतं. त्याचा चेहरा पार उतरला होता, मानसिक ताणान काळवंडला होता. त्याला आपल्या प्रतिबिंबाकडे बघवेना. त्याच्या आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती आणि ती नित्याचा भाग बनली होती. वेस्टोननं तिला वैतागून सांगितलं, "जा, तू आणि जोई खड्ड्यात जा. मला कोणाची पर्वा नाही..." नॉर्मानं फोन खाली ठेवला होता.

वेस्टोन भावनातिरेकानं थरथरत राहिला. थोड्या वेळानं त्यानं आपल्या फ्लॅटवर फोन केला. खूप वेळ फोन वाजत राहिला. त्याला वाटलं, कॅरोल गेलीसुद्धा असेल. तेवढ्यात कॅरोलनं फोन घेतला. त्यानं सांगितलं, "साधारण नऊपर्यंत मी येतो. तू थांबशील ना?"

"हो, मी इथे आहेच," कॅरोलचा आवाज आला.

"त्यापेक्षा तू असं कर ना, स्टेशनवरच ये आणि मग आपण बाहेरच जेवण घेऊ या," वेस्टोननं सुचवलं. त्याचा घसा दाटून आला होता, शब्द घुसमटून बाहेर येत होते. कॅरोलला ते जाणवलं. ती म्हणाली, "चालेल, तसं करू या. पण तुम्हाला झालंय काय? तुमचा वेळ कसा गेला?"

"मी ठीक आहे," वेस्टोननं सांगितलं आणि फोन खाली ठेवला. टेलिफोन-बूथच्या बाहेर अंधार पसरला होता. प्लॅटफॉर्मवर फक्त दोन माणसं गाडीची वाट पाहात होती, काहीतरी वाचीच होती. वेस्टोन त्यांच्यापासून दूरच्या एका बाकावर जाऊन बसला आणि त्यानं आपल्या अश्रूंना वाट करून दिली. □ □


शनवारवाड्यातील शमादान

ब. मो. पुरंदरे

किंमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

समुद्रात
वसत
असलेली

# आणखी एक नवी मुंबई

## उत्तरार्ध

सु. ल. सोमण

गेल्या वर्षभरापासून 'बॅक बे' योजनेला होणारा विरोध संघटित करून तो तीव्रतर बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे. गेल्या वर्षी काँग्रेसला बाजूला सारून शिवसेनेचे सुधीर जोशी महापौर झाले. महापौरपद ग्रहण केल्यापासून त्यांनी 'बॅक बे' प्रश्न हाती घेतला होता तो तहत परवा त्यांची मुदत संपेपर्यंत. वर्षभरात त्यांनी अनेक समित्या नेमल्या, अनेक ठराव केले, मुख्यमंत्र्यांकडे शिष्टमंडळ नेले. एवढे सारे करूनही, 'बॅक बे' योजना राबवण्याचा शासनाचा हट्टच दिसला तेव्हा, 'बॅक बेमधील नव्या बांधकामांना परवानगी देऊ नका', 'तिथल्या नव्या व्यापारी वसाहतींना पाणी, वीज वगैरे सारख्या सोयी पुरवू नका' असे आदेशही त्यांनी महापालिकेच्या संबंधीत खात्यांना दिले. श्री. सुधीर जोशीबरोबरच, शिवसेनेच्या आमदार द्वयाने (आ. प्रमोद नवलकर आणि आ. मनोहर जोशी) विद्याभवनात शासनाला ह्या प्रकरणात झोडपून काढले. खुद्द मुंबई प्रदेश काँग्रेसने अध्यक्ष रजनी पटेल ह्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकारविरोधी 'बॅक बे' संबंधात एक जबरदस्त आघाडी उघडली आहे. त्यांच्या १९७१ व १९७२ च्या निवडणूक जाहिरनाम्यात बॅक बे योजनेला स्पष्ट विरोध आहे, आणि ही योजना रद्दबातल करून घेण्याचं आश्वासन आहे! गेल्या खेपेला पंतप्रधान मुंबईला यायच्या होत्या तेव्हा मुंबई काँग्रेसने त्यांचं लक्ष या प्रश्नाकडे वेधले होते व हा प्रकल्प रद्द व्हावा म्हणून श्रीमती गांधींनी मध्यस्थी करावी अशी विनंती देखील केली होती! जनसंघाची ह्या प्रश्नावरची भूमिकाही अत्यंत विरोधी आहे. त्यांचे आ. पंडीत सातत्याने विधान परिषदेत ह्या विरुद्ध आवाज उठवीत आले आहेत. श्रीमंतांचे, व्यापाऱ्यांचे मित्र म्हणवणाऱ्या स्वतंत्र पक्षानेही ह्याबाबत सरकारवर कडाडून टीका केली आहे.

साधारणपणे उजवे पक्ष म्हणून गणले जाणाऱ्या पक्षांच्या टीकेवर झोड उडवताना मुख्यमंत्री नाईक म्हणतात, '... ह्यातली काही मंडळी ह्या विभागातच राहतात. आपल्या स्वतःच्या सुविधा आपल्या घरासमोर येणाऱ्या इमारतीमुळे हिरावल्या जाऊ नयेत, म्हणूनच यांचा हा आपमतलबी विरोध आहे...' ब्रीच कँडी बचाव समिती (इथे रिक्लेम्ड भागात ह्या समितीने क्रिकेटचा एक सामना भरवून त्या मैदानाचं 'जनता पार्क'मध्ये रूपांतर केले आहे!), सेव्ह बॉम्बे कमिटी वगैरे 'बॅक बे' विरोधी संघटनांमध्ये प्रामुख्याने याच मंडळींचा समावेश आहे. (ब्लिट्झचे श्री. करंजिया वगळता!)...

डाव्या पक्षांची भूमिका या प्रश्नावर स्पष्ट आहे. बॅक बे, जुळी मुंबई, मुंबईतल्या भुयारी रेल्वे रस्त्यांच्या योजना, फ्लाय ओव्हर्स, बॅक बे विभागातल्या गगनचुंबी इमारती ह्या साऱ्यासच त्यांचा विरोध आहे. ह्या साऱ्यासाठी सरकारजवळ पैसा उपलब्ध आहे, पण ग्रामीण भागात साध्या वीज-पाण्याच्या योजना राबवायसाठी मात्र सरकारजवळ पैसा नाही ह्याची ह्या मंडळींना चीड येते. बॅक बे काय किंवा जुळी मुंबई काय, दोन्ही ठिकाणी जमिनी विकण्यात जी नफेबाजी वृत्ती सरकार दाखवते, दोन्ही ठिकाणी जमिनी वाटण्यात गरीब जनतेवर जो अन्याय होतो (केवळ त्यांचेचवळ पैसा नाही म्हणून!) त्याला ह्या मंडळींचा विरोध आहे. आ. धुळप, घोंगडे, मृणाल गोरे, दि. बा. पाटील वगैरे मंडळी विधान भवनात शासनाला ह्या प्रश्नावर धारेवर धरीत असतात.

राजकीय दृष्ट्या बॅक बेला एवढा प्रचंड विरोध आहे. बहुतेक सर्व तज्ञांच्या समित्यांनी (ह्या सर्व समित्या ह्या ना त्या प्रकारे सरकारनेच नेमलेल्या समित्या होत्या व राजकीय स्वार्थाशी त्यांचा काही संबंध नव्हता!) 'बॅक बे' विरोधातच आपले अभिप्राय व्यक्त केले आहेत. त्यांचे अभिप्राय विस्ताराने मुद्दामच सोबत दिले आहेत. पण एवढं असूनही जे जनमत या प्रश्नावर तयार व्हायला पाहिजे तसं ते झालेलं मला जाणवलंच नाही. आणखीही स्पष्टपणे लिहायचं तर वरच्या श्रेणीतला मोजका पांढरपेशा वर्ग, राजकारणी (तीही प्रामुख्याने मुंबईची व विरोधी पक्षांचीच!) वृत्तपत्रीय जगत ह्यांच्यापुरतीच ह्या प्रश्नाची व्याप्ती तूर्त तरी आहे. मागच्या लेखांकात बोरीबंदर व चर्चगेट इथून बाहेर पडणाऱ्या काही मंडळींच्या प्रतिक्रिया मी मांडलेल्या आहेत. सर्वसामान्य लोकात ह्या एकूणच प्रश्नासंबंधी जी उदासीनता आहे, त्याच ह्या प्रतिक्रियांचं कारण आहे. राजकीय पक्षांनीही विविध तज्ज्ञांची मतं, बॅक बेचे संभाव्य परिणाम वगैरे गोष्टी सर्वसामान्य मुंबईकर जनतेपर्यंत नेऊनच पोचवलेल्या नाहीत. जनतेचं त्या अर्थाने शिक्षणच फारसं झालेलं नाही. श्रीमती मृणाल गोरे ह्यांनी हा मुद्दा मान्य केला, तर कॉ. कोल्हटकर, कॉ. रोझा देशपांडे, आ. श्री. पंडीत वगैरेंचा साधारण सूर असा आढळला की, 'आजच्या धकाधकीच्या जीवनात सर्वसामान्य जनतेचे एवढे प्रश्न उभे आहेत, आणि ते इतके जीवन-मरणाचे आहेत, की हळूहळू पण दूरगामी परिणाम करणाऱ्या बॅक बे योजनेच्या विरोधात संघटित आंदोलन उभे करणेच जमलेले नाही...' श्रीमती रोझा देशपांडे म्हणाल्या, '...आमचा कामगार, श्रमजिवी विखुरलेला आहे. गिरणगावात, उपनगरातून पसरलेल्या झोपडयातनं. काळाघोडयापाशी अडवल्या जाणाऱ्या मोर्चात सहभागी होण्यापुरताच त्याचा फोर्ट विभागाशी संबंध येतो. एरवी उपाशी पोटी तो राबत असतो. फाटके कपडे घालून. पडक्या चाळीत दिवस कंठीत. समाजवादाचे नारे लावणाऱ्या, गरीबी हटावच्या घोषणा देणाऱ्या या सरकारला, इथल्या कॉंग्रेसला ही गरीबी जणू दिसतच नाही. तिच्यावर खर्च करण्यापेक्षा बॅक बे, जुळी मुंबई इथे कोटयवधी रुपये बडयांची धन करण्यासाठी खर्च करणंच ह्या सरकारला निकडीचं वाटतं. साहाजिकच आहे; कारण ह्यांचे अध्यक्ष वावरतात बॅक बेवरील अनेक मजली इमारतीत. सचिवालय आहे 'सॉफिस्टिकेटेड पॉश एरियात'. मंत्र्यांची निवासस्थानं आहेत मलबारहिलवरील राजवाडयातून! सामान्य जनतेत राहिलं तर सामान्य जनतेचे प्रश्न उमगतात. राजप्रासादातून समाजवादाच्या घोषणा केल्या तर त्याचं स्वरूप तसलंच राहाणार. टाटा बिर्लांचेच प्रश्न तिथे राहून उमगणार!... तेव्हा झगडा करायचा आहे तो असा सर्वच पातळीवर. खपाटी पोटं गेली असतांना त्या परिस्थितीच्या कारणावरच प्रथम हल्ले झाले पाहिजेत. बॅक बे त्यामुळे थोडा बाजूला पडतो...'

'बॅक बे'ला चारी बाजूंनी विरोध असूनही व 'बॅक बे'चं फारसं तर्कशुद्ध समर्थन शासनाकडून होत नसतानाही, बॅक बे विरोधात आंदोलन विशेष मूळ धरू शकत नाही त्याचंही मला वाटतं हेच कारण असावं. बॅक-बेचे आजच्या आज सोसावे लागणारे दुष्परिणाम तसे कुठलेही नाहीत. तिथे उभ्या राहणाऱ्या गगनचुंबी इमारती उलटपक्षी जनतेचे आकर्षण स्थान बनू पाहात आहेत. तिथे उघडल्या जाणाऱ्या ऑफिसेसमधून आपलाही नंबर कदाचित लागेल अशीही आशा अनेकांच्या मनात डोकावते. साहाजिकच तावडतोब दुष्परिणाम होण्याऐवजी, त्याचे फायदेच लोकांच्या मनासमोर उभे राहातात. व त्यामुळे, काही वर्षांनंतरच्या संभाव्य दुष्परिणामांचे कितीही वर्णन लोकांसमोर केले तरी त्याचा योग्य तो परिणाम प्रत्यक्ष अनुभवावे लागणे व त्यांची कल्पना करणे ह्यात महदंतर आहे. उघडच 'बॅक बे'ला परिणामकारक विरोध उभाच राहू शकत नाही. जुळ्या मुंबईत, तिथल्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार ह्या भावनेतून शे. का. पक्ष जुळ्या मुंबई विरुद्ध संघटीत आवाज उठवू शकला. जुळ्या मुंबईचा तिथल्या शेतकरी मंडळींवर होणारा तो तात्कालीक परिणाम होता. मुंबईत समुद्र मागे हटवून जमीन पुनः प्राप्त केली जाणार असल्याने तो प्रश्नच इथे उभा राहात नाही. रिक्लेमेशनसाठी समुद्रात ओतायचा पैसाही, जनतेच्या खिशातून उघडपणे काढून घेतला जात नसल्याने तेही ओझं जाणवण्यासारखं नाही. आता तर काय, खाजगी पार्ट्यांच असा पैसा खर्चायला पुढे येत आहेत! रेल्वे, बस प्रवासावर पडणारा ताण, त्यासाठी करावा लागणारा खर्च ह्या सर्व गोष्टी आज नव्हे १०–१५ वर्षांनी लोकांना अनुभवाव्या लागतील. त्याविरुद्ध म्हणूनच फारशी खळखळ आज आढळत नाही. आजचे आज, पुढचे पुढे हा मानवी स्वभावच त्याला काही अंशी कारणीभूत आहे.

मध्यंतरी इथल्या किनारपट्टीवरील कोळी लोकांचा प्रश्न उपस्थित केला गेला होता. बॅक बे मुळे त्यांच्यावर तावडतोब परिणाम व्हायची शक्यता आहे. परंतु इथल्या मच्छिमारी व्यवसायाचे स्वरूप तसे फारच किरकोळ आहे. इथल्या कोळयांचे, त्याचे व्यवसायात इतरत्र पुनर्वसन म्हणूनच फारसे जड नाही. ह्यामुळेच इथल्या कोळी-समाजाचा विरोध म्हणावा तसा संघटीत करण्याचे विरोधकांना जमले नाही! बॅक बे मधल्या भरावामुळे मार्वे-जुहू वगैरे ठिकाणी समुद्र विस्तारेल, किनाऱ्यावरच्या वस्तीला धोका उत्पन्न होईल अशीही भीती अनेकदा व्यक्तविली जाते. मार्वेला असा प्रकार झालाही आहे. परंतु किनाऱ्यावरील जमिनीची धूप बॅक बे मुळेच होते ह्या म्हणण्याला फारसा आधार नाही. बॅक बे चा असा परिणाम व्हायचाच, तर तो सर्वत्र दिसायला पाहिजे, फक्त मार्वे-जुहू किनाऱ्यावरच नाही. भौगोलिक सिद्धान्तानुसार एका ठिकाणची वाट बंद झाल्यावर पाणी अन्यत्र वाहणार हे खरे असले तरी, ते सर्वत्र पसरेल व त्याचा परिणाम तितकासा जाणवणार नाही. शिवाय हा न्याय जर बॅक बे ला लावला गेला तर तो बांद्रा-कुर्ला, वडाळा-चेंबूर इथल्या रिक्लेमेशनलाही का न लावला जावा? मग तिथल्याच योजनांची भलावण का? असेही प्रश्न उद्भवतात. ह्या विभागातल्या इमारतींमुळे वारं अडविलं जाऊन मुंबई कोंदट होईल हाही आरोप असाच वृथा आहे!

ह्या दोन बाबींखेरीज बॅक बे चे दुसरे दुष्परिणाम तावडतोब जाणवणारे नाहीतच. मागच्या लेखांकात मी एकूण बॅक बे योजना काय आहे ते चर्चिलं होतं. त्यामुळे होणाऱ्या खर्चांची, फायद्यांची, परिणामांची चर्चा केली होती. ह्या अंकात विविध समित्यांच्या शिफारशींचा गोषवारा मी दिलेला आहे. ह्या दोन्हीतून, बॅक बे चे

जे तोटे वर्णिलेले आहेत, ते बहुतांश सर्व, भविष्यकालीन आहेत म्हणूनच, आजच्या घटकेला त्याचे समर्थन करताना सरकार, त्यातून मिळणाऱ्या फायद्याचे, तिथे उपलब्ध होणाऱ्या नोकऱ्यांचेच प्रामुख्याने मांडवल करते. मुख्यमंत्री नाईक ह्यांचे विधानसभेतले भाषण त्या दृष्टीने अतिशय बोलके आहे. त्याचाही गोषवारा ह्याच अंकात अन्यत्र दिला आहे. श्री. ह. गो. वर्तकांनी, दिलेलं उत्तरही बोलकं आहे. श्री. नाडगौडा हे रिक्लेमेशनचे इंजिनियर. त्यांचे विचार सरकारी समर्थनाच्या दृष्टीने अभ्यासनीय आहेत. ते म्हणतात,...मुंबईला लोक येतात, त्यामुळे मुंबई वाढते म्हणून मुंबईला येणाऱ्या गाड्याच रद्द करणे, किंवा चांगल्या पाणीपुरवठ्यामुळे मुंबईकडे लोक आकर्षित होतात म्हणून पाणीपुरवठ्याच्या योजनाच रद्द करणे, ह्यासारखाच विक्षिप्त उपाय आहे 'बॅक बे' रद्द करण्याचा! आजच्या फोर्टमधील कंजेशन कमी करण्यासाठी उपाय योजणे आवश्यक आहे. बाजूला पर्यायी जागा उपलब्ध नाही करून दिली तर, फोर्टमधले कंजेशन वाढेल. नवीन ऑफीसे तिथेच गर्दी करतील. बॅक बे मुळे फोर्टला थोडासा दिलासा मिळेल. परंतु रेल्वेचा खर्च वाढेल, प्रवाशांची गर्दी वाढेल म्हणून ही योजनाच रद्द करणे चुकीचे ठरेल. बॅक बे विभाग संपूर्ण विकसित व्हायला व त्याचे परिणाम जाणवू लागायला १०–१५ वर्षे लागतील. तोपर्यंतच्या काळात ट्रान्स्पोर्टचे प्रश्न विधायक विचार करून सोडवता येतील. हीच गत वीज, पाणी, ड्रेनेज वगैरे प्रश्नांची. पण केवळ हे प्रश्न उद्या उभे राहातील म्हणून आज योजनाच रद्द करणे, मुंबईच्या हितावर धोंडा पाडून घेण्यासारखे होईल...'

एकंदर प्रश्नाविषयी विशेष लोकशिक्षण झाले नसल्यामुळे व प्रश्नाची तशी निकड नसल्याने, ना. नाईकांनी भाषणात केलेल्या किंवा श्री. नाडगौडांसारख्यांनी केलेल्या समर्थनांविषयी फारशी चीड कुठे दिसून येतच नाही. 'ह्या नव्या मुंबईत राहाणार ते बडेच, सर्वसामान्य जनता फक्त इथे लाखांनी रोज पाट्या टाकायलाच येणार; आणि राहाणार मात्र दूरवरच.' असाही एक आरोप केला जातो. सामान्य लोकांशी तुम्ही बोललात तर मात्र त्यांचा सूर असा आढळेल की, 'कुणा लेकाला ह्या फोर्टात येऊन राह्यला आवडेल?' पहिल्यापासून ह्या लोकांची एक कल्पनाच करून दिलेली आहे, की, फोर्ट भागात त्यांनी जायचे ते केवळ नोकऱ्या करायलाच. तिथे राहाण्याचा जणू त्यांना हक्कच नाही. त्यांनी राह्यचे दूर डोंबिवली वगैरेलाच. फोर्टात राह्यचं ते पैसेवाल्यांनीच! ब्रिटीश राजवटीत ही कल्पना रुजवली गेली. दुर्दैवाने, 'समाजवादी' काँग्रेस (?)च्या राजवटीत ती उत्तम प्रकारे जोपासली गेली. साहाजिकच 'बॅक बे'-तल्या 'रेसिडेंशियल प्लॉट्स'मध्ये त्याला उत्साहच नाही.

ह्या सर्व एकंदर प्रकरणातून अशा प्रकारे जे प्रश्न उभे राहातात ते प्रामुख्याने, सामान्य जनतेच्या दृष्टीने रद्दबातलच आहेत. आर्थिक तोटा, प्रशासन, वहातूक, पाणी पुरवठा आदी गोष्टींवरील प्रचंड खर्च वगैरे प्रश्न शासनाचे, महापालिकेचे आहेत. शासन स्वतःच्या प्रश्नांवर सध्या तरी गप्पच बसणार. कारण त्यांना ही योजना राबवायचेय. काही अंशी शासनाने तो प्रश्न प्रतिष्ठेचाच बनवलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे तर बॅक बे विभागातले सर्व पाणी (किंवा पाण्यावर कल्पिलेले प्लॉट्स म्हणू यात फार तर!) एव्हाना विकलेही गेले आहे! महापालिकेचा विरोध हा त्या त्या वेळच्या महापौरांवर अनेकदा अवलंबून राहील असे वाटते. श्री. सुधीर जोशी ह्यांचे पूर्वी ह्या प्रश्नावर महापालिकेने एवढ्या कडाडून कधी विरोध केल्याचे आठवत नाही. श्री. बोमन बेहराम श्री. सुधीर जोशांइतकाच कडवड विरोधी सूर धरतात किंवा कसे, ते लौकरच समजून येईल!

तेव्हा मुख्य विरोध व्हायचा असेल तर तो जनतेकडूनच व विरोधी पक्षांकडूनच! पण भ्रष्टाचार, भेसळ, महागाई, टंचाई, अशांतता आदी प्रश्नांपुढे 'बॅक बे'चा प्रश्न विरोधकांना निकडीचा कितपत वाटेल कोण जाणे! परंतु मुंबई व मुंबईकरांच्या भविष्य-काळावर नजर ठेवून, आजच विरोधी पक्षांनी ह्याही प्रश्नावर रान उठवायला हवे असे मला वाटते. असे रान उठवायला हवे ह्याची प्रमुख कारणे माझ्या मते पुढीलप्रमाणे आहेत.

१. समुद्रातल्या नव्या मुंबईमुळे शासनाचा आज प्रचंड खर्च होत असून त्याचा भार अप्रत्यक्षरित्या जनतेच्या खिशावरच पडत आहे. विशेषतः अन्य महत्त्वाच्या ग्रामीण वा उपनगरीय विकास-योजना पैशाअभावी वा अन्य कारणांमुळे रेंगाळत असता 'बॅक बे' योजना राबवली जावी हे अन्याय्य आहे. उदा. सोलापूरची भीमा योजना, कोकणातल्या अनेक योजना, अनेक ठिकाणच्या पाणी, वीज योजना वगैरे.

२. बॅक बे तल्या अफाट भावांमुळे तिथे फक्त बड्यांची घरं उभी राहू शकतील. मोठाल्या कंपन्यांची ऑफिसे उभी राहातील. त्यामुळे सामान्य मुंबईकर ह्या मुंबईपासून दूरच फेकला जाईल. इथल्या अफाट किमतींचा साहाजिकच परिणाम म्हणून महागाई, काळाबाजार, भ्रष्टाचार आणखीनच वाढेल.

३. संपूर्ण बॅक बे मध्ये सामान्य माणूस, सामान्य जनता तिचे प्रश्न ह्यांना काहीही वाव नाही. समाजवादाच्या कल्पनेत हे बसत नाही. हे निदान स्वतःला 'समाजवादी' म्हणवणाऱ्या सरकारने तरी लक्षात घ्यायला हवे.

४. सरकारी कर्मचारी व अन्य लोकांसाठी (गृहनिर्माण मंडळाद्वारे) काही जागा राखून ठेवण्यात येतील असे सांगितले जाते. परंतु काही खाजगी चर्चेत मला असे सांगितले गेले की अशा कारणासाठी आता जागाच शिल्लक नाहीत!

५. प्रवासाचा ताण, फोर्ट व ह्या नव्या मुंबईत कामासाठी धड-पडत येणाऱ्यावर एवढा पडणार आहे की त्यामुळे सर्वसामान्य मुंबईकर (तो बहुधा मराठीच असतो हे ओघानेच आले!) अक्षरशः मोडून निघेल.

ह्या मुद्द्यांवर भर देऊन, लोकशिक्षण करून आजच आंदोलन उभे केले तर ठीक आहे, नाही तर कालांतराने परिस्थिती ह्या नव्या मुंबईपायी एवढी स्फोटक बनेल की त्यात सारेच उध्वस्त व्हायची शक्यता आहे!

## बॅक बे आणि डझनभर समित्या

### १९५८ : बर्वे समिती

'... मुंबई शहराची आजची जी अवस्था आहे, मुंबई बेटावरील छोट्याशा जागेत लोकसंख्या आणि उद्योगधंदे ह्यांची जी प्रमाणा-बाहेर गर्दी झाली आहे ती पाहाता, मुंबईवरील हा ताण कमी कर-

ण्याच्या दृष्टीने पर्यायी जागा शोधणे आवश्यक झाले आहे. मुंबई बेटाला लागूनच असलेली जागा ह्या दृष्टीने रिक्लेमेशन योजना राबवून, मुंबईची जागेची भूक भागविण्याच्या दिशेने पावले टाकायला हवीत... बॅक बे, कुर्ला-बांद्रा व वडाळा-चेंबूर ह्या तिन्ही रिक्लेमेशन्स योजना त्या त्या दृष्टीने त्वरित हातात घ्यायला हव्यात. ...विशेषत: बांद्रा कुर्ला व चेंबूर-वडाळा ह्या योजना त्वरित राबवायला हव्या आहेत. 'बॅक बे' पेक्षा रिक्लेमेशन खर्च तिथे कमी आहे. जागा मोठी आहे. भरावासाठी एकूण शहरी वस्तीला फारसा बाध न येता काम करणे शक्य आहे. 'बॅक बे'च्या भरावासाठी मात्र गजबजलेल्या शहरी वस्त्यातून कचरा व इतर साहित्य न्यावे लागेल... ह्या दोन रिक्लेमेशन्समुळे फोर्टविभागातला विस्तार थोपवता येईल, गजबजाट कमी कमी करता येईल... फोर्ट विभागातली गर्दी कमी करायची असेल तर तिथली शासकीय कार्यालये या नवीन केंद्रामध्ये व उपनगरात किंवा त्याहूनही उत्तम म्हणजे ग्रामीण भागात हलविली पाहिजेत...'

## १९६६ : डॉ. गाडगीळ समिती

'... आमच्या मते द. मुंबईत, टोकाला नवे सचिवालय उभारणे, शासकीय कार्यालये सुरू करणे ह्यामुळे रेल्वेवरील ताण वाढेल, गर्दीगोंधळ माजेल, प्रवासाचा वेळ वाढेल. हे सगळे टाळता येणे सहज शक्य होते. बॅक बे रिक्लेमेशनवर भरमसाठ पैसा खर्च करण्याची योजनाही अशीच घातक आहे. समुद्र मागे हटवून संपादन केलेल्या जमिनींना जी किंमत मिळत आहे त्यामुळे ही योजना किफायतशीर आहे असा समज पसरविण्यात येत आहे. तथापी रस्ते, वाहतूक, इतर सुविधा ह्यासाठी होणारा प्रचंड खर्च, प्रवासात खर्च होणारा जादा वेळ, वाया जाणारे मनुष्यबळ ह्यासाऱ्याचा विचार केल्यास, 'बॅक बे'तून मोठा फायदा मिळेल असे म्हणणे धोक्याचे ठरेल.... 'बॅक बे' रद्द करून, बर्वे समितीने सुचवल्याप्रमाणे, मुंबईतली शासकीय कार्यालये मुंबई बाहेर वा किमान पक्षी उपनगरात तरी हलवली जावीतच असे आम्हाला वाटते... विधीमंडळ, सचिवालय, इतर प्रशासकीय कार्यालये गजबजलेल्या फोर्टमध्येच असण्यात काय प्रयोजन आहे ते आम्हाला समजत नाही... ह्यापुढे एकही नवे शासकीय कार्यालय द. मुंबईत येता कामा नये अशी आमची शिफारस आहे...'

## मेट्रोपॉलिटन ट्रॅन्सपोर्ट टीम : १९६७ (डी. कॉस्टा समिती)

'... 'बॅक बे'मुळे द. मुंबईत नोकऱ्या व्यवसायासाठी लोकांना आकर्षून घेणारे आणखी एक मोठे केंद्र उभे राहील. तेही फोर्टमधल्या सध्याच्या अशाच मोठ्या केंद्राशेजारी. त्यामुळे रेल्वे, बसेस आदी सार्वजनिक वाहातुकीवरील ताण भयानक प्रमाणात वाढेल. त्यातून सध्याची विकट परिस्थिती अधिकच बिघडेल. ह्यासाठी 'बॅक ब' योजनेचा संपूर्ण फेरविचार झाला पाहिजे... असा विचार होईपर्यंत तात्पुरता उपाय म्हणून 'बॅक बे' योजना तूर्तास तरी ताबडतोब रद्द केली पाहिजे...'

## रिस्ट्रक्चरिंग ऑफ बॉम्बे, स्टडी ग्रुप : १९६८-६९

'... मुंबई शहराचा विकास अत्यंत असंतुलित आहे. ह्या असंतुलिततेचं मुख्य कारण म्हणजे व्यावसायिक उलाढालींचे दक्षिण मुंबईत, विशेषत: फोर्टमध्ये झालेले केंद्रीकरण. बॅक बे योजनेखाली, द. मुंबईत हे केंद्रीकरण शासन वाढवीत असून त्यामुळे असमतोल वाढणार आहे. ह्यातून परिस्थिती तुटेपर्यंत ताणली जाण्याचा धोका आम्हाला दिसतो...ह्यादृष्टीने प्रामुख्याने पुढील शिफारशी आम्हाला कराव्याशा वाटतात.

१. शक्य तेवढी जास्तीत जास्त कार्यालये मुंबईतून हलवून बाहेर न्यावीत व तीही शक्य त्या त्वरेने.

२. कुठल्याही नवीन उलाढालींना, त्यांच्या केंद्रांना व कार्यालयांना दक्षिण मुंबईत ह्यापुढे परवानगी मिळू नये.

३. 'बॅक बे' सारखे मुंबईतली गर्दी वाढवणारे सर्व कार्यक्रम ताबडतोब रद्द करून, जुळी मुंबई व महाराष्ट्राच्या अंतर्भागातल्या नागरी विकासाला प्राधान्य द्यावे'

## स्टडी ग्रुप ऑन न्यू टाऊन्स

'... उद्योगधंदे मुंबईबाहेर नेण्यापासून जे फायदे मिळायचे, ते सारे 'बॅक बे' विभागात नवीन व्यापारी क्षेत्र उभारण्यामुळे धुऊन जातील... ह्यावरचा एक तातडीचा उपाय म्हणजे, 'बॅक बे' योजना त्वरित रद्द करणे, किमान त्या परिसरात कुठलेही नवे ऑफीस येऊ न देणे हा आहे...'

## सीडको, बॅक बे वरील आपल्या आर्थिक अहवालात

'...'बॅक बे' योजनेचे आर्थिक दृष्ट्या अत्यंत फायदेशीर असे वर्णन आज केले जाते. रेल्वे, बस व इतर वाहतुकीसाठी द्यावी लागणारी सबसिडी, रस्त्यासाठी करावा लागणारा खर्च व इतर बाबी म्हणजे सामाजिक परिणामांची बाबही लक्षात घेता भावी काळात ही योजना म्हणजे आर्थिक आपत्तीच ठरेल... आमच्या अंदाजानुसार १९७६ पासूनच 'बॅक बे'मुळे एकूण ५% घाटाच शासनाला येऊ लागेल...'

## कमिटी ऑन बॅक-बे रिक्लेमेशन, सरकारी अर्थात पटवर्धन समिती १९६९

'...बॅक बे'च्या खर्चाचा नी नफ्या तोट्यांचा साधारण ताळेबंद पुढील प्रमाणे आहे,

तोटे (Costs) : अ) पुन:प्रापन (Reclaimation) खर्च. ब) रस्ते, पाणी, वीज आणि ड्रेनेजवरील खर्च. क) मुक्तमार्ग आणि महामार्ग तयार करण्याचे अवाढव्य खर्च. ड) भुयारी किंवा अन्य रेल्वे सोयींचा व बसेस वाढविण्याचा खर्च. इ) मनुष्य बळाचे नुकसान, जनतेला होणारा शारिरीक व मानसिक त्रास, स्वास्थ्य आणि कौटुंबिक जीवन ह्यांना पोचणारी झळ. ई) प्रवाशांचा वाया जाणारा पैसा, सबसिडी, आणि कायदा व व्यवस्था ह्यांचे प्रश्न.

फायदे

पुन: प्रापित जागेची व त्यावर बांधलेल्या इमारतींची विक्री व मिळणारा लीजमनी ह्यातून मिळणारा पैसा एवढाच एकमात्र फायदा ह्या योजनेपासून संभवतो.

'आर्थिक दृष्टया वरील फायद्या तोटयाचे गणित मांडल तर असे दिसून येईल. ह्या योजनेतून नफ्यापेक्षा तोटाच जास्त संभवतो. सर्व खर्चांची प्रमाणभूत गोळाबेरीज नव्वद कोटींच्या घरात जाते तर फायद्याची त्रेचाळीस कोटीच्या घरात!...

'वरील सर्व फायदे तोटे लक्षात घेतले आणि ह्या योजनेमुळे असमतोल वाढीला जो वाव मिळणार आहे तो लक्षात घेता, बॅक बे रिक्लेमेशन योजना ताबडतोब रद्द करावी असे आम्हाला वाटते...'

## जागतिक बँकेचे परीक्षण मंडळ

'... स्वस्त प्रवासी भाडयामुळे नोकऱ्या करणारी मंडळी दूरवर राहायला जाणे हे साहाजिक आहे. फोर्ट विभागातल्या जागांच्या किमतीमुळेही फोर्टमध्ये राहाण्यापेक्षा जास्त वेळ प्रवास करणे त्यांना आर्थिक दृष्टया परवडते. ह्यातून असमतोलच वाढतो. प्रवासी भाडयात, केंद्र सरकार सबसिडी देत असल्याने प्रवासी भाडे कमी ठेवणे रेल्वेला, बेस्टला शक्य होते. प्रवासी खर्च असा कमी राहिल्यास कर्मचाऱ्यांचे पगारही कमी ठेवणे मालकांना शक्य होते. ह्या साऱ्यातून केंद्रावरचा बोजा वाढतो. महाराष्ट्र सरकारचा मात्र 'बॅक बे' तून आर्थिक फायदा होतो. अर्थात केंद्र काय किंवा महाराष्ट्र सरकार काय, अंतिम बरा-वाईट परिणाम भोगावा लागतो तो जनतेलाच. आणि त्यामुळे अशा योजनेतून कुणाचाच फायदा होतो आहे असे वाटत नाही... रेल्वे-बस भाडे वाढवून, त्यावर सबसिडी द्यायची नाही असं धोरण अवलंबलं तर तो एक उपाय आहे. एवढया मोठ्या प्रमाणात रेल्वे-बस भाडयात वाढ केली तर ते एक हिंसक चळवळीसाठी निमित्त ठरेल... रहदारीचा तणाव कमी करण्यासाठी, व्ही.टी. चर्चगेट-कुलाबा अशी रेल्वे लाईन टाकण्यात यावी...

वरील सर्व रिपोर्टस ध्यानात घेऊन वेगवेगळया खात्यांचे सेक्रेटरी सीडको मुख्याधिकारी व मुंबई मेट्रोपॉलिटन प्रादेशिक विकास मंडळाचे अधिकारी ह्यांची संयुक्त बैठक महाराष्ट्र शासनाने बोलावली. तिने, सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून केलेल्या सूचना: (१९७०)

१. रिक्लेमेशनखाली संपादित जागा केवळ रहाण्याच्या जागेसाठीच ताबडतोब विकण्यात यावी. (Only for resinedtial purposes)

२. ह्यापुढील रिक्लेमेशन ताबडतोब थांबवावे.

३. रिक्लेम न झालेले प्लॉटस कुणालाही ऑफिसेस व व्यावसायिक कामासाठी वापरण्यासाठी विकू नयेत. मग भले ती व्यक्ती स्वखर्चाने भरणा करून रिक्लेम करण्यास राजी असो!

४. वांद्रा-कुर्ला योजनेला अग्रक्रम देऊन तेथे नवीन व्यावसायिक केंद्र उभारण्यास चालना द्यावी...'

एवढया सर्व समित्यांनी 'बॅक बे'ला असा एकमुखी विरोध केला पण ७१-७२ मध्ये नेमलेल्या मंत्रीमंडळ कमिटीने मात्र पुढील शिफारशी केल्या...

'ह्या योजनेतून उपलब्ध होणारा पैसा आज अत्यंत महत्त्वाचा आहे.' 'बॅक बे'तील जमिनींना अफाट किंमती येत आहेत. विधायक स्वरूपाच्या योजनांचा विचार करून 'बॅक बे'मुळे निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या व अन्य प्रश्नांवर मार्ग शोधून काढता येतील व त्यासाठी आमच्या शिफारशी अशा की–

१. बॅक बे' योजना राबवण्यात यावी,

२. सध्याच्या ब्लॉक ३ व ४ मधील व्यावसायिक प्लॉटस् वरील उत्पन्नातून वरील ब्लॉक्सच्या विकास योजना पूर्णपणे राबवल्या जाव्यात.

३. विकास पूर्ण झाल्यावर, इथून मिळणारे उत्पन्न मुंबईच्या विकासार्थ वापरले जावे... बांद्रा-कुर्ला योजनाही शासनाने हाती घेतल्यामुळे द. मुंबईतल्या गर्दीचा प्रश्न सुटेल. मध्य व पश्चिम रेल्वेची उपनगर स्थानके रेल्वेने जोडणे, भुयारी रेल्वे योजना राबवणे, बोरीबंदर-चर्चगेट येथील क्षमता वाढवणे, बसेसच्या ताफ्यात वाढ करणे वगैरे योजना ती ती खाती राबवीत असल्याने व 'बॅक बे' विभागात सरकारी कर्मचाऱ्यासाठी घरे बांधण्यासाठी जागा राखून ठेवली असल्याने रहदारीचा वा गर्दीचा प्रश्न वाटतो तेवढा भेडसावणार नाही...'

एवढया सर्व खटाटोपानंतर जानेवारी ७३ मध्ये वरील मंत्रीमंडळ समितीचा निर्णय शिरोधार्थ मानून, शासनाने ही योजना राबवायचा अंतिम निर्णय घेतला.

नंतरचा सार्वत्रिक विरोध, विशेषतः राजकीय विरोध, त्याला सरकारी प्रतिरोध, आव्हाने-प्रतिआव्हाने ह्यामुळे शासनाच्या दृष्टीने हा विषय आज प्रतिष्ठेचा बनला आहे.

## विधान सभेतल्या अलीकडच्या प्रश्नोत्तरांच्या आधारे

श्री. ह. गो. वर्तक ह्यांनी १६-१०-७० रोजी दिलेले उत्तर:

१. १९५० पासून आतापर्यंत २५ हेक्टर इतकी जमीन भराव घालून उपलब्ध करण्यात आली असून त्यासाठी १६२·८२ लक्ष रुपये खर्च आला.

या जमिनीचे विभाजन पुढीलप्रमाणे आहे–

| | | |
|---|---|---|
| अ) एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रीयल रिसर्च व डेव्हलपमेंट | ...... | ६·९६ हेक्टर |
| ब) पार्किंग | | २·१८ ,, |
| क) प्रायमरी शाळा व क्रीडांगण | ...... | ०·५८ ,, |
| ड) हायस्कूल व क्रीडांगण | ...... | ०·७१ ,, |
| इ) बीइ एसटीचे विद्युतगृह | ...... | ४०१५ चौ. मीटर |
| फ) टेलिफोन एक्स्चेंज | ...... | ५९४६ ,, |
| ग) केंद्र सरकार अणुशक्ती विभाग | ...... | ८१७· ,, |
| ह) रस्ते | ...... | ८·४३ हेक्टर |
| ज) २१ प्लॉटस | ...... | ५·२५ ,, |

२१ प्लॉटसचे क्षेत्र ५·२५ हेक्टर आहे. हे सर्व रेसिडेंशियल धरले तरी त्याचे प्रमाण २०% पडते. इतर सर्वत्र, नोकरीसाठी, वा अन्य कारणांसाठी लोक बाहेरूनच येणार. २०% व्यावसायिक जागांसाठी व ८०% राहाण्याच्या जागांसाठी हे शासनाचे घोषित धोरण आहे. प्रत्यक्ष परिस्थिती मात्र तूर्त तरी नेमकी उलटी आहे!

## बॅक बे भागात जागतिक व्यापार केंद्र (२७-४-७१)

प्रश्न क्रमांक ४०८९९ आ. श्री. सु. रा. राऊत (खालापूर)

१. बॅक बे रिक्लेमेशन भागात जागतिक व्यापार केंद्र स्थापन होणार आहे का ?

२. या केंद्राच्या प्रस्थापनेत सरकारचे सहभागित्व काही बाबतीत आहे काय ?

उत्तर : श्री. सु. आ. सोळंके (श्री. वर्तक ह्यांचेसाठी) बॅक बे च्या विभाग ५ मधील सुमारे ६ हेक्टर ९६ आर इतकी जमीन एम. विश्वेश्वरय्या इंडस्ट्रिअल रिसर्च अ‍ॅण्ड डेव्हलपमेंट सेंटर या संस्थेला देण्याचे शासनाने ठरविले आहे. या संस्थेच्या उद्देशापैकी, भारतीय व्यापार व उद्योग यांना चालना देण्याच्या दृष्टीने तत्संबंधी रिसर्च करणे व त्या अनुषंगाने उपाययोजना करणे हाही एक हेतू आहे.

२. होय.

महाराष्ट्र शासनानेच नेमलेल्या सर्व समित्यांनी विरोधी मत देऊनही, खुद्द शासनच स्वतः 'बॅक बे' विभागात व्यापार केंद्र उभारायसाठी प्लॉट तर देतेच पण स्वतःही त्यात सहभागी होते, ही गंमतच नाही का ? समित्यांवर खर्चलेला पैसा कुणाच्या खिशातून आला फुकट दवडायला असे जनतेने का विचारू नये ?

## टेंडर्स काढून दिलेली 'बॅक बे'तील जमीन

विधान सभेतली एक उद्बोधक चर्चा (दि. ४–१०–७१)

प्रश्न : आ. राधाकिसन जयस्वाल (जालना), वि. रा. काळदाते (लातूर), हशू अडवाणी (चेंबूर, मुंबई)

१. मुंबईमधील बॅक ब ची जमीन जुलै ७१ मध्ये टेंडर काढून वापरासाठी दिली हे खरे काय ?

२. असल्यास उक्त जागेकरता कमाल व किमान टेंडर्स काय भावाची आली होती ? शासनाने कोणती टेंडर्स स्वीकारली ?

३. आता सरकारजवळ देण्यायोग्य किती जमीन शिल्लक आहे ?

उत्तर : श्री. सु. आ. सोळंके (श्री. वर्तक ह्यांचे करिता)

१. बॅक बे रिक्लेमेशन ब्लॉक ५ मधील प्लॉट क्र. ९३, ९४, ९९, १०० आणि १२१ साठी जुलै ७१ मध्ये टेंडर्स मागवली होती हे खरे आहे.

२. सदर प्लॉट्सना कमाल व किमान भाव खालीलप्रमाणे आले आहेत.

| प्लॉट नं. | दर चौ. मीटरला कमाल (रु.) | दर चौ. मीटरला किमान (रु.) |
|---|---|---|
| ९३ | ३१५१ | २३२३ |
| ९४ | २९७७ | २४५१ |
| ९९ | ३०५१ | २४१७ |
| १०० | २९३१ | २३२३ |
| १२१ | ३३९७ | २८५१ |

शासनाने या टेंडर्सबावत अद्याप निर्णय घेतलेला नाही.

३. पूर्णपणे भराव घातलेली देण्यायोग्य जमीन शासनाकडे उपलब्ध नाही.

श्री. वि. रा. काळदाते : ही टेंडर्स कोणाकडून मागविण्यात आली ?

श्री. सु. आ. सोळंके : खाजगी कंपनीने टेंडर्स भरली.

श्री. दि. बा. पाटील : पाच प्लॉट्स मिळून किती चौरस मीटर जागा आहे ?

श्री. सु. आ. सोळंके : याचा आकडा माझ्याजवळ नाही.

श्री. हशू अडवाणी : यह प्लॉट डेव्हलप करने में सरकारको कितना खर्च आया ?

श्री. सु. आ. सोळंके : इससे दूसरा प्रश्न पूछिये

श्री. हशू अडवाणी : जुलाई के महिने मे टेंडर आया, उसपर अभी तक निर्णय क्यो नहीं लिया गया ?

श्री. सु. आ. सोळंके : प्लॉट्स चांगले आहेत किंवा नाही, त्यांची आर्थिक परिस्थिती काय आहे, याची चौकशी करून निर्णय घेतला जाईल.

श्री. वि. रा. काळदाते : या पद्धतीने टेंडर्स न मागवता, ज्या लोकांना घरांची गरज आहे, अशा छोट्या लोकांना जागा द्यावी अशी मागणी असताना सरकार एका अर्थाने नफेखोरीने या जागांची विक्री कशी काय करते ?

श्री. सोळंके : हे रेसिडेंशियल प्लॉटस आहेत. यासाठी ओपन टेंडर्स मागविण्यात येतात. ज्याला प्लॉट पाहिजे त्याने टेंडर भरावयाला पाहिजे.

श्री. काळदाते : घरमालक वेडेवाकडे वागतात, त्याच्यापेक्षा सरकार निराळे ते काय करते ?

श्री. वर्तक : मुंबईसारख्या शहरात मध्यम प्राप्तीच्या आणि कमी प्राप्तीच्या लोकांना जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने त्या ठिकाणी सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न शासन करते. ज्या ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात (बॅक बे मध्ये) पैसा उपलब्ध होण्यासारखा आहे, त्या ठिकाणी तो घेऊनच त्याचा दुसऱ्या घरदुरुस्ती कामासाठी उपयोग करू शकते.

श्री. वर्तकांनी ह्या उत्तराने हेच सूचित केले आहे की, 'बॅक बे' विभाग पैसेवाल्यांसाठीच राखीव राहील. छोट्या लोकांसाठी, हे प्लॉट राखण्यात यावे अशी मागणी असली तर असली. हे प्लॉट्स शासनाने राखून काय शासनाने फाके मारायचे ? छोट्या लोकांना जागाच हव्या असतील तर जावे त्यांनी उपनगरातून दूरवर किंवा हवे तर यावे कर्जत, खोपोलीहून बॅक बेत !

## मुख्यमंत्री नाईकांचे विधानसभेतील भाषण : ४–३–७४

(प्रेस गॅलरीतून टिपलेले)

'...१९५८ सालीच, श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असतानाच ही योजना हाती घेण्यात आली होती. ६०–६५ एकर जमीन रिक्लेमही करण्यात आली होती. त्यातली काही जमीन देण्यातही आली आहे. दुर्दैवाने त्यावेळी जमिनीला फारशी किंमत न आल्याने रिक्लेमेशनचा खर्च परवडत नव्हता. परंतु आता किंमती वाढल्या आहेत. आज तर अशी परिस्थिती आहे की, रिक्लेम न करताही जमीन आपल्या ताब्यात घेऊन लोक ती रिक्लेम करण्यास तयार आहेत. या प्रकारच्या मागण्या पुढे आल्या आहेत. आजपासूनच आपल्याला लीजमनी मिळू शकतो अशी परिस्थिती आहे. हा लीजमनी दर चौरस मीटरला २०० रु. एवढा मिळू शकतो. शिवाय भरणीचा खर्च ते स्वतःच करण्यास तयार आहेत....मुंबई शहरातील जो भाग आहे तो स्लम्ससारखा आहे. त्यात फिरणे मुश्किल झाले आहे. फोर्ट विभाग अतिशय कंजेस्टेड झाला आहे ...हे कंजेशन कमी करण्याची

जरूरी आहे. त्याचप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांसाठी या विभागात जवळपास जागा उपलब्ध करून द्यायची आहे. तसे झाल्यास त्यांचा प्रवासाचा वेळ आणि त्रास वाचेल व वहातुकीवरील ताण कमी होईल...बॅक बे तील जागा विकून जो वर सांगितल्याप्रमाणे फायदा होणार आहे त्यातून ५० % रक्कम या विभागाच्या विकासासाठी आणि २५ % ह्या शहरातील गरीब लोकांना घरे बांधून देण्यासाठी खर्च करायचे आहे. उरलेले २५ % रस्ते सुधारण्यासाठी खर्चायचे. आहेत. ह्या जमिनीतून येणारा पैसा हा दुसऱ्या कारणासाठी खर्चायचा नाही तर ह्या शहराच्या विकासातच ओतायचा आहे. परंतु ह्यातून वेगळा अर्थ काढायचा प्रयत्न होत आहे ...आज या मुंबई शहराची गरज अत्यंत महत्त्वाची आहे. शहरात १०–१२ लाख लोक झोपडपट्ट्यात राहतात. त्यांची साधारण बरी सोय करून द्यायची म्हटले तरी २५० कोटी रुपये खर्च येईल. स्लम्स दुरुस्ती, रस्ते-रुंदोकरण ह्यासाठी कोट्यवधी रुपये हवे आहेत. हा सारा पैसा ग्रामीण विभागातून मुंबईत आणता येणार नाही. 'बॅक बे' योजनेतून तो पैसा मिळू शकेल... म्हणून या योजनेला आंधळेपणाने विरोध करण्याचे सोडले पाहिजे...!' □ □

## इंदिराजींची पुणे भेट : पृष्ठ ३ वरून

'पब्लिक'. किमान दीड ते दोन हजार ट्रक्स भरून मंडळी पुणे, सांगली, नगर, ठाणे, सोलापूर, नासिक जिल्ह्यांतून काँग्रेसने आणली. ही मंडळी फुकटात आली किंवा पेट्रोलसाठी काहीच खर्च काँग्रेसला पडला नाही तर तो सारा आलेल्या मंडळीनीच केला असे कदाचित काँग्रेसवाले म्हणतील. पण त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. पुण्याच्या कॉफी हाऊसमध्ये रविवारी सकाळी दोन्ही खादीदारी मंडळी वियरच्या बाटल्या रिचवीत बसली होती. एकीकडे त्यांच्या गप्पाही सुरू होत्या. दोघेही बारामतीचे होते. काँग्रेसचे क्रियाशील सदस्य. त्यांच्या बरोबरच्या गप्पांतून मिळालेल्या माहितीनुसार तिथे आलेल्या प्रत्येक व्यक्तिला तीन पासून सहा रुपये रक्कम काँग्रेसने वाटली होती. ह्याखेरीज ट्रकसाठी करावा लागणारा खर्च वेगळाच. ह्या तमाम मंडळींचा पुण्यातल्या एका दिवसाच्या जेवणाचा खर्चही काँग्रेसचाच. शिवाय काहींना दारू वगैरे वेगळीच. किमान पाऊण लाख मंडळी बाहेरून इंदिराजींचा दौरा 'यशस्वी' करण्यासाठी आणली गेली होती. पाऊण लाखावर वरील हिशोबातला खर्च सहज विचार करण्याजोगी गोष्ट आहे.

ह्या खेरीज मंत्र्यांनी, आमदारांनी कधी नव्हेत असे दौरे आपपल्या विभागातून केले. लोकांना मोबिलाईझ करण्यासाठी ! पुणे करांनी अनुत्साहाने इंदिराजींच्या स्वागताला साथ दिली नाही तर ती उणीव भरून काढण्यासाठी वाहेरून मंडळी आणता यावीत म्हणून !! आणि झालंही तसंच.

म्हणजे इंदिराजी यायच्या म्हणून अक्षरशः लाखो रुपयांचा चुराडा एका दिवसात केला गेला. आकडा नीट काळजीपूर्वक तपासला तर कदाचित कोटीच्याही घरात जाईल. फार मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य आणि पेट्रोल उधळलं गेलं. सध्याच्या अन्नधान्य, पेट्रोल दुर्भिक्षाच्या दिवसात, महागाईने नवा उच्चांक गाठला असताना केवळ प्रतिष्ठेसाठी एवढा पैसा उधळला जावा, हे इंदिरा काँग्रेसच्या समाजवादात बसते असे निदान मला तरी वाटत नाही ! बाईंची व काँग्रेसची प्रतिष्ठा राखण्यासाठी पेट्रोलची जी उधळपट्टी झाली ती अक्षरशः राष्ट्रीय गुन्हेगारीच झाली असे मला वाटते ! आणि ह्याच संदर्भात, देशापुढे आज असलेले प्रश्न विचारात घेता, इंदिराजींची पुणे भेट यशस्वी झाली असं मला तरी वाटत नाही !! □ □



# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. २० ते २६ एप्रिल ७४**

## संघटना काँग्रेस व इंदिरा काँग्रेस युती नाही

या आठवड्यात भारताच्या लग्नी शनी-मंगळ युती होत आहे. ही निश्चितच अनुकूल नाही. पंतप्रधान इंदिरा गांधी उत्साहाने एखादा निर्णय घेतील. पण त्याचा परिणाम त्यांच्या काँग्रेसला व देशाला त्रासदायक ठरेल. बिहारच्या बाबतीत त्यांना शरणागती पत्करावी लागेल. केंद्र मंत्रिमंडळात बदलाचे वारे पुन्हा जोराने वाहू लागतील. अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण यांना महत्त्व येईल. राष्ट्रपती गिरी पुष्कळच गाजतील. कामराजांचे व मोरारजी देसाई यांचे नाव गर्जत असले तरी दोन्ही काँग्रेसमध्ये युती होणार नाही. उत्तर प्रदेशात पंतप्रधानांसमोर नवी डोकेदुखी निर्माण होईल. वसंतराव नाईकांना केंद्राकडून मागणी येईल. ¤

### मेष : नात्यात बेबनाव

मिथून राशीत तिसऱ्या स्थानी शनी-मंगळ युती झाली असताना आजच्या आठवड्याची सुरुवात होत आहे. तिसरे स्थान मित्र व नातेवाईक यांचे आहे. आज आपणास चंद्र देखील बारावा आहे. येते दोन-तीन दिवस सर्वच बाबतीत काळजी घ्या. जास्त तिखट व उष्ण खाऊ नका. नात्यातील विशेषत: सासुरवाडीकडील लोक खर्चासाठी तुम्हाला फार त्रास देतील. खोटी-नाटी कारणे सांगून मदत मागतील. त्यातूनच भांडण व गैरसमज निर्माण होतील. तुमची पत्नीदेखील वडिलांच्याच मदतीला जाईल. नोकरीत बुधवार ते शुक्रवार शुभ दिवस आहेत. सहानुभूती व सहकार्य मिळेल. नव्या उद्योगाचा विचार तूर्त बाजूला ठेवा. **महिलांस :** पैसा हाती रहाणार नाही. मोठेपणाच्या नादी लागून पैसा उधळाल. तरी पण अनुकूल घटनांचा आठवडा आहे. ¤

### वृषभ : यशात उणीव

अकराव्या चंद्राने आठवड्याची सुरुवात होत आहे ही जेवढी अनुकूल बाब आहे तेवढी धनस्थानी आजच शनी-मंगळाची युती होत आहे. ही युती प्रतिकूल आहे पण केवळ भीती बाळगून चालू नका. बौद्धिक अराजक डोक्यात निर्माण होईल. बुद्धिभ्रष्ट व विवेकशून्य वर्तन शक्यतो टाळा. नीती व आचार सोडून चालणार नाही. व्यसनाच्या जाळ्यात अडकून हातातील वा नोकरीच्या ठिकाणचा पैसा वापरू नका. पस्तावण्याची पाळी येईल. प्रत्यक्ष पैसा ज्याच्या हाती असेल अशा नोकरदारांनी निदान यावेळी तरी रजेवर जावे. लेखकांचे-कलावंतांचे कौतुक होईल. पण आयत्यावेळी वाद निर्माण होईल. लॉटरीत पैसा मिळेल. **महिलांस :** नोकरी करणाऱ्या विवाहीत स्त्रियांनी सावध रहावे. साहेबाच्या स्तुतीला भुलू नये. ¤

### मिथून : दबदबा वाढेल

आठवड्याची सुरुवातच चंद्राकडे होणाऱ्या शनी-मंगळाच्या क्रूर युतीने होत आहे. पण त्यामुळे गर्भगळीत होण्यासारखे काही नाही. दोन दुष्ट ग्रह एकत्र आले की तुमच्यासारख्या सज्जन, बुद्धीवान व्यक्तीला त्रास होतो. पण ही युती तुमचा दबदबा वाढवणार आहे. राजकारणात वरचष्मा राहील. एखादे मानाचे पद खास तुम्हाला बहाल करण्यात येईल. तुमचा सार्वजनिक सन्मानदेखील होईल. लेखकांच्या साहित्यकृतीचा मंगळवार ते शुक्रवार या दरम्याने सत्कार होईल. नव्या नाटककाराला शुभवृत्त कळेल. पैशाचे व्यवहार यश देतील. शिल्लक वाढेल. लॉटरी व अन्य मार्गाने धनलाभ होईल. वाहन खरेदी करू शकाल. **महिलांस :** साहेबीण म्हणून समारंभात मिरवाल. नोकरीत प्रमोशन. ¤

### कर्क : धाडस नको

आजच व्ययस्थानी शनी-मंगळाची युती होत आहे. तुम्हाला साडेसाती सुरू आहेच. बारावा शनी व त्याच्या जोडीला मंगळ, दोन राक्षस एकत्र म्हणजे भयंकरच. चांगले लिहायचे ठरवले तरी ते आपणास त्रासदायकच. त्यातल्या त्यात गुरू ठीक आहे. वाईट ग्रहाने घाबरून न जाता सावध राहिले तर त्यामुळे फायदाच होईल. म्हणूनच अनपेक्षित खर्चाचे एखादे प्रचंड प्रकरण निर्माण झाले तर नवल वाटू नये. चोरी, पैसे हरवणे, कुणाकडून तरी डल्ला मारला जाणे असे घडेल. अपेक्षा भंग, निराशा पदरी येईल. नोकरीत वरिष्ठांकडून हेतूपूर्वक त्रास. 'समज' मिळेल. खाजगी नोकरीत मालक नाखूश राहातील. कोर्टकचेरीचा वाद मनाविरुद्ध. संसारात त्रांगडे. आर्थिक अडचणी. फक्त पैसे मिळतील. संयम राखणे आवश्यक. गुरू उपासना करावी. **महिलांस :** कुठेही भांडू नका, मनावर ताबा ठेवा. उष्ण खाऊ नका. ¤

### सिंह : प्रगतीकडे वाटचाल

आज लाभस्थानी शनी-मंगळाची युती होत आहे. सोमवारनंतर चंद्र अनुकूल आहे. शनी-मंगळ युती म्हणजे महाभयंकर असे समजू नका. प्रामुख्याने तुम्हाला तर ती प्रतिकूल नाहीच. रेस, लॉटरीत भरपूर लाभ होईल. व्यापार सुधारेल. झालेले नुकसान भरून येईल. चुकलेले वायदे पुन्हा मिळतील. शेअरमध्ये फायदा होईल. मंगळवार ते शुक्रवार नोकरीत बदल. वरिष्ठ जागी बदली होईल. त्रासदायक अधिकारी बदलून जाईल. बँकांची वा इतर कर्जाची कामे होतील. नवा उद्योग सुरू करावा.

आर्थिक मदत मिळेल. राजकारणात वरचष्मा राहील. आमदार, खासदार यांना मोठे पद मिळेल तब्बेतीची तक्रार दूर होईल. जुना आजार कमी होईल. गुरू उत्तम आहे. प्रेम विवाहाचा योग तरुणांना आहे. **महिलांस :** कुमारिकांना इच्छापूर्तीचा आनंद मिळेल. महत्त्वाकांक्षा सफल होतील. ¤

**कन्या :** उद्योगात वाढ

मिथून व कन्या या राशीचा स्वामी बुध आहे. सध्या शनी दहावा आहे व आजच शनी-मंगळाची युती दहाव्यास्थानी होत आहे. काही अनुकूल तर काही प्रतिकूल फळे मिळतील. शनिवार ते गुरुवार अनुकूलता आहे. नवे मात्र कोणतेही धाडस नको. वरिष्ठांशी गोड बोलून कोणतेही काम साधून घ्यावे. यावेळी तडजोड व संयम फायद्याची बाजू बळकट करील. सध्या नोकरीत बदल नको. नोकरीत चुका होऊ देऊ नका. बेकारांना थोडा त्रास होऊन देखील नोकरी मिळेल. मित्र मदत करतील. नव्या क्षेत्रांत प्रवेश मिळेल. कल्पकतेला वाव मिळेल. व्यापारी क्षेत्रात तुम्ही प्रभाव पाडू शकाल, वाङ्मय निर्मितीत थोडेफार अडथळे आले तरी लेखन गौरवास्पद होईल. आर्थिक स्थिती थोडीफार तंगीची. **महिलांस :** पतिराजांनी दिलेल्या पैशातच व्यवहार करा. नोकरीत, बढती प्रमोशन मिळेल. ¤

**तूळ :** अडचणींवर मात

तुम्ही तरुण असाल तर या आठवड्यात एखाद्या सुंदर तरुणीच्या जाळ्यात अडकाल. फसवणूक होणार नाही पण तुम्ही तिच्यासाठी पैसा खर्च करण्यात धन्यता मानाल. शनी मंगळाची युती भाग्यचक्र गतीमान करील. रविवार ते शुक्रवार हे सारे दिवस वैशिष्ट्याने नटलेले आहेत. नोकरीत लहरीपणाने वागाल. तरीपण वरिष्ठ रागावणार नाहीत. जादा पैसे वा प्रमोशनची मागणी करायला हरकत नाही. तब्येत खूश राहील. आजारातून बरे व्हाल. मित्रांची मदत मिळेल. प्रवासात नव्या ओळखी होतील. लेखनात व कलागुणात प्रसिद्धीचा योग आहे. महत्त्वाकांक्षा व उराशी बाळगलेली स्वप्ने साकार होतील. चुकलेली संधी पुन्हा उपलब्ध होईल. मुलांच्या कौतुकाने मन आनंदी होईल. संसारात शुभदायक घटना. **महिलांस :** कुमारिकांचे लांबलेले विवाह ठरतील, पार पडतील. नोकरीत अनुकूल. ¤

**वृश्चिक :** तब्येतीला त्रास

मित्र हो, तुमचे भविष्य 'उत्तम' लिहायची माझी इच्छा होती. पण खोटे लिहून आज तरी तुमची फसवणूक केल्यासारखे होईल, म्हणून ग्रह प्रतिकूल आहेत हे सावधपणे लक्षात घ्या व ईश्वरी उपासनेवर भर देऊन वादळाची लाट डोक्यावरून जाऊ द्या. हेही दिवस जातील. प्रामुख्याने यावेळी अकल्पित धनलाभाच्या नादी अजिबात लागू नका. रेस मध्ये तर अजिबात भाग घेऊ नका. वाहन चालवणाऱ्यांनी वेगावर बंधन ठेवावे. व्यसनी असताना ते चालवू नये. नोकरीत वरिष्ठांकडून फार त्रास होईल. जुनी एखादी चूक व प्रकरण चौकशीला येईल. भरंवशाचे लोकच जास्त त्रास देतील. आगीपासून दूर राहावे. राजकारणात वावरणाऱ्यांनी लोकक्षोभ होईल असे काही करू नये. **महिलांस :** बाळंतपणाचा त्रास होईल. वृद्ध स्त्रियांना रक्तदाबाचा त्रास होईल. संयमाने वागणे आवश्यक आहे. ¤

**धनू :** खर्चाने हैराण व्हाल

आज तुम्हाला चंद्र सुखस्थानी आहे. तो तेवढा वाईट नाही.सोमवार ते बुधवार परीक्षेत यश. नवी नोकरी मिळेल. बेकार असाल तर काम मिळेल.अचानक धनप्राप्तीच्या नादी लागू नका. रेसमध्ये पैसा जाण्याचा योग जबरदस्त आहे. नवरा-बायकोने समजुतीने वागावे. तब्येतीला तसा त्रास नाही. तरी पण छातीचा आजार असलेल्यांनी जरा जपून वागावे. मनाविरुद्ध घटना घडली तरी यावेळी ती सहन करा. ताणू नका. ध्यानीमनी नसलेली खर्चाची प्रकरणे निर्माण होतील. वरिष्ठ हेतूपूर्वक त्रास देतील. खाजगी नोकरीत भांडण वा चुकाचे समर्थन करू नका. पत्नीच्या तब्येतीला त्रास होईल. थकवा जाणवेल. **महिलांस :** धावपळ फार होईल. अनेक जबाबदाऱ्या अंगावर पडतील. आर्थिक हानी होईल. अनपेक्षित खर्च फार होईल. ¤

**मकर :** संसारात काळजी

मिथून राशीत सहाव्या स्थानी शनी-मंगळ युती आजच होत आहे. केतू पाचवा आहे तर मंगळवार नंतर चंद्र एवढासा अनुकूल नाही. काही प्रतिकूल घडेल असे नाही. संमिश्र स्वरूपाचा हा आठवडा आहे. महत्त्वाची कामे सोमवारपर्यंत उरकून घ्या. संसारात काही अभावित अशा घटना घडण्याची शक्यता आहे. मुलांना तात्पुरता त्रास. तब्येतीची काळजी, पत्नीला अपघातासारखे धक्के असे काहीतरी संभवते. घरातील वृद्ध माणसांच्या तब्येतीची देखील काळजी वाटेल. एरवी नोकरीत कामाचा ताण कमी नसला तरी कामाचे चीज होईल. वरिष्ठ गोड बोलून नवी जबाबदारी अंगावर टाकतील. रेस व लॉटरीपासून लाभ होईल. उपासनेत अडथळे. **महिलांस :** घरात पाहुण्यांची गर्दी होईल. कामाने खूप थकवा वाटेल. ¤

**कुंभ :** महत्त्वाचा काळ

प्रिय मित्रांनो, तुमच्या जीवनात हा आठवडा अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. या वेळेची नोंद करून ठेवा. या वेळी तुमच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना तुमचा भविष्यकाळ उजळून टाकणार आहेत. काहीतरी भव्य दिव्य असे तुमच्या बाबतीत घडणार आहे. तुमची आजवर उराशी बाळगलेली स्वप्ने, मनात धरलेल्या आशाआकांक्षा साकारणारा असाच हा काळ आहे. नोकरीची परिस्थिती अतिशय अनुकूल राहील. वरिष्ठ जागेवर तुमची नेमणूक होईल. आजवर रेंगाळत पडलेल्या बढतीच्या शिफारशी आता प्रत्यक्षात येतील. बंगल्यात राहाण्याची तुमच्यापैकी अनेकांची इच्छा पुरी होईल. राजकारणात तुमचे स्थान हेवा वाटावा असे उंचावेल. खूप दूर व व्यापक असा प्रवास होईल. **महिलांस :** हा आठवडा विवाहानुल आहे. संसारात आनंद. ¤

**मीन :** सुखात उणीव

पहिले एक-दोन दिवस जरी चंद्र प्रतिकूल असला तरी नंतरचे दिवस अनुकूल आहेत. लेखी वा बौद्धिक परिणाम घडवणारे कोणतेही बेत सोमवारपर्यंत लांबणीवर टाकावे. सुखस्थानी शनी मंगळाची आजच युती होत आहे. गुरूदेखील (राशीस्वामी) अनुकूल नाही. फसवणूक होणार नाही याची तुम्ही काळजी घ्या. हाती घेतलेली एखादी धंद्याची योजना त्रासाने पुरी होईल. पैशाच्या बाबतीत येणारा ओघ तात्पुरता थांबेल. उद्योगाला सध्या तरी अनुकूलता नाही. चालू उद्योगात काही तरी अडचण संभवते. नोकरीत त्रास. वरिष्ठांकडून कानउघाडणी. बदलीचाही योग आहे. घरात काही तरी त्रास. आईच्या तब्येतीला त्रास. शुक्रवार उत्तम आहे. **महिलांस :** फारसा विचार करू नका. मुलांची तब्येत सुधारेल. ¤ ¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# नावलौकिक : एक काचेचं भांडं

काही वर्षापूर्वीची गोष्ट. न्यूयॉर्कमधील एका मोठ्या दैनिकाच्या पहिल्याच पानावर एक बातमी प्रसिद्ध झाली. 'एका बाईनं आत्महत्येचा प्रयत्न केला...एका डॉक्टरनं तिला दोन वेळा तपासून दोन्ही वेळा ती गतप्राण झाली असल्याचा निर्णय दिला....

केस पोलिसात दाखल झाली. त्या खात्याच्या वैद्यकीय विभागानं तिची तपासणी करून तिच्यावर उपचार केले. बाई जिवंत राहिली होती...'

डॉक्टरची अब्रू चव्हाट्यावर आली होती. त्यानं त्या वर्तमानपत्रावर अब्रू नुकसानीचा दावा लावला.

डॉक्टर :– 'बाई मेली आहे, असं मी केव्हाही म्हटलं नव्हतंच. वस्तुतः तिला मी प्रथम तपासल्यावर मला तिच्यात किंचित धुगधुगी आढळली होती, असंच मी म्हटलं होतं. त्यावेळी खोलीत असलेल्या पोलिसांना मी तसं बोलूनही दाखविलं होतं. खोलीत मी सतत दोन तास तिच्यावर उपचार केले. तिला वाचविण्याचं श्रेय मलाच आहे.'

आश्चर्य म्हणजे त्यावेळी खोलीत असलेले बहुतेक सर्व पोलीस अधिकारी डॉक्टरच्या विधानाशी सहमत झाले, मग दैनिकात अशी बातमी कशी आली? नि त्या बातमीनं बाईला वाचविल्याचं श्रेय पोलिसांच्या पदरात का नि कसं टाकलं?

वार्ताहर : 'मला ही बातमी एका पोलिसानंच खोलीच्या दरवाजात दिली. मी ती जशीच्या तशीच दैनिकाच्या कार्यालयात त्वरित टेलिफोनवरून पाठवून दिली. हेतू हा, की ती त्या रात्रीतच छापली जाऊन दुसऱ्या दिवशीच्या अंकात प्रसिद्ध व्हावी. अधिक मी काहीही केलेलं नाही हो....'

डॉक्टर : 'मी सिद्ध केलं आहे, की माझं प्रतिपादन माझ्या अनेक पेशंट्सनी नि डॉक्टर मित्रानीही वाचलं आहे. या बातमीमुळे मला खूप मानसिक क्लेश झाले आहेत. माझं नावही कलंकित झालं आहे. माझे काही पेशंट्सही मला गमवावे लागले आहेत, त्याचं काय? मी हे सर्व त्या दैनिकाच्या संपादकाच्या कानावर घातलं होतं नि दुसऱ्या दिवशीच्या आवृत्तीत तसा माझ्यातर्फे स्पष्ट खुलासा करून, चुकीची दुरुस्ती केली जावी, अशी मागणीही केली होती; पण संपादकानं तसं करण्याचं नाकारलं.'

ज्यूरर्स : 'बातमी खोटी होती. डॉक्टरला एक हजार डॉलर्स अब्रू-नुकसानी म्हणून देण्यात यावेत.'

न्यायमूर्ती : 'एक हजार डॉलर्सची रक्कम ठरविण्याचं परिमाण तुम्ही कसं ठरविलंत?'

एक ज्यूरर : 'बातमीच्या खोटेपणाबद्दल माझी खात्री झाली होती. डॉक्टर अतिशय कुशल, तज्ज्ञ होता नि द्रव्यलाभाचा विचारही न करता त्यानं सकाळभर बाईला वाचविण्याची शर्थ केली. तथापी, ही बातमी एका पोलिसानंच वर्तमानपत्रात देण्याकरता दिल्याचा वार्ताहराचा दावाही मला खरा वाटला. वेळेवर बातम्या देताना वार्ताहरांना कुठल्या अडचणी येतात, येऊ शकतात, हे मला माहीत नाही. पण बातमीच्या खरेपणाविषयी एकदा खात्री पटल्यावर त्यानं ती देण्यात कुचराई किंवा दिरंगाई करावी, अशी अपेक्षा करता येणार नाही. वास्तविक चुकीची दुरुस्ती करण्याचं संपादकानं नाकारलं नसतं तर मी वर्तमानपत्राचीच बाजू घेतली असती. म्हणून अब्रू नुकसानीची रक्कम एक हजार डॉलर्सपर्यंत खाली आणण्यात आली तेव्हा प्राप्त परिस्थितीत ती योग्य आहे, असं मला वाटलं. महत्त्वाची बाब म्हणजे, डॉक्टरनं केस जिंकणं आवश्यक होतं. रक्कम गौण बाब आहे.'

दुसरा ज्यूरर : 'मी प्रथमपासूनच डॉक्टरशी सहमत होतो त्याला अधिक रक्कम देण्यात यावी अशी शिफारस करण्याचं माझ्या मनात होतं. ज्यूरर्सपैकी तिघा-चौघांना बातमीच्या खोटेपणाविषयी खात्री नव्हती. म्हणून अधिक रक्कम देण्यास ते कबूल नव्हते. म्हणून मला वाटलं, की आमच्यातील मतभिन्नतेमुळे डॉक्टरचं हित होणार नाही. डॉक्टरच्या दृष्टीनं महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या नावलौकिकाला बट्टा लागू नये. पैशाचा प्रश्न महत्त्वाचा नव्हता.'

तिसरा ज्यूरर : 'न्यायधिश महाराज आपणच आम्हाला सांगितलंत, की फिर्यादी डॉक्टरवरच, त्याचं म्हणणं खरं आहे असं सिद्ध करण्याची जबाबदारी आहे. काही पोलिसांनी सांगितलं, की 'बाई गतप्राण झाली आहे,' असंच डॉक्टरनं म्हटलं होतं. काही पोलीस म्हणाले, की ती मेलेली नसल्याचं डॉक्टर म्हणाले होते. मी चक्रावून गेलो. एकाचीही बाजू घेतली नाही. नंतर एक हजार डॉलर्सची रक्कम ठरविण्यात आली. एकानं मत व्यक्त केलं, की दैनिकाला ही रक्कम देणं सहज शक्य आहे. त्यामुळे डॉक्टरला मदत केल्यासारखं होईल. म्हणून मी डॉक्टरच्या बाजूनं मत दिलं...'

चौथा ज्यूरर :– 'डॉक्टरची बाजू खरी असल्याचं माझं अखेरपर्यंत मत होतं. म्हणून हजार डॉलर्स योग्यच आहेत. डॉक्टरचा व्यवसाय धोक्यात आला, हा विचार मला खरा वाटला नाही. इतकंच, की त्याच्या भावना दुखावल्या गेल्या नि काही थोड्याच रुग्णांनी नि डॉक्टर्सनी त्याची टवाळी केली. पण म्हणून डॉक्टरचा एखादा अवयवच जणु निखळून पडला, असा अर्थ होत नाही...'

न्यायमूर्ती :– 'एकूण शारिरिक अवयवांची मोडतोड तुम्हाला कलंकित नावलौकिकापेक्षा अधिक महत्त्वाची वाटते तर! तुम्ही सर्वजण चतुर दिसता. भरपाईची रक्कम ही बाब तुम्हाला दुय्यम वाटते. माझा निर्णय काय झाला असता सांगू? डॉक्टरला हजार डॉलर्सच्या कित्येक पट रक्कम मिळायला हवी. पण तुम्ही देऊ केलेल्या रकमेशी तो सहमत आहे नि अधिक रक्कम घेण्याचं तोच स्वतः नाकारतोय, तेव्हा माझाही नाइलाज आहे. मला मात्र एकूण डॉक्टरवर्गाबद्दलच आदर आहे. पण त्याचा परिणाम मी आपल्या निर्णया वर होऊ देणार नाही हं...'

तात्पर्य :– कीर्ती, प्रतिष्ठा, नावलौकि इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मौल्यवान आहे. तज्ज्ञाचं नाव काचेच्या भांड्याप्रमाणे आहे. फुटलं की पुनः सांधणं महा कठीण. तस्मात नावाला जपा.

–चित्तरंजन घोटीकर


'फ्री स्टाइल' (बंद खोलीतली)
मी डायेटिंग करायचं केव्हाच सोडलंय!
महागाई
'वेटलिफ्टींग'
डंबेल्स कम् नमस्कार!
बेकारी
टंचाई